सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)

पृ.शी.: महाराष्ट्रातील करोडो शेतकऱ्यांना कोरड्या किंवा ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागणे

मु.शी.: महाराष्ट्रातील करोडो शेतकऱ्यांना कोरड्या किंवा ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते,विनोद तावडे, रामदास कदम,जयंत प्र.पाटील,संजय केळकर,सय्यद पाशा पटेल,डॉ.दीपक सावंत,श्रीमती शोभा फडणवीस डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री धनंजय मुंडे,चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर,रामनाथ मोते,डॉ.रणजित पाटील, श्री.भगवानराव साळुंखे वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्रातील करोडो शेतकऱ्यांना कधी कोरड्या तर कधी ओल्या दुष्काळाला सातत्याने सामोरे जावे लागणे, पूर्व विदर्भासह मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कोरड्या दुष्काळाचा, पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांना प्रथम अवर्षण व नंतर अतिवृष्टीचा बसलेला फटका, तर कोकणातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा सामना करावा लागणे, सन 2010 मध्ये अतिवृष्टीकरिता जाहीर केलेल्या पॅकेजचा निधी अद्यापपर्यंतही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नसणे, पूर्व विदर्भातील धानाच्या पीकाचे लष्करी अळीमुळे प्रचंड नुकसान होणे, पश्चिम विदर्भात अतिवृष्टीमुळे शेकडो एकर जमीन खरडून जाणे, राज्यातील सर्व शेतकऱ्यांना 50 हजारापर्यंत बिनव्याजी कर्ज व 50 हजारावरील कर्ज 4 टक्के दराने देण्याची घोषणा करण्यात येणे, परंतु शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात शासनास अपयश येणे, नेहमीप्रमाणे असलेली बी बियाणे व खतांच्या पुरवठ्यामधील अव्यवस्था या वर्षीही निदर्शनास येणे, महाबिज या शासनाच्या कंपनीने बोगस बियाणे पुरविल्याचे उघडकीस येणे, शेतीमध्ये मजुरी करणाऱ्यांचे प्रमाण घटल्याने यांत्रिकीकरणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याने शासनाने त्याकडे दुर्लक्ष करणे, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र अद्यापही थांबलेले नसतांना पॅकेजमधील 400 दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची विधीमंडळात घोषणा करुन देखील त्यांच्यावर कोणतीही कारवाई न होणे, राज्यातील अतिरिक्त ऊसाचे गाळप न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाल्यामुळे ऊस शेतकऱ्यांची झालेली कोंडी, त्यामुळे या सर्व बाबींमुळे संपूर्ण राज्यातील करोडो शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

माननीय तालिका सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना अवर्षण,अतिवृष्टी,रोगराई अशा संकटाचा सामना करावा लागत आहे. खरे म्हणजे ही संकटे शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेली आहेत. 2009 मध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अवर्षणाचा सामना करावा लागला तर 2010 मध्ये प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी झाली आणि राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला. पण यावर्षी जरा वेगळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. खरे म्हणजे वेधशाळेने असे अंदाज वर्तविले होते की, यावर्षी वेळेवर पाऊस येईल. राज्यातील सर्व भागामध्ये योग्य त्या वेळी पाऊस सुरु होईल. साधारणत: 8 जून हा मृगाच्या पावसाचा पहिला दिवस आहे. मात्र गेली अनेक वर्षे या राज्यात मृगाची पेरणी होतच नाही. आता मान्सूनमध्ये बदल झालेला आहे. आतापर्यंत मृग नक्षत्रामध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकरी पेरणी करीत असे अशा प्रकारचे चित्र या महाराष्ट्र राज्यामध्ये दिसत होते. पण गेली काही वर्षे हे चित्र बदलले आहे.यावर्षी देखील शेतकरी आशेवर होता की, यंदा वेळेवर पाऊस होईल. म्हणून त्याने आपल्या शेतीची मशागत केली जेणेकरुन यावर्षी तरी किमान जूनमध्ये पेरणी होईल. पण मान्सूनने हुलकावणी दिली, याबाबतीत वेधशाळेचाही अंदाज चुकला आणि 7 जूनला योग्य त्या ठिकाणी, योग्य त्या प्रमाणात पाऊस पडला नाही. त्यामुळे खरिपाचे पीक संकटात आले आहे. दिनांक 7 जुलै रोजी राज्यातील खरीप पिकाच्या 132.34 लाख हेक्टरपैकी 28.26 हेक्टर क्षेत्रामध्ये पेरणी झाली. याचा अर्थ 7 जुलै पर्यंत एकूण क्षेत्राच्या केवळ 31 टक्के क्षेत्रामध्ये पेरणी झाली आहे.

सभापती महोदय, पश्चिम विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर हे साधारणत: भात पिकविणारे जिल्हे ओहत. या जिल्ह्यात दोन महिने पाऊस झाला नाही. आपले अधिवेशन सुरु झाले तेव्हा जेमतेम पावसाला सुरुवात झाली आणि त्यावेळी धानाची रोवणी झाली नाही आणि जी काही रोवणी झाली त्यावर लष्करी अळीचा प्रादूर्भाव झाला. परंतु बऱ्याचशा शेतकऱ्यांनी धानाची रोवणी न केल्यामुळे ते हतबल झाले आहेत. 7 जुलै पर्यंत पश्चिम विदर्भ, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ व अमरावती या भागात कपाशी, उडीद, मूग, तूर,सोयाबीन इ.पिके होतात. पण तेथे पाऊस पडला नाही त्यामुळे खरिपाच्या पिकाचा बट्टयाबोळ झाला आहे.तसेच कापूस वेळेवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पेरला नाही तर त्याचे उत्पादन कमी होते. अशा प्रकारे एकीकडे पावसाचे संकट आणि दुसरीकडे शेतकऱ्यांना बियाणे मिळाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना उडीद,मूग, सोयाबीन ही पिके पेरता आली नाहीत. काही प्रमाणात ज्वारीच्या पिकालाही फटका बसलेला आहे. यावर्षी मृग नक्षत्र, आद्रा नक्षत्र कोरडे गेले. काही ठिकाणी कापसाची रोवणी झाली ज्याला धूळ पेरणी म्हणतात पण तेही पीक आले नाही.त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली. खानदेश हा भाग देखील कापूस आणि केळी पिकविणारा भाग आहे.खानदेशमध्ये अजूनही अनेक भागामध्ये पाऊस झालेला नाही. मी आजच सकाळी टी.व्ही. बातम्या पहात होतो. त्यावेळी असे सांगण्यात आले की, तापी नदीमध्ये पाणी आहे पण खानदेश, विदर्भातील शेतकरी आपल्या गालाला हात लावून बसलेला आहे कारण त्याची शेती कोरडी आहे.अजूनही नाशिक जिह्यात पुरेसा पाऊस नाही. पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी आहे.

सभापती महोदय, काल मी माननीय सभापतींच्या चेंबरमध्ये बसलो होतो, तेव्हा तेथे माण मतदार संघातील सन्माननीय सदस्य आले. त्यांनी असे सांगितले की, अजूनपर्यंत आमच्या भागामध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. त्याठिकाणी पावसाचा एकही थेंब पडलेला नाही. मराठवाड्यामध्ये देखील कमी पाऊस झाला आहे. तसेच परभणी जिल्ह्यामध्ये झरी नावाचे गाव आहे.तेथे एकाच दिवशी,एकाच तासामध्ये 90-90 मि.मि.पाऊस झाला.अशा प्रकारे निसर्गाचा लहरीपणा सुरु आहे आणि त्यामुळे शेतकरी प्रचंड संकटात सापडला आहे.मग तो पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, खानदेश किंवा विदर्भ असो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

आणि कोकणची तर अवस्थाच वाईट आहे. मी काल कोकणात पडलेल्या पावसाची आकडेवारी घेत होतो. एक हजार मिली मीटरच्यावर त्या ठिकाणी पाऊस पडलेला आहे. कोकणातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. संपूर्ण महाराष्ट्राचेच आज हे चित्र आहे. निसर्गाची अवकृपा तर आहेच. निसर्ग लहरी झालेला आहे. त्यातल्यात्यात महाराष्ट्रात इरिगेशनचे प्रमाण फक्त 17 टक्के आहे. म्हणजे निसर्गही जगू देत नाही आणि सरकारही जगू देत नाही, अशी शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे. दिनांक 15 जुलै रोजी पडलेल्या पावसाच्या या घटनेला फार दिवस झालेले नाही. बुलढाणा जिल्हयात शेगांव आणि खामगांव तालुक्याच्या बॉर्डवर दोन तासात एवढा पाऊस पडला की, जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. शेगांव, खामगांव, नांदुरा, मोताळा या ठिकाणी दोन तासात 160 मिली मीटर पाऊस पडला. ट्राफिक जाम झाले, नद्या-नाले एक झाले. महसूल विभागाने अतिवृष्टी कशाला म्हणावे या संबंधात एक पत्रक काढलेले आहे. त्यात एकाच वेळी 65 मिली मीटर पाऊस पडला तर त्याला अतिवृष्टी झाली असे म्हणावे, असे म्हटले आहे. अतिवृष्टी घोषित करण्याच्या बाबतीत शासनाने 1983 मध्ये काढलेल्या परिपत्रकानुसार दिनांक 31 जानेवारीला एक परिपत्रक काढलेले आहे. त्या निकषाप्रमाणे या ठिकाणी मदत करावयास पाहिजे होती.

सभापती महोदय, खामगांव तालुक्यातील 11 गावातील 500 हेक्टर जमीन, चिखली तालुक्यातील 13 गावातील, 1462 हेक्टर जमीन, शेगांव तालुक्यातील 16 गावातील 1500 हेक्टर जमीन आणि मोताळा तालुक्यातील 24 गावातील 3058 हेक्टर जमीन, नांदुरा तालुक्यातील 4 गावातील 300 हेक्टर जमीन एकूण 5700 हेक्टर जमीन खरडून गेली आहे. जमीन खरडण्याचे प्रमाण किती होते? त्या ठिकाणी असलेली सकस माती पूर्ण निघून गेली आणि खालचे खडक उघडे पडले. दगड आले, रेती आली त्यामुळे आता ही जमीन दहा वर्षे दुरुस्त होऊ शकत नाही, अशी अवस्था आहे. या शेतकऱ्याला शासन मदत करणार आहे काय? शासनाने हेक्टरी 25 हजार रुपये मदत केली तरी या शेतकऱ्याची शेती दोन-तीन वर्षे शेती करण्या योग्य होऊ शकत नाही. म्हणून किमान हेक्टरी 25 हजार रुपये मदत या शेतकऱ्याला दिली पाहिजे अशा प्रकारची मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात कोणत्या ठिकाणी किती पाऊस पडला याची माझ्याकडे आकडेवारी आहे. पण या प्रस्तावासाठी देण्यात आलेला वेळ कमी असल्यामुळे मी ती आकडेवारी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

या ठिकाणी सांगणार नाही. मराठवाडा, बीड आणि लातूर तालुक्यात आता थोडासा जास्त पाऊस झ ाला आहे. कोकणातील पावसाची स्थिती मी या ठिकाणी सांगितली. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील भातशेती पाण्याखाली गेली, नद्यांना पूर आले, तलाव वाहू लागले, धरणेही भरली आणि कोकणातील सर्व जिल्हयात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, एका बाजूला निसर्ग मारतो आणि दुसऱ्या बाजूला सरकार मारते.

सभापती महोदय, या सभागृहात घोषणा केल्या जातात. 50 हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी व 50 हजाराच्या वरील रक्कमेवर 3 टक्के दराने कर्ज देण्याची घोषणा करण्यात आली. पण सर्व जिल्हयात शेतकऱ्यांना आजही पीक कर्जासाठी बँकांमध्ये फेऱ्या माराव्या लागत आहेत. शासनाने घोषित केलेल्या व्याजदरातील फरक शासनाने बँकाना वेळेवर दिला नाही. त्या बाबतीत आम्ही या ठिकाणी कारण विचारले होते. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी काल या सभागृहात सांगितले की, कुठलीही बँक 10 टक्के व्याजदरापेक्षा कमी व्याजदराने कर्ज देत नाही. या ठिकाणी केवळ घोषणा केल्या जातात पण बँका या शासनाचे ऐकण्यास तयार नाहीत. बँकेत शेतकऱ्यांना कर्ज देण्यासंबंधी उदासीनता आहे. बँका कर्ज देत नाहीत. इकडे पावसाचे संकट आलेले आहे, अवर्षणाचे संकट आलेले आहे अशा वेळेला शेतकऱ्याला सावकाराच्या दारात जावे लागते. मग परत त्याचे व्याजाचे चक्र चालू होते. शेती गहाण ठेवावी लागते मग तेथून सावकारी पाश सुरु होतो. सावकारी कायदा आणला गेला. या सभागृहामध्ये कोपरापासून ढोपरापर्यंत सोलण्याच्या घोषणा झाल्या पण सावकारी कायदा अजूनही अंमलात आणला जात नाही. तो कुठे अडकला आहे माहीत नाही. या ठिकाणी आम्हाला सांगितले जाते की, या कायद्याला केंद्र सरकारची मान्यता मिळावयाची आहे. केंद्र शासनाची मान्यता कधी मिळणार आहे. सभापती महोदय, अशा या दुष्ट चक्रामध्ये हा शेतकरी आज अडकलेला आहे. पॅकेज जाहीर करण्यात आले.

सभापती महोदय, मागच्या वर्षी सन 2010 मध्ये पावसाने चांगली सुरुवात केली परंतु त्या नंतर तो एवढा कोसळला की, शेतकऱ्यांच्या डोळयातच पाणी आले. निसर्गाने अवकृपा केल्यानंतर किमान हे मायबाप सरकार काही मदत देईल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. त्यावेळी एक हजार कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा करण्यात आली आणि शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. सर्वप्रथम जे एक हजार कोटी रुपयाचे पॅकेज घोषित करण्यात आले होते त्याच पॅकेजमध्ये

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

एक हजार कोटी रुपयामध्ये सन 2008-2009 ची नुकसानभरपाई समाविष्ट करण्यात आली. खरे म्हणजे हे एक हजार कोटी रुपये सन 2010 मध्ये झालेल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना देणे गरजेचे असताना फक्त 742 कोटी रुपयाची नुकसान भरपाई त्यांना देण्यात आली. त्यापैकी केंद्र शासनाने 400 कोटी रुपये दिले मग महाराष्ट्र शासनाने किती पैसे दिले? सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने 342 कोटी रुपये दिले. पण एक हजार कोटी रुपयाची घोषणा करण्यात आली होती. अतिवृष्टीचे पॅकेज हे शासनातील अधिकाऱ्यांनी केलेल्या चुकीच्या सर्वेक्षणावर आधारित आहे. मागील वर्षी, बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ या जिल्हयात किमान 50 हजार हेक्टर जमिनीवरील उडीद व मूग या पिकांचे नुकसान झाले पण सर्व्हे करणाऱ्या अधिकाऱ्यांनी ते दाखविलेच नाही. मूग व उडिदाचे नुकसान झालेले नाही असे त्यांनी सर्व्हेमध्ये दाखविले. चारही जिल्हयातून जवळपास 950 हेक्टर जमिनीवरील मुगाचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असे सर्व्हेमध्ये दाखविण्यात आले नाही.

(वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात आली)

सभापती महोदय, आपण वेळ संपल्याची घंटा वाजवू नये. जर आपण आम्हाला बोलू देणार नसाल तर आम्ही आमचा प्रस्ताव याच ठिकाणी संपवतो आणि निघून जातो.

तालिका सभापती :(श्री. मोहन जोशी) : आपले भाषण सुरु होऊन 17 मिनिटे झालेली आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझे भाषण सुरु होऊन 17 मिनिटे झालेली आहेत याची मला कल्पना आहे.

तालिका सभापती : आपण काल सांगितले होते....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे असेल तर मला या प्रस्तावावर बोलावयाचे नाही, मी चाललो.

तालिका सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, अशा पध्दतीने विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण 15 मिनिटात थांबविण्यात येणार असेल तर मला या प्रस्तावावर बोलावयाचेच नाही, मी सभागृहाबाहेर जातो.

(सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर बहिर्गमन करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही पध्दत बरोबर नाही. काल या सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या प्रस्तावावर अन्य सन्माननीय सदस्य बोलत असताना आपण त्यांना अशा प्रकारे थांबविले नाही.....

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आम्ही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलत असताना आम्हाला बोलू दिले जात नाही. काही दिवसांपूर्वी अशाच प्रकारे आम्हाला बोलू दिले नाही पण इतर सन्माननीय सदस्यांना बोलू दिले.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांना बालण्यापासून थांबविण्यात येत आहे. काल या सभागृहात सत्ताधारी पक्षाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावावर उशिरापर्यंत चर्चा होत असताना तो दलितांचा विषय आहे सामाजिक न्यायाचा विषय आहे म्हणून आम्ही एका शब्दाने बोललो नाही. अशा प्रकारे विरोधी पक्ष नेत्यांना या ठिकाणी बोलू दिले जात नाही पण रात्रौ 11.00 वाजेपर्यंत, उशिरापर्यंत सभागृहाचे कामकाज चालविले जाते.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या विषयावर शासनाची अशी कायदेबाजी चालणार असेल तर आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

तालिका सभापती : सभागृहाचे कामकाज 5 मिनिटासाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.19 ते 10 26 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.26 ते 10.37 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.37 ते 11.07 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आणखी 10 मिनिटे स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 11.09 ते 11.19 पर्यन्त स्थगित झाली.)

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.23 ते 11.45 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**स्थगिती नंतर**)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

<u>प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्र. 10 बाबत</u>

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्र. 10 वा प्रश्न, प्रश्नोत्तराच्या तासातील शेवटच्या 15 मिनिटात चर्चेला घेण्यासाठी प्राधान्य मिळण्याबाबत मला विनंती केलेली आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील क्रमाने येणाऱ्या तारांकित प्रश्नांना प्राधान्य देणे हे पीठासीन अधिकारी म्हणून सभापतींचे काम असते. त्यामुळे अशा प्रकारे पुढील प्रश्न अगोदर चर्चेला घेण्याची परवानगी देता येणार नाही. मी सन्माननीय सदस्यांना सूचना करु इच्छितो की, त्यांनी ता.प्र.क्र.17844 मध्ये जो विषय दिलेला आहे तो विषय अन्य आयुधांचा वापर करुन सभागृहात उपस्थित करण्याचा प्रयत्न केला तर मी त्याला प्राधान्य देऊ शकेन. पण अशा प्रकारे कामकाज पत्रिकेतील इतर प्रश्नांना बाजूला ठेवून एकदम क्र. 10 वा प्रश्न विचारात घेणे शक्य होणार नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी विधान परिषद नियमावलीतील नियम क्र. 80 कडे आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यात म्हटले आहे की, "तोंडी उत्तरासाठी न आलेल्या प्रश्नाचे उत्तर, जर उक्त प्रश्न खास सार्वजनिक हिताचा आहे आणि त्यास उत्तर देण्याची आपली इच्छा आहे असे मंत्री सभापतींना निवेदन करतील तर, सभापतींच्या परवानगीने प्रश्नोत्तराच्या वेळेच्या शेवटी देता येईल." त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जी विनंती केलेली आहे त्यानुसार आपल्याला क्र. 10 वा प्रश्न शेवटच्या 15 मिनिटात चर्चेला घेता येतो. तसेच हा प्रश्न राज्यातील लाखो-करोडे मुलांच्या आरोग्याशी निगडित आहे. राज्यातील मुलांना कोणते दूध शासनाकडून देणार आहात हा खरा प्रश्न निर्माण झालेला आहे, त्यामुळे अतिशय संवेदनशील प्रश्न असून तो कोणाच्याही विरोधातील नाही, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांशी निगडित आहे, म्हणूनच हा प्रश्न घेण्याची परवानगी मागितलेली आहे.

सभापती : आपण अन्य आयुधांचा वापर करुन हा प्रश्न सभागृहात मांडावा, मी त्याला जरुर प्राधान्य देईन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये प्रस्ताव चर्चेला ऑलरेडी आहेच, लक्षवेधी सूचना देखील वेळेअभावी देऊ शकत नाही, नियम 93 च्या सूचनांवरील निवेदनावर चर्चा होण्यासाठी पुरेसा वेळ नाही, अशा सर्व गोष्टींचा विचार करुनच मी ही मागणी केली आहे.

श्री. कपिल पाटील : महोदय, हा प्रश्न विशेष उल्लेख अथवा अन्य आयुधांच्या माध्यमातून सभागृहात घेता येणारा नाही, कारण तेवढा वेळ त्याला देता येत नाही. प्रश्नोत्तराचा तास हाच एक सोपा मार्ग या प्रश्नासाठी आहे. तसेच मंत्री महोदय देखील या प्रश्नावर उत्तर देण्यासाठी सभागृहात आहेत. राज्यातील मुलांच्या दृष्टीने हा प्रश्न गंभीर व संवेदनशील देखील आहे व शासनाने सुध्दा लेखी उत्तरात ही वस्तुस्थिती मान्य केलेली आहे. अशा परिस्थितीत हा प्रश्न चर्चेला घेण्यामध्ये कोणती अडचण आहे, हेच मला समजत नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, तारांकित प्रश्नांच्या यादीतील इतर प्रश्न बाजूला ठेवून दहाव्या क्रमांकाचा प्रश्न चर्चेला घेण्याची पध्दत आपल्या सभागृहात पूर्वी होती, पण ती आता सर्व सभागृहाच्या संमतीने आपण बंद केलेली आहे. पुन्हा तीच पध्दत सुरु केली तर तो प्रघात पडण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत हा प्रश्न प्रॉयॉरिटीने घेणे आपल्याला शक्य होणार नाही.

श्री. कपिल पाटील : नियमामध्ये तसा स्पष्ट उल्लेख आहे. तसेच मा. संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगावे की शासनाला या प्रश्नावर उत्तर द्यावयाचे नाही, मग आमची हरकत नाही.

सभापती : या विभागाचे मंत्री महोदय देखील सभागृहात उपस्थित दिसत नाहीत. तसेच आपण जो नियमाचा उल्लेख केला ती बाब मी तपासून पाहतो.

....3.

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

जायकवाडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या हजारो शेतकऱ्यांकडे पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रात विविध गावात शासनाने दिलेले भूखंड व जमिनींची कागदपत्रे नसल्याबाबत

(1) *18614 **श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख, श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जायकवाडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या हजारो शेतकऱ्यांकडे पुनर्वसना अंतर्गत 1975 ते 2011 दरम्यान लाभक्षेत्रात विविध गावात शासनाने दिलेले भूखंड व जमिनींची कागदपत्रे नसल्याचे माहे मे, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना सदर कागदपत्रे देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

डॉ.पतंगराव कदम : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सतीश चव्हाण : मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. तसेच इतर दोन प्रश्नांना सुध्दा "प्रश्न उद्भवत नाही" अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. तेव्हा लेखी उत्तरात काही दुरुस्ती करावयाची असेल तर ती मंत्री महोदयांनी करावी.

डॉ. पतंगराव कदम : महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नच मुळात असा विचारलेला आहे की, "जायकवाडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या हजारो शेतकऱ्यांकडे पुनर्वसना अंतर्गत सन 1975 ते 2011 दरम्यान लाभक्षेत्रात विविध गावात शासनाने दिलेले भूखंड व जमिनीची कागदपत्रे नसल्याचे माहे मे, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय" त्याला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. कारण यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्ड जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे आहे, त्यातील कोणतेही रेकॉर्ड जळालेले नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 18614 .....

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, शासनाने जायकवाडी प्रकल्पग्रस्तांना ज्या पर्यायी जमिनी दिलेल्या आहेत त्या भोगवटदार दोन नुसार दिलेल्या आहेत. आता या प्रकल्प ग्रस्तांना भोगवटदार एक मध्ये कन्व्हर्ट करण्यासाठी अधिका-यांनी शिबिरे घेतली असून अधिका-यांनी प्रकल्प ग्रस्तांकडून जमिनीच्या संदर्भात ताबा "ब" ची नक्कल, रक्कम भरल्याचे चलन अशा प्रकारची डॉक्यूमेंट मागितलेली आहेत. 35 वर्षापूर्वीचे रेकॉर्ड धरणग्रस्तांकडे असूच शकत नाही. प्रकल्पग्रस्त जेव्हा जिल्हाधिकारी कार्यालयात गेले त्यावेळेस हे रेकॉर्ड गहाळ तसेच जळालेले आहे असे सांगितलेले आहे. 1975 मधील ताबा पावती किंवा रक्कम भरलेले चलन असूच शकत नाही. 1999 मध्ये यासंदर्भात जीआर निघाला असून त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, 10 वर्षापूर्वी शासनाने जमिनी दिल्या असतील तर ते प्रकल्पग्रस्त आपोआप भोगवटदार एक मध्ये येतात. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, वरील जीआर नुसार सर्व नोंदी भोगवटदार एक मध्ये होणार आहेत काय ? मंत्री महोदयांनी आता सांगितले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयात यासंदर्भात रेकॉर्ड उपलब्ध आहे. जर यासंदर्भात रेकॉर्ड नसेल तर संबंधित अधिका-यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. पतंगराव कदम : सभापती महोदय, पूर्वी यासंदर्भातील अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आले होते व त्यांनतर हे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आले. प्रकल्पग्रस्तांनी या जमिनी विकू नयेत यासाठी आपण 10 वर्षाची मुदत घातली होती. जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत. ज्यांनी ज्यांनी मागणी केलेली आहे त्या सर्वांना भोगवटादार एक मध्ये आणले आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांना भोगवटादार दोनमधून एक मध्ये यावयाचे असेल तर त्यांना भोगवटेदार दोन मधून एक मध्ये आणले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी अतिरिक्त कामे मंजूर करुन त्यात लाखो रुपयांचा केलेला गैरव्यवहार

(२) * १९१५९ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी १२ व्या वित्त आयोगाचे उपलब्ध निधीपेक्षा ६० लक्ष रुपयांची अतिरिक्त कामे मंजूर करुन त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेवर कठोर कारवाई करण्याबाबत सभापती, अर्थ व बांधकाम समिती, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ६ जून, २०११ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.जयंत पाटील : (१) होय.

(२) १२ वा वित्त आयोगाच्या निधीतून उपलब्ध निधीपेक्षा जास्त रकमेचे दायित्व निर्माण करु नये अशा सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या होत्या.

सदर प्रकरणी उपलब्ध निधीपेक्षा जादा झालेला खर्च जिल्हा परिषदेच्या स्व-निधीतून उपलब्ध करुन घेण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद, चंद्रपूरने शासनास कळविले आहे. याबाबत सविस्तर चौकशी करुन, अहवाल सादर करावा असे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, सन 2010-11 मध्ये वित्त आयोगाकडून 2.10 कोटी रुपये जिल्हा परिषद, चंद्रपूरला खर्च करण्यासाठी प्राप्त झाले होते. जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी 2.10 कोटी रुपयांची कामे निविदा काढून करावयास पाहिजे होती. परंतु तसे न करता चंद्रपूर जिल्हा परिषदेने 86 लक्ष रुपयांच्या कामाच्या निविदा न काढता कामे केलेली आहेत. मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भातील उत्तरामध्ये निविदा न काढता 86 लक्ष रुपयांची कामे करण्यात आलेली आहे ही बाब मान्य केलेली आहे . जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी 86 लाख रुपयांची कामे निविदा न काढता केल्यामुळे त्याचा भुर्दंड जिल्हा परिषदेवर पडणार आहे. कार्यकारी अभियंत्यांनी जिल्हा परिषदेची मंजुरी न घेता जी कामे केलेली आहेत त्यासंदर्भात संबंधित कार्यकारी अभियंत्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सदर प्रकरणी कारवाई करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव आरडीडी विभागाकडे आला होता व आता हा प्रस्ताव आरडीडी कडून पीडब्ल्यूडी कडे पाठविण्यात आलेला आहे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात अनियमितता झालेली आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. परंतु अशा प्रकारे रक्कम खर्च करता येत नाही त्यामुळे जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी स्वनिधीतून खर्च करावा असे आपण कळविलेले आहे. अनियमितता झालेली आहे हे मंत्रीमहोदयांनी मान्य केलेले आहे. संबंधित अधिका-याची प्रथम चौकशी करण्याचे काहीही एक कारण नाही. त्यामुळे ज्या अधिका-याने अनियमितता केलेली आहे त्या अधिका-याला प्रथम निलंबित करुन त्याची चौकशी झाली पाहिजे. आपला जिल्हा परिषदेवर धाक असला पाहिजे. अनियमिता झालेली आहे हे आपण मान्य केलेले आहे. आपण वित्त मंत्री म्हणून काम केले असल्यामुळे यासंदर्भात आपल्याला सर्व माहिती आहे. त्यामुळे ज्या अधिका-याने अनियमितता केलेली आहे त्या संबंधित अधिका-यास प्रथम निलंबित करुन नंतर त्याची चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, संबंधित अधिका-याची प्रथम विभागीय चौकशी करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याकडे बाराव्या वित्त आयोगाचे 2.82 कोटी रुपये अखर्चित होते. परंतु त्यांनी त्यापेक्षा जास्त रकमेची कामे केलेली आहेत. त्यामध्ये त्यांनी नाली बांधकामाची सुध्दा कामे केलेली आहेत. कामांसाठी जी रक्कम कमी पडत होती ती रक्कम जिल्हा परिषदेने ठरावाद्वारे उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले होते. त्यामुळे संबंधित अधिका-याने अशा प्रकारचा निर्णय का घेतलेला आहे याबाबत चौकशी केली जाईल. कार्यकारी अभियंता हे बांधकाम विभागाचे असल्यामुळे पुढील कारवाईसाठी बांधकाम विभागाकडे सदर प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जिल्हा परिषद, चंद्रपूर येथे कार्यकारी अभियंत्यांनी जी कामे केलेली आहेत त्यातील काही कामांना प्रशासकीय मान्यता नसतांनाही कामे करण्यात आलेली आहेत. प्रशासकीय मान्यता नसतांना कामे घेतली असतील तर ते बेकायदेशीर आहे. जिल्हा परिषदेचा स्वत:चा निधी कोणता असा दुसरा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. सेस फंडावर संपूर्ण जिल्हा परिषदेचा हक्क असतो त्यामुळे कोणाच्याही मर्जीनुसार सेस फंडातून पैसा

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 19159 .....

श्रीमती शोभा फडणवीस .....

खर्च करणे योग्य नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचा स्वत:चा निधी नसतांना या ठिकाणी चुकीचे उत्तर देऊन सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, जिल्हा परिषद स्वत:च्या निधीतून हे पैसे कसे काय देणार आहे ? कार्यकारी अभियंत्यांनी जी कामे केलेली आहेत त्यातील 5-7 कामांना प्रशासकीय मान्यता नसतांना सुध्दा कामे केली गेली आहेत. त्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंत्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : होय, सभापती महोदय.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, वित्त आयोगाकडून जेवढा निधी प्राप्त झाला त्यापेक्षा अधिक रकमेची कामे करण्यात आलेली असल्यामुळे अनियमितता झालेली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेला बाराव्या वित्त आयोगाकडून निधी उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे अशा प्रकारची अधिक कामे किती जिल्हापरिषदांमध्ये झालेली आहेत ? प्रशासकीय मंजुरी नसतांना स्वनिधीतून पैसे उपलब्ध करुन देणे योग्य आहे काय ? स्वनिधीतून खर्च करण्यास परवानगी दिली तर पुन्हा एकदा अनियमितता होऊ शकते. त्यामुळे बाराव्या वित्त आयोगाकडून आलेल्या पैशांचा विनियोग करण्याच्या बाबतीत कार्यप्रणाली व बंधनाच्या संदर्भात शासन फेरविचार करणार आहे काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, प्राप्त निधीपेक्षा जास्त निधी खर्च करण्याला बंधने आहेत. जास्त निधीचे एस्टिमेट करणे, मान्यता देणे तसेच सर्व कामे एकाच वेळी सुरु करुन लायब्लिटी वाढवणे हे अभिप्रेत नाही. जादा निधीची कामे केल्यामुळे हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितले आहे की, यातील काही कामे प्रशासकीय मंजुरी न घेताच करण्यात आलेली आहेत. खरे म्हणजे ही गंभीर बाब असल्यामुळे संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. जिल्हा परिषद चंद्रपूर, येथे जो प्रकार झालेला आहे तसा प्रकार इतर कोणत्याही जिल्हा परिषदेत झालेला नाही हे मी सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांना सांगू इच्छितो. मर्यादा ओलांडून काम करणे योग्य नाही. त्यामुळे संबंधितावर कडक कारवाई करण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाला पाठविलेला आहे. बांधकाम विभाग यासंदर्भात निश्चितपणे कडक कारवाई करेल. अशी अनियमितता पुन्हा होणार नाही यासाठी जिल्हा परिषदांना स्वतंत्र आदेश देण्यात येतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 19159 .....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, संबंधित अधिका-याने मंजूर निधीपेक्षा 86 लक्ष रुपये अधिक खर्च केलेले आहेत हे मंत्रीमहोदयांनी उत्तरात मान्य केलेले आहे. उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, " 12 व्या वित्त आयोगाच्या निधीतून उपलब्ध निधीपेक्षा जास्त रकमेचे दायित्व निर्माण करु नये अशा सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या होत्या." अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या असतांनाही प्रशासकीय मंजुरी न घेताच 86 लाखाची कामे ज्या अधिका-याने केलेली आहेत त्या अधिका-याचे तातडीने निलंबन करुन चौकशी केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19159....

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे बाब सिद्ध झालेली आहे म्हणून कारवाई करण्याच्या सूचना बांधकाम विभागाला दिलेल्या आहेत. त्यामुळे आता त्यांच्यावर लवकरात लवकर कारवाई होणार आहे. यात कम्प्लीट कारवाई होईल.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील भाटीया, खंबाला हिल, हिंदुजा व प्रिन्स अली खान या रुग्णालयांनी प्रसूतीकक्ष बंद केल्याबाबत

(३) * १९३४६ श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.संजय केळकर , श्री.सय्यद पाशा पटेल : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भाटीया, खंबाला हिल, हिंदुजा व प्रिन्स अली खान या रुग्णालयांनी सामाजिक कार्य करण्याच्या नावाखाली शासनाकडून अल्प दरात भूखंड मिळविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसुतीच्या कामामध्ये कमी नफा मिळत असल्याकारणाने सदर रुग्णालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील प्रसुतीकक्ष बंद केले वा करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णालयांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) अंशत: खरे आहे.

भाटीया, खंबाला हिल, हिंदुजा व प्रिन्स अली खान यापैकी फक्त प्रिन्स अली खान या रुग्णालयाची जमीन शासकीय आहे. सदर जमीन ९९ वर्षाच्या लिजवर दिलेली आहे. उर्वरित रुग्णालये ही खाजगी जागेवरती आहेत.

(२) प्रिन्स अली खान रुग्णालयाच्या परिसरात नियमीत प्रसूतीसेवा उपलब्ध आहे. सदर रुग्णालयात दक्षतासेवांची (CCU) मागणी प्रचंड वाढत असल्याने त्यांनी प्रसूतीसेवा या दक्षतासेवांमध्ये (CCU) रुपांतरीत केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19346...

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझ्या लेखी प्रश्नाला अर्धवट उत्तर आलेले आहे. मी 4 रूग्णालयांसंबंधी माहिती मागितली होती. येथे फक्त एकाच रूग्णालयाची माहिती आलेली आहे. पैसे जास्त कमावावेत या उद्देशानाचे हे रूग्णालय कार्यरत आहे असा माझा दुसऱ्या प्रश्नाचा रोख होता. त्या प्रश्नाला डायरेक्ट उत्तर न येता इनडायरेक्ट उत्तर देण्यात आलेले आहे. प्रसूती युनिट बंद करून त्याचे रूपांतर दक्षतासेवामध्ये (CCU) करण्यात आले आहे. प्रसूती गृहामध्ये पैसे कमी मोजावे लागतात आणि CCU युनिटमध्ये गेल्यानंतर पेशंटला जास्त पैसे मोजावे लागतात. जमीन घेताना रूग्णांची सेवाभावाने सेवा करू हे उद्दिष्ट दाखवून या रूग्णालयांनी शासकीय जमिनी घेतल्या आहेत आणि आज तेथे एक प्रकारची इंडस्ट्री उभी केली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. तसेच सामान्य माणसांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे. तेव्हा जे अर्धवट उत्तर आलेले आहे, त्याचा खुलासा व्हावा आणि सेवा न करता फक्त पैस कमाविण्याकरिता या जागेचा उपयोग जे करीत आहेत, त्यांच्या विरूद्ध तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. तेव्हा त्या बाबतची कारवाई शासन करणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शासकीय जमीन रूग्णालयांना दिलेली आहे यासंबंधीचा प्रश्न आहे. प्रिंस अली खान या रूग्णालयाला आपण शासकीय जमीन उपलब्ध करून दिलेली आहे. शासकीय जमीन उपलब्ध करून देताना आरोग्याच्या दृष्टीने कोणकोणते युनिट असले पाहिजेत अशा प्रकारचे बंधन अटींमध्ये घातलेले नसते. परंतु, 15 टक्के खाटा ह्या गरीब लोकांच्या सेवेकरिता उपलब्ध करून दिल्या पाहिजेत असा नियम आहे. चॅरिटेबल ट्रस्ट खाली ज्या रूग्णांची नोंदणी झाली आहे त्यांना 10 टक्के खाटा दारिद्र्य रेषीखालील लोकांसाठी राखीव ठेवाव्यात अशा प्रकारचा नियम आहे. त्यामुळे या रूग्णालयाने प्रसूतीगृह सुरू ठेवले पाहिजे असे काही बंधनकारक नाही. या संबंधी आम्ही बैठक घेतल्यानंतर असे निदर्शनास आणण्यात आले की, या रूग्णालयाच्या एक कि.मी.च्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर रूग्णालये असल्यामुळे प्रसूतीसाठी येणाऱ्या रूग्णांची संख्या कमी झालेली आहे. ज्या रूग्णालयांना शासनाने जमीन दिली आहे, शासकीय फायदे घेतलेले आहेत, ती रूग्णालये योग्य पद्धतीने काम करतात की नाही याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात..

पाहणी करण्यासाठी आपण दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची एक समिती नेमली आहे. या समितीचे अलीकडेच गठण झालेले आहे. या शिवाय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली असून त्यामध्ये विधान परिषद व विधान सभेचा प्रत्येकी एक-एक सदस्य आहे. या समितीला तेथे पाठवून या रूग्णालयाची चौकशी केली जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, दक्षतासेवावर ताण पडलेला आहे असे उत्तरामध्ये मान्य केले आहे. तेव्हा, या रूग्णालयामध्ये दक्षतासेवांची क्षमता किती आहे, ती वाढविण्याच्या सूचना राज्य त्यांना देणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, दक्षतासेवांची किती क्षमता आहे हे मला माहीत नाही. अतिदक्षता सेवामध्ये वेगळ्या प्रकारची टेक्नॉलॉजी असते. त्यानुसार ते दक्षतासेवा निर्माण करीत आहेत. ही सेवा वाढविण्यासंबंधी कोणताही नियम नाही. तरी देखील यासंबंधी त्यांच्या समवेत बैठक घेऊन निश्चितपणे योग्य त्या सूचना त्या रूग्णालयाला दिल्या जातील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शासनाच्या अटी प्रमाणे 15 टक्के खाटा राखीव ठेवल्या पाहिजेत. तसेच चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्ट खाली ज्या रूग्णालयांची नोंदणी झाली आहे त्यांनी 10 टक्के खाटा दारिद्र्य रेषीखालील रूग्णांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत. प्रत्येक रूग्णालय हे धर्मादाय आयुक्त्याच्या अखत्यारित येते. आपणही त्या समितीमध्ये आहात. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, हे नॉर्म्स त्या रूग्णालयाने पाळले आहेत काय तसेच सदर चारही रूग्णालये दारिद्र्य रेषेखालील रूग्णांवर मोफत उपचार करतात काय ? एखादा विभाग बंद करावयाचा असेल आणि दुसरा विभाग सुरू करावयाचा असेल तर सार्वजनिक आरोग्य खात्याची परवानगी लागते. सेव्हन हिलच्या बाबतीत देखील हेच घडले होते. कोणतेही रूग्णालय सुरू करावयाचे असेल तर सार्वजनिक आरोग्य खात्याची परवानगी घ्यावी लागते. त्याच प्रमाणे एखादा विभाग सुरू करावयाचा असेल आणि एखादा विभाग बंद करावयाचा असेल तर त्यासाठी परवानगी घ्यावी लागते. त्याप्रमाणे त्यांच्या कॉन्स्टीटयूशनमध्ये बदल करावे लागतात. ते बदल रूग्णालयांनी केले आहेत काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, जी रूग्णालये धर्मादाय कायद्यानुसार नोंदणीकृत झालेली असतात त्यांनी त्यांच्या उत्पन्नातून 2 टक्के रक्कम बाजूला काढून त्यातून दारिद्र्य रेषेखालील रूग्णालयांची सेवा करावयाची असते. ज्यावेळी आपण शासकीय जमीन देतो त्यावेळी एकूण खाटापैकी 15 टक्के खाटा विनामूल्य देण्यासंबंधीचे बंधन आहे. त्याप्रमाणे सदर रूग्णालयाने 15 टक्के खाटा गरजू लोकांसाठी राखीव ठेवल्या आहेत काय, याची चौकशी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली आहे ती करेल व त्या प्रमाणे अहवाल देईल.

श्री.अरूण गुजराथी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आपण दोन्ही सभागृहाची समिती नेमली होती. पण कार्यवाही होत नाही हा महत्त्वाचा भाग आहे. केवळ चार रूग्णालयाच्या संदर्भातील ही बाब नाही. मुंबई, पुणे आणि इतर 15 शहरांमध्ये अशा प्रकारची रूग्णालये आहेत त्या रूग्णालयात समितीने केलेल्या शिफारशींप्रमाणे अंमलबजावणी होत नाही. गरिबांना त्याचा फायदा होत नाही, लाभ मिळत नाही. त्यामुळे शासन त्वरेने माहिती घेऊन त्यासंबंधात कारवाई करील काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली असून त्यामध्ये विधान परिषद व विधान सभेचा प्रत्येकी एक-एक सदस्य आहे. त्यामुळे या समितीची कार्यवाही सुरू होईल. या शिवाय दिनाक 18 जुलै 2011 रोजी सन्माननीय विधी व न्याय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहाच्या 25 सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्या समितीला देखील या सगळ्या गोष्टीची चौकशी करावी अशी विनंती करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी मुंबईतील भाटिया, खंबाला हिल, हिंदुजा व प्रिन्स अली खान या रूग्णालयांसंबंधी प्रश्न विचारला आहे. प्रिन्स अली खान या रूग्णालयाला शासकीय जमीन देण्यात आली आहे. या जमिनीवर प्रसूतीगृहाचे आरक्षण आहे. त्यामुळे त्यांनी प्रसूतीगृहच चालविले पाहिजे. त्यामुळे ते आरक्षण कन्व्हर्ट करू शकत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19346...

श्री.विनोद तावडे...

नाही. त्यामुळे या रूग्णालयाने चेंज ऑफ युझर केले आहे काय, असल्यास, त्यांना परवानगी आहे काय, प्रसूतीसाठी रूग्ण दाखल होत नव्हते या संबंधीचा अहवाल शासनाकडे आहे काय, तसेच, ज्याचा फायदा मिळतो ते युनिट चालवायचे असे काही प्रकार या रूग्णालयाने केले आहेत काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन 1903 मध्ये सदर जागा आगा खान यांना सार्वजनिक कामासाठी देण्यात आली होती. त्यानंतर अनेक बदल होत होत रूग्णालय तयार करण्यात आले. आम्ही मुद्दामहून या संबंधातील जुनी कागदपत्र पाहिली. त्यामध्ये प्रसूती रूग्णालय काढावे असा काही त्यात उल्लेख नाही. सदर रूग्णालय रूग्णांची सेवा करणे याच उद्देशाने काढलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, डी.सी.रूल्स मधील आरक्षण काय आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पर्पज चेंज केला आहे का, यासंबंधी देखील मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी परवानगी घेऊनच पर्पज चेंज केलेला आहे, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देतांना मान्य केले की, जेवढे उत्पन्न आहे त्याच्या दोन टक्के उत्पन्न सेवाभावी संस्थेला खर्च करावा लागतो. दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "सदर रुग्णालयामध्ये दक्षतासेवांची (CCU) मागणी प्रचंड वाढत असल्याने त्यांनी प्रसूतीसेवा या दक्षता सेवांमध्ये (CCU) रुपांतरीत केली आहे"असे म्हटले आहे. याचा अर्थ प्रसूत होणाऱ्या महिलेच्या परिवाराकडून जास्त पैसे उकळण्याचे धंदे सुरु आहेत. त्या ठिकाणी टेबलाखालून जी देवाणघेवाण होते तिचा हिशेब कोण ठेवणार आहे? सेवाभावी कारणांसाठी या संस्थाकडे हे काम देण्यात आले आहे,त्यांच्यामध्ये प्रचंड प्रमाणात गैरकारभार सुरु आहे. त्यांच्या आर्थिक उलाढालीची चौकशी कोणत्या संस्थेच्या माध्यमातून करणार आहात? दुसरा प्रश्न असा की, मोठया महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये किती संस्थांना सेवाभावी कार्यासाठी जमीन देण्यात आली आहे?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये सद्या दोन समित्या कार्यरत असून त्यापैकी विधिमंडळाची एक समिती असून दुसरी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या बाबीसंदर्भात चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीला स्पष्टपणे सूचना देण्यात येतील. त्याचप्रमाणे मुंबईमधील आठ संस्थांना हॉस्पिटलसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 17877 संबंधी

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी आपण तारांकित प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अनुपस्थित राहणार असल्याबाबत एक टिपण सादर केले आहे. त्या मुळे त्यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 17877 वरील चर्चा मी तहकूब करीत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सभागृहात उपस्थित झाल्यानंतर तो प्रश्न चर्चेला घेण्यात येईल. अन्यथा, इतर सन्माननीय सदस्यांवर अन्याय होऊ नये म्हणून शेवटच्या पाच मिनिटामध्ये हा प्रश्न मांडण्यास मी त्यांना परवानगी देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

(चर्चा पुढे सुरु....

गोंदिया जिल्ह्यातील खुर्शीपारटोला येथे तीन वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामात निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केल्याबाबत

(५) * १८३८५ श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.संजय केळकर , श्री.धनंजय मुंडे , श्री.सय्यद पाशा पटेल : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील खुर्शीपारटोला येथे तीन वर्षापूर्वी यशवंत लोकवर्गणीच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्ता बांधकामाकरिता मॅगनीज निधीअंतर्गत १२ लाख १४ हजार रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामात निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर करण्यात आल्याची तक्रार संबंधित गावकऱ्यांनी जिल्हा परिषद अध्यक्षांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच रस्ता बांधकामावर दोन वेगवेगळ्या योजनेतून निधी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तसेच बांधकामात निकृष्ट साहित्याचा वापर करणाऱ्या कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (१) होय,

सन २००६-२००७ मध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजनेंतर्गत मौजे खुर्शीपारटोला येथे २१८ मीटर रस्त्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून या कामांवर एकूण रु. ६,०३,६७९/- एवढा निधी खर्च करण्यात आला आहे.

तर सन २०१०-२०११ या वर्षात खनिज विकास निधी अंतर्गत मौजे खुर्शीपारटोला येथील २४५ मी.चे अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटचे बांधकाम करण्यासाठी रु. १२.१४ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आली आहे.

(२) होय

सदर बांधकामांत निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केल्याबाबत गावकऱ्यांनी तक्रार केली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १८३८५....

(३) एकाच रस्ता बांधकामावर दोन वेगवेगळया योजनेतून निधी मंजूर करण्यात आला नाही.

मात्र सन २०१०- २०११ या वर्षात सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आमगांव तर्फे हाती घेतलेल्या रस्त्याच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित कंत्राटदारास योग्य त्या सूचना देऊन निकृष्ट साहित्याच्या वापर करण्यास मनाई करण्यात आली होती. सद्य:स्थितीत बांधकामास चांगल्या दर्जाचे साहित्य वापरण्यात आलेले असून जिल्हा चाचणी प्रयोगशाळेत साहित्यांची निकषानुसार चाचणी करण्यात आली आहे. अद्याप एकही देयक कंत्राटदारास देण्यात आले नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, या प्रश्नाला न्याय मिळावयास पाहिजे तो मिळालेला नाही...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने छापील उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "होय" ऐवजी "नाही" असे वाचावे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, उत्तर दुरुस्त केल्यानंतर सुध्दा ते बरोबर नाही. तिसऱ्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "एकाच रस्ता बांधकामावर दोन वेगवेगळया योजनेतून निधी मंजूर करण्यात आला नाही". खरे म्हणजे हे काम दोन वेळा झाले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये ० ते १८० मीटरचा रस्ता आहे आणि दुस-या टप्प्यामध्ये १८० ते ५२५ मीटरचा रस्ता असून अशाप्रकारे एकाच रस्त्याचे काम झाले आहे. त्यामुळे या संदर्भात मंत्रीमहोदय हे उत्तर दुरुस्त करणार आहेत काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी देण्यात आलेले उत्तर योग्य आहे. मुन्नालाल फाय ते यादवराव चव्हाण यांच्या घरापर्यंत १८१ मीटरचा रस्ता आहे, व गोपीचंद दिवटे ते हिवराज मेश्राम यांच्या घरापर्यंत ३७ मीटरचा रस्ता असा एकूण २१८ मीटरचा रस्ता सन २००६-०७ मध्ये झालेला आहे. त्यानंतर खनिज विकास निधी अंतर्गत २४५ मीटरचा नवीन रस्ता करण्यात आलेला आहे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातम्यांवर आधारीत हा प्रश्न विचारलेला नसून हा रस्ता माझ्या शेतामध्ये जाणारा दररोजचा वहिवाटीचा रस्ता

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १८३८५....

श्री. केशवराव मानकर....

आहे ही वस्तुस्थिती मी समोर मांडलेली आहे. म्हणून मला याठिकाणी विचारावयाचे आहे की, या रस्त्यावर जे निकृष्ट दर्जाचे साहित्य टाकण्यात आले त्याची विल्हेवाट कशी लावण्यात आली...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जर त्या रस्त्याचे लाभार्थी असतील तर ते स्वत:साठी या सभागृहाचा वापर करुन प्रश्न विचारु शकतात काय?

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी लाभार्थी नाही. हा रस्ता माझ्या शेताकडे जातो व तो गावामधील लोकांचा जाण्या-येण्याचा रस्ता आहे ही वस्तुस्थिती आपल्याला सांगितले आहे. तरी सुध्दा लोकप्रतिनिधी म्हणून या सभागृहामध्ये प्रश्न विचारण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वत: सांगितले आहे की, वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातमीच्या आधारे हा प्रश्न विचारण्यात आलेला नाही. हा रस्ता आपल्या गावातील शेताकडे जाणारा असून त्याचा आपण नेहमी वापर करतो, त्याचबरोबर गावातील अनेक लोक त्या रस्त्याचा वापर करतात असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडलेला मुद्दा जरी खरा असला तरी सन्माननीय सदस्य श्री. मानकर साहेबांना पुढील प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यास हरकत नसावी.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले त्याची विल्हेवाट कशी लावली? निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या कंत्राटदारांवर आपण काय कारवाई केली? छापील उत्तरात म्हटले आहे की, "जिल्हा चाचणी प्रयोगशाळेत साहित्याची निकषानुसार चाचणी करण्यात आली आहे".माझा प्रश्न असा आहे की, चाचणी केल्यानंतर चाचणीमध्ये कोणते निष्कर्ष आढळून आले? दुसरा प्रश्न असा की, रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे काय, असल्यास त्या ठेकेदाराचे बिल न देण्याची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, संबंधित रस्त्यावर त्या कंत्राटदाराने काही निकृष्ट दर्जाचे साहित्य आणून टाकले त्या बाबतीत गावकऱ्यांनी तक्रार केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आमगाव उप विभागाच्या माध्यमातून सन २०१०-११ मध्ये या रस्त्याचे बांधकाम करण्यात येत होते. त्या बाबतीत गावकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर त्या रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यास मनाई करण्यात आली. त्यानंतर चांगल्या दर्जाचे नवीन साहित्य वापरल्यानंतर त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क. १८३८५....

श्री. जयंत पाटील...

रस्त्याची चाचणी घेण्यात आली व त्या रस्त्याच्या स्ट्रेंग्थची तपासणी करण्यात आली. केलेल्या चाचणीमध्ये तो रस्ता निकषामध्ये बसला असल्यामुळे त्या रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला असल्यामुळे गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले अशी माझी माहिती आहे. अशाप्रकारे त्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन न करता योग्य साहित्य वापरुन केले आहे. दुसरे असे की, केलेल्या चौकशीमध्ये कंत्राटदाराचा कोणताही दोष नसल्यास त्याला भविष्यात पेमेंट केले जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचे मान्य करण्यात आले आहे. त्यानंतर त्या रस्त्यावर चांगल्या दर्जाचे साहित्य वापरल्यानंतरही त्याची चाचणी घेण्यात आली. काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडल्याचे, रस्ता उखडल्याचे ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात पहावयास मिळते. ज्या कंत्राटदाराला रस्त्याच्या बांधकामाचा ठेका दिला, त्याने रस्त्याचे काम करतांना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यानंतर सुध्दा त्याला पुन्हा रस्त्याचे काम करण्यास परवानगी दिली. या संबंधात हे शासन ठोस अशाप्रकारची भूमिका घेणार आहे काय? अशा ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यानंतर आपण त्याला काळया यादीमध्ये टाकण्याची त्याचे पेमेंट थांबविण्याची मागणी करतो. त्याऐवजी आपण कायम स्वरुपी उपाय योजना करणार काय?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, जिल्हा परिषदांनी केलेल्या रस्त्यांच्या बाबतीत यापूर्वी अनेक वेळा चर्चा झालेली आहे. विधिमंडळाचे सन्माननीय सदस्य स्वत:चा फंड खर्च करावयाचा असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ता करण्यास सुचवितात. ग्राम विकास विभागामार्फत रस्ते, गटारे, इमारतीचे बांधकाम यांचा गुणात्मक दर्जा सुधारला पाहिजे यासाठी विशेष अभ्यास गट बसविण्यात आला आहे. त्यांनी निष्कर्ष काढून एक स्वतंत्र पुस्तिका तयार केली असून ती महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदांना पोहोच करण्यात आली आहे. यापुढे होणारे कोणतेही काम सुमार दर्जाचे, कमकुवत होणार नाही याबाबत आवश्यक त्या गाईडलाईन्स देण्यात आल्या आहेत. उदा. कॉक्रिटचा रस्ता असेल तर कोणत्या स्ट्रेंग्थचे कॉंक्रिट असले पाहिजे, त्याची डेप्थ किती असली पाहिजे, गटाराचे काम करावयाचे असेल तर त्याचे डिझाईन करण्याबाबत गाईडलाईन्स दिल्या आहेत. त्या गाईडलाईन्स सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध

अशोधित प्रत / शोधित नाही

करुन देण्यात येतील. कोणताही कॉन्ट्रॅक्टर असला तरी स्पेसिफिकेशनच्या खाली जावून त्याला काम करता येणार नाही.

सभापती महोदय, रस्ता हा महाराष्ट्राचा अतिशय जिव्हाळयाचा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसून मुंबईतील रस्त्यांचा उल्लेख केला. या बाबतीत मला पत्रकारांनी विचारले की, मुंबईचे पालकमंत्री म्हणून मुबईतील रस्त्यावरील खड्डे पहाण्यासाठी आपण केव्हा जाणार आहात? त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, मी खड्डे पहावयास नाही तर रस्ता ओळखण्यासाठी मला जावे लागेल. असे कां होते याचा आपण विचार केला पाहिजे? सभापती महोदय, रस्ता तयार करीत असतांना त्याची क्वॉलिटी राखली पाहिजे, रस्त्याच्या खालील बेस मजबूत करावा लागतो. मुंबई किंवा पुणे शहरामधील किंवा कोणत्याही शहरातील रस्त्यांवर पावसाळयामध्ये खड्डे पडतात. आपण ज्या पध्दतीने आपले रस्ते तयार करतो त्यामध्ये आणि जगामध्ये तयार केलेल्या रस्त्यांच्या दर्जामध्ये फार फरक आहे. त्यामुळे आपण त्या रस्त्याची क्वॉलिटी आणि स्ट्रेंग्दन इंम्प्रूव्ह केली पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18385 . . . .

श्री.जयंत पाटील . . . .

सभापती महोदय, दुसरे म्हणजे त्या रस्त्याची ट्रिटमेंट पूर्ण झाली पाहिजे. परंतु आपण काय करतो तर 10 लाख रुपये इंजिनिअरला देऊन सांगतो की आमच्या गावातील दोन कि.मी.च्या रस्त्याचे काम करावे. प्रत्यक्षात तेथे अर्ध्या कि.मी.रस्त्याचे काम होणार असले तरी दोन कि.मी. पर्यंत त्या कामाचा पसारा असतो आणि स्ट्रेन्थ कमी झाल्यावर जो रस्ता तयार होतो, तो दोन-तीन महिन्यातच खराब होतो. त्यामुळे यातील सगळी स्पेसिफीकेशन इम्प्रुव्ह करणे आवश्यक आहेत. तसेच आपण सर्वांनी जर अशी मानसिकता ठेवली पाहिजे की, ज्या रस्त्याचे काम करण्यात येईल, त्याला पुढील 20 वर्षे हात लावण्याची गरज भासणार नाही, असे केले तरच राज्यातील रस्ते अतिशय चांगल्या दर्जाचे तयार होतील असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला की, ते आमचे पालकमंत्री आहेत ते खड्डे नाही तर रस्ता शोधण्यासाठी आहेत. मी त्यांना जाहीरपणे सांगू इच्छितो.आपण ज्या भागाचे पालकमंत्री आहात, त्या माहीमपासून मंत्रालयापर्यंत एकही खड्डा नसलेला रस्ता मी त्यांना दाखवितो. पण सायन पासून मंत्रालयपर्यंत येताना, माननीय मुख्यंत्र्यांनी ज्या पुलाचे उद्घाटन केले तो खड्डामय पूल सोडला तर बाकी ठिकाणी देखील खड्डे नाहीत हेही मी दाखवितो. कृपया आपण माझ्याबरोबर यावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझा कोणावर टीका करण्याचा उद्देश नव्हता. कोणाच्याही भावना दुखावण्याचा उद्देश नव्हता. पण एकंदर मुंबई शहरातील जनतेला खड्डयामुळे किती त्रास होत आहे यासंबंधातील त्यांची जी प्रतिक्रिया आहे, ती सांगितली.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय हे मुंबईचे पालक मंत्री असून सुध्दा त्यांना रस्ता माहिती नाही, सागरी किनारा माहिती नाही, तटबंदी माहिती नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मला मुंबईची किती माहिती आहे याची सन्माननीय सदस्यांना चांगल्या प्रकारे कल्पना आहे.परंतु याठिकाणी रस्त्यांचा दर्जा हा विषय आहे आणि सन्माननीय सदस्य रस्त्यांच्या दर्जामध्ये सुधारणा करण्याची अपेक्षा करीत आहेत ...

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी माझ्याकडे पाहून उत्तर द्यावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मी तिकडे बघण्याचे कारण म्हणजे काही सन्माननीय सदस्य बोलत असताना रेकॉर्डींग देखील करीत आहेत की काय अशी मला शंका आली म्हणून मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18385 . . . .

श्री.जयंत पाटील . . . .

तिकडे पहात होतो.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगला निर्णय जाहीर केला की, रस्त्यांची कामे कशा पध्दतीने करावयाची यासाठी आम्ही काही मानके तसेच नियमावली तयार केलेली आहे. पण सर्व नियम असतात, बाकी गोष्टी असतात, परंतु काम सुरु असताना सुपरव्हीजन बरोबर होत नाही असे माझे म्हणणे आहे.त्यामुळे माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, रस्त्यांच्या कामांच्या बाबतीत सुपरव्हीजनच्या बाबतीत कशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत? दुसरा प्रश्न असा की,राज्यामध्ये रस्त्यांच्या बांधकामासाठी लागणारे जे साहित्य आहे ते नियमाप्रमाणे पाहिजे त्या क्वॉलिटीचे आहे की नाही हे तपासण्यासाठी पी.डब्ल्यु.डी.च्या माध्यमातून किती प्रयोगशाळा आहेत ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, याबाबतीत तपासणी करण्यासाठी पी.डब्ल्यु.डी.कडे किती प्रयोगशाळा आहेत याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.परंतु आपण शक्यतो बऱ्याचशा इंजिनिअरींग कॉलेजेस् मधून याबाबत तपासणी करुन घेत असतो. मात्र सन्माननीय सदस्यांचे म्हणणे अतिशय रास्त आहे की, एखादे मटेरिअल तपासल्यानंतर मग ते वापरासाठी परवानगी दिली पाहिजे. रस्त्याचे काम करीत असताना चांगल्या दर्जाचे मटेरिअल वापरण्याच्या बाबतीत काळजी घेतली जाईल. त्यामुळे रस्त्याचे काम झाल्यानंतर त्यात दोष असल्याचे आढळून आले तर या कामाचे सुपरव्हीजन करणाऱ्या इंजिनिअरवर देखील येथून पुढे अक्शन घेण्याची व्यवस्था ग्रामविकास विभागाकडून केली जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी माननीय पालकमंत्री महोदयांना मुंबईच्या बाबतीत सांगू इच्छितो की, काही ठराविक रस्त्यांवर खड्डे नसले तरी वॉर्डन रोड पासून मंत्रालया पर्यंतच्या रस्त्याची परिस्थिती पाहिली तर तेथून गाडी चालवू शकत नाही अशी परिस्थिती आहे. माझा असा स्पेसिफीक प्रश्न आहे की, महानगरपालिका लोकांच्या पैशातून रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी 600 किंवा 800 कोटी रुपये खर्च करते आणि ज्यांनी मागच्या वर्षी चुका केलेल्या आहेत, त्याच कॉन्ट्रॅक्टरनां दुरुस्तीची कामे देत आहोत.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न एका विशिष्ट गावातील रस्त्याचा आहे. अशा वेळी या प्रश्नाच्या निमित्ताने आपण राज्यातील सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रस्त्यांच्या बाबतीत प्रश्न विचारीत आहोत. मुंबईचे सन्माननीय पालकमंत्री सन्माननीय सदस्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करतील.पण जर ही सवय लागली तर एका प्रश्नाच्या अनुषंगाने अनेक ठिकाणाच्या बाबतीत प्रश्न विचारले तर ते बरोबर होणार नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या राज्याच्या आर्थिक राजधानीमध्ये रस्त्यांवर एवढे मोठे खड्डे असतील आणि त्या त्रासातून जनतेला बाहेर काढणे आवश्यक आहे. आर्थिक राजधानी चांगल्या प्रकारे कार्यरत राहिली तर महाराष्ट्र राज्य चांगले होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी विदर्भातील गावाच्या बाबतीत प्रश्न असताना, शहराच्या बाबतीत प्रश्न का विचारले जात आहेत ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, तुम्हाला हा प्रश्न खटकणार याविषयी वाद नाही. तुमच्या जिव्हारी लागण्यासारखा हा प्रश्न आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती : मी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या वेळेला सभागृहा मध्ये एखादा प्रश्न उत्तरित होता, तेव्हा जर विशिष्ट कारणासाठी, विशिष्ट कामाच्या संदर्भातील प्रश्न असेल तर त्या बाबत उप प्रश्न विचारण्याची पध्दत आहे.जर एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांकडे अधिक माहिती असेल आणि ती त्यांनी सांगितली तर तशी ती त्यांनी सांगू नये असे माझे मत नाही. पण त्या अनुषंगाने जर दहा प्रश्न विचारले जाणार असतील माननीय मंत्री महोदयांना देखील ते अडचणीचे होईल आणि मग त्यातून सन्माननीय सदस्यांचे समाधान देखील होणार नाही. त्या मुळे सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी संबंधित विषयाच्या अनुषंगाने प्रश्न विचारावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, हा प्रश्न जिव्हारी लागण्यासारखा आहे. परंतु प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब असे म्हणाले की, माहीम पासून मंत्रालया पर्यंत रस्त्यांवर खड्डे नाहीत. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, वॉर्डन रोड वरुन मलबार हिलला जाताना गाडी व्यवस्थित पोहोचू शकत नाही अशी मी त्यांच्या वक्तव्यामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. तसेच मुंबईचे पालकमंत्री माननीय श्री.जयंत पाटील यांना एवढाच प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण मुंबईला आर्थिक राजधानी असे म्हणतो. पण ज्यांनी रस्त्यांचे काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केले ते जर एवढे नुकसान करणार असतील तर आपण संबंधितांना काळ्या यादीमध्ये टाकण्याबाबत बोलत आहोत.पण महानगरपालिका पुन्हा-पुन्हा त्याच-त्याच लोकांना काम देत असेल तर त्या मागचा नक्की हेतू काय आहे? पण या हेतूसाठी दरवर्षी मुंबईकरांची 800 कोटी रुपयांसारखी मोठी रक्कम खर्च होत आहे.परंतु जे या गोष्टी करीत आहेत, त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय? कारण मी टी.व्ही. वर सातत्याने पहातो की, कोणत्या तरी एका कॉन्ट्रॅक्टरला मारले जात आहे.त्यामुळे याबाबतीत शासन कारवाई करणार आहे काय? आपण वाईट वाटून घेऊ नये.पण रस्त्यावर कशामुळे खड्डे पडलेले आहेत आणि ते कोण बुजवत आहे? याची माहिती सदनासमोर येऊ दे.हा 600 ते 800 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे.हा मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी देखील खाली बसावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न ग्रामविकास विभागाच्या अखत्यारित येत नाही. मी मुंबईचा पालकमंत्री असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला असेल. पण रस्त्यांचा दर्जा हा आपल्या चर्चेचा मूळ गाभा आहे.

(सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटीलसाहेब यांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, रस्त्यांचा दर्जा चांगला असावयास पाहिजे आणि नागरिकांना मग ते खेडेगावातील असोत किंवा शहरातील असोत. त्याठिकाणी आता मोठया प्रमाणात जागृती निर्माण झालेली आहे की, रस्त्याचे काम सुमार दर्जाचे झालेले आहे हे लगेच कळते. तसेच जर एका पावसाळ्यामध्ये रस्ते खराब होणार असतील तर ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांमध्ये रागाची भावना वाढणे स्वाभाविक आहे. अशा वेळी या नागरिकांचे समाधान करावयाचे असेल तर मी एवढेच सांगेन की, आता गणेसोत्सव सुरु होणार आहे. पण त्यापूर्वी मुंबई शहरामध्ये जे रस्ते खराब झालेले आहेत, ते चांगले करण्याची व्यवस्था करण्यात येईल. तसेच याबाबत महानगरपालिकेला, आयुक्तांना आदेश देण्याची व्यवस्था करण्यात येईल आणि गणपती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्सवाच्या अगोदर या शहरातील रस्ते दुरुस्त करण्यात येतील. पण मला अशी काळजी आहे की, मी गेल्यावर्षी हा सगळा एक्झरसाईज् केला होता. परंतु पाऊस पडल्यानंतर रस्ते खराब होतात हे अनाकलनीय आहे. जगामध्ये केवळ आपल्याच देशात पाऊस पडतो आणि जगाच्या इतर भागामध्ये पाऊस पडत नाही अशा अविर्भावामध्ये रस्ते खराब होतात. हे चित्र बरोबर नाही. मी हे केवळ मुंबई शहरापुरते बोलत नाही. सन्माननीय सदस्यांनी मुंबई शहरातील रस्त्यांबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे.पण मुंबईमध्ये 10-15 दिवस पाऊस पडल्यावर इतके खड्डे पडतात याचा अर्थ आपल्या येथील रस्त्याचा दर्जा कमकुवत आहे. रस्त्याच्या क्वॉलिटी आणि दर्जाबाबत गंभीर असे प्रश्न उपस्थित होत आहेत आणि आता याच्या खोलामध्ये जाण्याची गरज हे शासनाला पटलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी प्लीज खाली बसावे.

के-6 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जळगांव जिल्ह्यातील नशिराबाद ग्राम पंचायतीत झालेल्या लाखोंच्या अपहाराबाबत

(6) * 18042 श्री.मनीष जैन : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जळगांव जिल्ह्यातील नशिराबाद येथील ग्रामपंचायतीत कामांच्या ठरावांची मंजुरी नसतांनाही माहे मार्च, 2011 मध्ये वा त्या दरम्यान लाखो रुपयांचा अपहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाकडून दोषींवर कोणती कारवाई करण्यांत आलेली आहे,

(3) नसल्यास, दोषींविरुध्द कारवाई न करण्याचे कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (1) होय.

(2) व (3) संबंधित सरपंच व संबंधित ग्रामविकास अधिकारी याच्यावर कारवाई चालू आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन : सभापती महोदय,जळगांव जिल्हयातील नशिराबाद ग्रापंचायतीत झालेल्या लाखोंच्या अपहाराबाबत शासनाने चौकशी केलेली आहे, त्याबद्दल धन्यवाद पण महाराष्ट्रात कुठेही अशा प्रकारचा अपहार होऊ नये या दृष्टीने ग्रामपंचायतीचे सरपंच, उप सरपंच, ग्रामसेवक यांच्या कायद्यामध्ये बदल करण्यात येईल काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, त्यांच्यावर लवकर कारवाई होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय आदेश लवकर देण्यात येतील. लवकर शिक्षा व्हायला लागली की, गुन्हे कमी होतात ज्यावेळी उशिरा शिक्षा होते, त्यावेळी गुन्हेगारांना शांतता मिळते आणि मॅनीप्युलेशन करायला वेळ मिळतो म्हणून सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे त्याप्रमाणे सुधारणा करण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, गैरव्यवहार झाल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. पहिल्या प्रश्नाला होय असे उत्तर देण्यात आलेले आहे. याचा अर्थ तो ग्रामसेवक आणि सरपंच त्यामध्ये दोषी आहे, तेव्हा त्या ग्रामसेवकाला ताबडतोब निलंबित करुन चौकशीची प्रक्रिया सुरु ठेवावी, परंतु तोपर्यंत ग्रामसेवकाला ताबडतोब निलंबित करण्यात येणार आहे काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, यामध्ये जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. श्री. साळुखे नावाच्या ग्रामविकास अधिकाऱ्याच्या बाबतीत एकूण रक्कम 88,191 रुपये इतकी असून त्यातील संशयीत रक्कम 58 हजार रुपये आहे आणि श्री. रणदे यांच्या बाबतीत एकूण रक्कम 39,520 रुपये इतकी असून त्यातील संशयित रक्कम 37,552 रुपये आहे. या दोन्हीची जबाबदारी निश्चित करण्याचे काम झालेले आहे. खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. या दोघांच्या चुका बधितल्यानंतर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई होईल. त्यामुळे त्यांना सस्पेंड करुन त्यांची खातेनिहाय चौकशी पूर्ण केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील कोण-कोणत्या ग्रामपंचायतीमध्ये किती रुपयांचा अपहार झालेला आहे, आता पर्यंत किती जणांवर कारवाई केलेली आहे आणि एकूण किती रुपयांचा अपहार झालेला आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, कोणत्या वर्षाचा प्रश्न आहे हे लक्षात आले तर...

श्री. दिवाकर रावते : गेल्या दहा वर्षातील माहिती देण्यात यावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18042....

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, गेल्या 10 वर्षातील एकंदर बेरीज करुन ती माहिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सभापती महोदय, सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी एखादा प्रश्न उपस्थित केला आणि मंत्री महोदयांकडे त्याबाबतीतील काही माहिती असेल तर मंत्री महोदयांनी ती माहिती न लपवता देणे गरजेचे आहे. एखाद्या प्रश्नाची माहितीच नसेल तर ती माहिती घेऊन सभागृहासमोर ठेवण्यात येईल असे सांगण्यात येते पण जर माहिती उपलब्ध असेल तर ती लगेच दिली पाहिजे. मी मुंबई शहराचा पालकमंत्री असल्यामुळे आणि सन्माननीय सदस्य मुंबईतील असल्यामुळे त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला उत्तर न देणे हे थोडेसे सदसदविवेक बुध्दिला धरुन दिसत नाही म्हणून मी नम्रपणे सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती दिलेली आहे. कोणाच्या भावना दुखावण्यासाठी मी हा विषय मांडलेला नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बऱ्याचवेळा मंत्री महोदय असे सांगतात की, विचारण्यात आलेल्या प्रश्नाशी निगडित नसल्यामुळे स्वतंत्र प्रश्न विचारण्यात यावा.

श्री. जयंत पाटील : माहिती असेल तर उत्तर दिले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : तुम्ही अज्ञानी आहात असे मी म्हणत नाही. आपण राज्यकर्ते आहात आपण अज्ञानी कसे असाल?महसूल मंत्र्यांना महाराष्ट्रातील महसूलाचे विविध प्रश्न माहीत असतात. त्याला धरुन कोणी शेपटासारखे जात असेल तर ते शेपूट लगेच कापले जाते, माननीय सभापतींकडून देखील कापले जाते आणि लेखी विचारण्यात आलेल्या प्रश्नाशी सबंधित प्रश्न नाही असे सांगितले जाते. पण माननीय मंत्री महोदयांना राजकारण करावयाचे होते. त्यातून हा प्रश्न निर्माण झालेला आहे. ठीक आहे. त्याबद्दल आम्ही काही म्हणत नाही. पण माझे म्हणणे असे आहे की, हा पायंडा चांगला पाडला आहे. त्या बद्दल मी तुमचे अभिनंदनच केले. त्यामुळे या राज्यातील कोणत्याही मंत्री महोदयांना वेगळा प्रश्न विचारावा असे सांगावे लागणार नाही, आम्हाला उत्तर मिळेल म्हणून मी मंत्री महोदयांचे अभिनंदन केले तर त्यात वाईट वाटण्यासारखे काय आहे? आता सर्व मंत्री तुमचा आदर्श घेतील.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मुंबई शहरातील खड्डयांचा ज्वलंत प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला होता. त्या प्रश्नाचे मी उत्तर दिले. त्याबद्दल आपण माझे अभिनंदन केलेले आहे, त्याबद्दल मला आनंद आहे. मुंबईतील खड्डे हा ज्वलंत प्रश्न असल्यामुळे कोणाच्या भावनेला हात घालण्याचा प्रश्नच येत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

श्री. दिवाकर रावते : पुणे, सांगलीमध्ये खड्डे नाहीत काय, आपण असे करु नये. आपल्याकडून ही अपेक्षा नाही.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका खरेदी करणाऱ्या सदनिका धारकांना मुद्रांक नोंदणी दस्तऐवज देण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

(7) * 18199 श्री.संजय केळकर , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.विनोद तावडे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका खरेदी करुन कित्येक वर्ष उलटल्या नंतरही ठाणे शहर व जिल्हयात येथील मुद्रांक कार्यालयांमध्ये नोंदणीसाठी सादर केलेले मूळ दस्तऐवज सदनिकाधारकांना परत देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी सदनिका नोंदणी नंतर साधारण किती कालावधीत मुद्रांक कार्यालयाने सदनिकेचे मूळ दस्ताऐवज सदनिका धारकास परत देणे आवश्यक आहे,

(3) विहित कालावधी उलटल्या नंतरही सदनिकांचे मूळ दस्ताऐवज सदनिका धारकास परत न देणाऱ्या संबंधित कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.बाळासाहेब थोरात यांच्या करिता : (1) हे अशंत: खरे आहे.

(2) सन 2002 पासून संगणीकृत कार्यप्रणाली अंतर्गत दस्तऐवजांची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक अडचण नसल्यास मूळ दस्तऐवज पक्षकारांना अर्ध्या तासात परत देणे आवश्यक आहे.

(3) संगणकीकृत कार्यप्रणाली सुरु होण्यापूर्वी दस्तऐवज नोंदणी पूर्ण झाल्यानंतर शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे येथे फोटोकॉपींग करण्यासाठी पाठविले जात होते. तथापि, सदर यंत्रणा नादुरुस्त झाल्याने दस्तऐवज फोटोकॉपींगचे काम प्रलंबित राहिले होते, सदर दस्तऐवज स्कॅनिंग करण्याची कार्यवाही सुरु आहे. स्कॅनिंग झालेले जुने दस्तऐवज परत घेऊन जाण्याबाबत पक्षकारांना नोटीसा पाठविण्यात आल्या असून अशा दस्तांची यादी दुय्यम निबंधक कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आली आहे. पक्षकारांचे स्थलांतर झाल्याने अथवा त्यांच्या पत्त्यामध्ये बदल झाल्याने मूळ दस्तऐवज पक्षकारांना परत करण्यात अडचणी येत आहेत. उर्वरित दस्तऐवज स्कॅनिंग झाल्यानंतर संबंधितांना परत करण्यात येणार आहेत. तसेच ठाणे शहर व जिल्ह्यातील अशा दस्तांची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन 2002 पासून संगणकीकृत कार्यप्रणाली अंतर्गत उपरोक्त कालमार्यादेत दस्तऐवज परत न दिल्याची प्रकरणे आढळून आलेली नाहीत.

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपरोक्त परिस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सदनिका खरेदी करताना मुद्रांक नोंदणी दस्तऐवज वेळेवर मिळत नाही, त्या संदर्भातील हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे मोठया गृहनिर्माण संस्थातील फ्लॅट ओनर्सना 5-5, 10-10 वर्षे खेपा घातल्या तरी हे दस्तऐवज मिळत नाहीत. त्यासाठी त्यांना रजा काढावी लागते, अनेक गोष्टी कराव्या लागतात, तरी टोलवा टोलवीची उत्तरे दिली जातात. या संदर्भात उत्तर देण्यात आलले आहे. परंतु आता पर्यंत किती सदनिकाधारकांचे दस्तऐवज देणे बाकी आहे? हा आकडा फार मोठा आहे. उत्तरात असे म्हटलेले आहे की, "उर्वरित दस्तऐवज स्कॅनिंग झाल्यानंतर संबंधितांना परत करण्यात येणार आहे"आता पर्यंत प्रलंबित असलेले दस्तऐवज अपडेट करण्याकरिता किती कालावधी लागणार आहे?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा प्रश्न 1985 ते 1995 या दरम्यान निर्माण झालेला आहे. त्यानंतर सन 1995 ते 2000 या दरम्यान दोन झेरॉक्स प्रती घेऊन तो दस्तऐवज परत करण्यात येत होता. परंतु 1985 ते 1995 पर्यंतच्या दरम्यान मूळ दस्तऐवज लगेच परत दिला जात नव्हता. काही काळानंतर तो परत दिला जात होता. या दस्तऐवजाचे रेकॉर्डिंग करुन मग तो दस्तऐवज परत करण्याची पध्दत होती. त्यामुळे मोठया प्रमाणावर दस्तऐवज प्रलंबित होते, त्यामुळे ते परत गेले नाहीत, ही जरी वस्तुस्थिती होती, तरी आजची परिस्थिती बदललेली आहे. राज्याच्या पातळीवर फक्त 2500 दस्तऐवजांचे रेकॉर्ड करण्याचे आणि हार्ड डिस्कवर घेण्याचे काम बाकी आहे. जवळ जवळ 23 लाख दस्तऐवजांचे काम झालेले आहे. सभापती महोदय, ठाणे जिल्हयाच्या प्रश्नाच्या बाबतीत मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, ठाणे जिल्हयाच्या बाबतीत फक्त 2-3 हजार दस्तऐवज हार्डडिस्कवर घेण्याचे काम बाकी होते ते काम कदाचित आतापर्यंत संपलेले असेल, अशी स्थिती आहे. जे मूळ दस्तऐवज परत करावयाचे होते ते सगळे दस्तऐवज परत करण्याकरिता तयार आहेत. ते खाजगी कुरीयरच्या सहाय्याने पाठविण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु मूळ मालक भेटले नाहीत, अशी अवस्था आहे. एकंदर 1 ते 63 आर्टिकल्समध्ये हे दस्तऐवज असतात. त्यामुळे दस्तऐवजाचे प्रकार सुध्दा खूप जास्त आहेत. अनेक दस्तऐवज महत्वाचे वाटत नाहीत, म्हणून ते घेण्याच्या बाबतीत कोणी उत्सुकता दाखवित नाहीत. हे दस्तऐवज ऑफिसमध्ये उपलब्ध आहेत. विशेषत ज्यांचे दस्तऐवज तयार आहेत त्या दस्तऐवजांची वेब साईटवर नोंदणी

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18199..

श्री. बाळासाहेब थोरात...

केलेली आहे. "www.igrmaharashtra.gov.in" या वेबसाईटवर ते नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे स्वत: तपासून ते ज्यांचे आहेत ते घेऊन जाऊ शकतात. आता त्यामध्ये कोणतीही अडचण राहिलेली नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री ज्या जिल्हयाचे पालक मंत्री आहेत त्या औरंगाबद शहर येथील मुद्रांक कार्यालयामध्ये नोंदणीसाठी सादर केलेले मूळ दस्तऐवज सदनिका धारकास परत देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय आणि याची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आता ही अडचण राहिलेली नाही आणि मूळ दस्तऐवज परत करण्याकरिता संपूर्ण राज्याकरिता वेबसाईट निर्माण करण्यात आलेली आहे. जे मूळ दस्तऐवज हार्डडिस्कवर घेण्याचे काम बाकी आहे, तेवढेच दस्तऐवज वगळून बाकीचे दस्तऐवज तयार आहेत. या राज्यामध्येच औरंगाबाद हे शहर असल्यामुळे दस्तऐवज देण्याची अडचण नाही. राज्य शासनाने निर्माण केलेली वेबसाईट पाहिल्यानंतर ज्यांचे दस्तऐवज तयार आहेत ते घेऊन जाऊ शकतात.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना 6 वा वेतन आयोग लागू करणेबाबत

(8) * 17934 प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना 6 वा वेतन आयोग लागू करणेबाबत निर्णय अद्यापही झालेला नाही, हे खरे आहे काय,

(2) समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना 6 व्या वेतन आयोगातील शिफारस करणेबाबत शासनाचा निर्णय पूर्ण झाला आहे काय,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : (1) , (2) व (3) होय. तथापि, सदर बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना छापलेल्या उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, नाही.

प्रा.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात हा प्रश्न आहे. या सभागृहात अनेक आयुधांच्या माध्यमातून अनेक वेळा हा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. मात्र सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे असेच उत्तर येते. आताही तेच उत्तर देण्यात आलेले आहे. माझा असा प्रश्न आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याच्या बाबतीत शासन निर्णय होईल का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झालेली आहे. बहुतेक आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये किंवा गुरुवारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ही बाब ठेवण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झालेली आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून देखील याला मंजुरी मिळालेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही त्वरित निर्णय घेऊ. हे अधिवेशन संपण्याच्या आधी जर निर्णय घेतला तर सर्व समाजकार्य महाविद्यालयांना सहावा वेतन आयोग मिळेल. एक आठवड्याच्या आत शासन या संदर्भातील निर्णय घेईल का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 17934 .....

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, आजही मंत्रिमंडळाची बैठक आहे आणि गुरुवारी नेहमी बैठक असते. मंत्रिमंडळाच्या या दोन बैठकींपैकी एका बैठकीत हे मान्य होईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या खात्याचे नाव आधी समाजकल्याण विभाग होते आणि आता या खात्याचे नाव बदलून सामाजिक न्याय विभाग असे झालेले आहे. या राज्यातील सर्व महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू होऊन 2 वर्षे झालेली आहेत. फक्त 12 समाजकार्य महाविद्यालयालये आहेत. मी स्वत: जवळपास 25 वेळा संबंधित प्रधान सचिवांकडे गेलेलो आहे तसेच काल सुध्दा मी माननीय मंत्री महोदयांशी बोललो. राज्यातील सर्व महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग ज्या तारखेपासून लागू केला त्याच तारखेपासून समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करणार का आणि अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत निर्णय करुन घेणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मंत्रिमंडळाचा निर्णय झाल्यानंतर केंद्र शासनाकडे ही बाब पाठविली जाईल आणि त्यांनी 1.1.2006 पासून मान्य केले तर त्याप्रमाणे मान्य करु.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाने हे पूर्वलक्षी प्रभावाने देण्याची तयारी दाखविलेली आहे त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. परंतु अनेक जे शिक्षक जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित आहेत त्यांना या सगळ्याचा लाभ दिला जाईल का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, यासंबंधी सुध्दा जो नियम आहे त्या नियमाप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, ही एवढीच एमएसडब्ल्यूसी म्हणजे समाजकार्य महाविद्यालये समाजकल्याण विभागाला जोडलेली आहेत. महाराष्ट्रातील बाकी सर्व कॉलेजेस उच्च शिक्षण विभागाला जोडलेली आहेत. ही कॉलेजेस जर उच्च शिक्षण विभागाला जोडली तर खूप प्रश्न सुटतील असे मला वाटते. या बाबतीत शासन काय करणार आहे ? केवळ महाराष्ट्रातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 17934.... श्री. चंद्रकांत पाटील....

एमएसडब्ल्यू कॉलेजेस, समाजकार्य कॉलेजेस आपल्या खात्याशी जोडलेली आहेत. बाकीची महाराष्ट्रातील सर्व कॉलेजेस उच्च शिक्षण विभागाशी जोडलेली आहेत. त्यामुळे नेहमीच यांच्यावर अन्याय होतो. ही महाविद्यालये आपल्या खात्याशी का जोडलेली आहेत ? ही कॉलेजेस उच्च शिक्षण विभागाशी का जोडत नाहीत ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हे आम्ही जोडलेले नाही. त्यांना वाटत असेल तर आम्ही देण्यास तयार आहोत.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4बुलढाणा जिल्ह्यात लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेत झालेला गैरप्रकार

(4) * 17877 श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर , डॉ.रणजित पाटील , श्री.सय्यद पाशा पटेल : तारांकित प्रश्न क्रमांक 13927 ला दिनांक 31 मार्च, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बुलढाणा जिल्ह्यात लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेत सन 2009 मध्ये झालेल्या गैरप्रकाराबाबत विभागीय आयुक्तांनी चौकशी करुन त्यामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी दोषी असल्याचे नमूद करुन सुध्दा त्यांचेवर 10 महिने कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गत सत्रात सदर प्रश्नाला उत्तर देतांना उक्त प्रकरणी एका महिन्याच्या आत छाननी करुन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेवर कारवाई करण्याचे आश्वासन मा.महसूल मंत्री महोदयांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, छाननी पूर्ण झाली आहे काय, त्यानुसार भरती प्रक्रियेतील गैरप्रकारास जबाबदार असणारे श्री.किशोर कामुने त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1), (2), (3) व (4) या भरती प्रक्रियेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तवासंदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांच्याकडून मागविण्यात आलेली माहिती दिनांक 18.7.2011 रोजी प्राप्त झालेली असून, त्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे आणि माझी आपल्याला विनंती राहणार आहे की, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. त्यामुळे या प्रश्नाला न्याय मिळेल. हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसबंधीचा प्रश्न आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डावलून बुलढाणा जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी नोकरभरतीमध्ये खूप भानगडी केल्या, भ्रष्टाचार केला. लाखो रुपये लोकांकडून घेतले. मी हा प्रश्न मागच्या अधिवेशनात उपस्थित केला होता त्यावेळी माननीय महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले होते. 10 महिन्यांपूर्वी या अधिकाऱ्याविरुध्द चौकशीचा अहवाल दिला असताना कारबाई का केली नाही असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी विचारला असता माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, या सगळ्या बाबीची छाननी एक महिन्यात करतो. कोणी दोषी आढळल्यास एक महिन्याच्या आत आम्ही कारवाई करु. आयुक्तांनी मुख्य सचिवांकडे अहवाल दिला. तो अहवाल त्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या विरोधात होता. त्याच्या विरोधात अहवाल असताना 10 महिने कारवाई केली नाही आणि शासनाने त्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 17877 .... श्री. पांडुरंग फुंडकर ...

फेरचौकशी करण्यास सांगितले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय करीत असताना या अधिकाऱ्याला शासन पाठीशी का घालत आहे ? गेले 10 महिने या अधिकाऱ्याला पाठीशी घालत आहेत. 10 महिन्यात त्याची साधी बदली सुध्दा केली नाही. या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचे कारण काय ? मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी एक महिन्यात कारवाई करतो असे सांगितले होते. पण अजूनपर्यंत त्याच्यावर कारवाई झालेली नाही. म्हणून माझी अशी मागणी आहे की, ज्या अधिकाऱ्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय केला, त्यांना डावलून इतर लोकांना नोकरीत घेतले, त्याला ताबडतोब निलंबित करणार का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सदर अधिकाऱ्याची बदली झालेली आहेच. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मागील अधिवेशनामध्ये सुध्दा हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामध्ये इतर मागासवर्गीय 4 उमेदवार होते. त्यांनी त्यांचा अर्ज भरताना नॉन क्रिमीलेयरचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक होते. ते प्रमाणपत्र त्यांनी जोडले नव्हते. त्यामुळे ते उमेदवार खुल्या प्रवर्गात टाकले गेले.

श्री. पांडुरंग फुंडकर : आयुक्तांनी त्यांच्या विरुध्द काय अहवाल दिला होता ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, नॉन क्रिमीलेयरचे प्रमाणपत्र जोडले नसल्याने त्या विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गामध्ये परीक्षा द्यावी लागली. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जसा या ठिकाणी प्रश्न विचारला त्याचप्रमाणे ती मुले सुध्दा कोर्टामध्ये गेली होती.

श्री. पांडुरंग फुंडकर : आयुक्तांनी शासनाला काय अहवाल दिलेला आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आयुक्तांच्या अहवालामध्ये त्यात दोष आहे असे म्हटले आहे परंतु त्याची सुध्दा छाननी केली जाईल. परंतु हायकोर्टामध्ये दोन याचिका दाखल झालेल्या आहेत. मॅटमध्ये जो निर्णय झाला त्यामध्ये त्यांनी नॉन क्रिमिलेयरची कागदपत्रे जोडण्याची आवश्यक होती पण ती कागदपत्रे जोडलेली नाहीत म्हणून ते खुल्या प्रवर्गात गेले त्यामुळे त्या अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही योग्य केलेली आहे असे स्पष्ट मत मॅटने दिलेले आहे. त्याशिवाय हायकोर्टात सुध्दा याबाबतची याचिका दाखल आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 17877 ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी 1 महिन्याच्या आत कारवाई करु असे सांगितले होते. आयुक्तांनी त्यांच्या विरुध्द अहवाल दिलेला असताना आयुक्तांचा अहवाल फिरविण्याचे कारण काय ? आपण त्याला कोर्टात जाण्याची संधी का दिली ? या ठिकाणी जरी असे आदेश दिले असले तरी आयुक्तांच्या अहवालावर शासन कारवाई करणार की नाही ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आयुक्तांचा अहवाल असला तरी यामध्ये कोर्टाचेही निर्णय होत आहेत. कोर्टाचे निर्णय आपल्याला बंधनकारक आहेत. मॅटने अत्यंत स्पष्टपणे म्हटले आहे की, ज्यांनी नॉन क्रिमिलेयरचे प्रमाणपत्र जोडले नाही, कागदपत्रांची पूर्तता केली नाही त्यांना खुल्या प्रवर्गात टाकले, त्यामध्ये काहीही असयुक्तिक वाटत नाही, योग्य केलेले आहे असे वाटते. ते शासनावर बंधनकारक आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये स्पष्टपणे एक महिन्याच्या आत कारवाई करु असे म्हटले होते. त्या एक महिन्याच्या आत मॅटचा आणि कोर्टाचा निकाल आलेला नव्हता. मॅटचा आणि कोर्टाचा निकाल त्यानंतर आला असेल तर हा कालावधी देऊन त्या अधिकाऱ्याला वाचविण्यासाठी मंत्री महोदय आपण स्वत: किंवा आपल्या अधिकाऱ्यांनी प्रयत्न केला आहे का ? कोणी साधा अधिकारी नव्हे तर विभागीय आयुक्त अहवाल देतात की ते दोषी आहेत. तरीही हे सरकार त्यांना पाठीशी घालते असा संदेश या महाराष्ट्रामध्ये जात आहे. तसा संदेश जाऊ द्यावयाचा नसेल तर कोर्टाचा निकाल आल्यानंतर शासन वरच्या कोर्टात गेले आहे का ? आपली माहिती असत्य आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा किंवा वाचविण्याचा काहीही प्रयत्न नाही. 2 विद्यार्थी हायकोर्टात सुध्दा गेलेले आहेत आणि त्या ठिकाणी केस चालू आहे. यामध्ये कोणताही वाचविण्याचा प्रयत्न नाही. आयुक्तांनी अहवाल दिला असला तरी राज्य शासन त्याची पुन्हा छाननी करु शकते, ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. ती छाननी करीत असताना योग्य निर्णय घेतला जाईल. जे न्यायालयीन निर्णय झालेले आहेत त्याचा सुध्दा विचार करावा लागणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मंत्री महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते हा प्रश्न सभागृहात सातत्याने मांडत आहेत. जे मागासवर्गीय उमेदवार आहेत त्यांच्यावर अन्याय होऊ नये या दृष्टीने त्यांचा प्रयत्न आहे. मला वाटते की, आपण पुन्हा हे प्रकरण स्वत: तपासावे. अपर जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या अहवालाबाबत विभागीय आयुक्त समाधानी नाहीत असे या वरुन दिसत आहे. त्याची आपण खात्री करुन घ्यावी आणि या 3 उमेदवारांना संधी कशी देता येईल त्या दृष्टीने आपण या प्रश्नाकडे पहावे.

श्री.बाळासाहेब थोरात : होय.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारु इच्छितो. आयुक्तांनी निर्णय दिल्यानंतर आता पर्यंत किती कालावधी गेला आहे, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी यापूर्वी देखील हा प्रश्न विचारला होता त्यावेळी शासनाने या सभागृहात असे सांगितले होते की, यासंबंधी तत्काळ कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर किती कालावधी गेला, मॅटमध्ये जाण्यासाठी शासनाकडून किती अवधी दिला गेला, मागासवर्गीय उमेदवारांना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन्माननीय विरोधी पक्ष नेते सतत प्रश्न विचारत आहेत. शासन मात्र त्या व्यक्तीला मागासवर्गीय मुलांवर अन्याय होण्यासाठी व मॅटमध्ये जाण्यासाठी संधी देत आहे. याच्या पाठीमागचा नेमका उद्देश काय आहे, मंत्री महोदय या ठिकाणी नेमके कोणासाठी बसले आहेत ? या राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय करण्यासाठी सरकार येथे बसले आहे असा संदेश राज्याबाहेर द्यावयाचा आहे काय, त्या व्यक्तीला शासनाने किती अवधी दिला, आयुक्तांचे नेमके म्हणणे काय होते ते मंत्री महोदयांनी सभागृहात वाचून दाखवावे. आयुक्तांच्या अहवालावर शासनाकडून तत्काळ कार्यवाही केली जाते. विभागीय आयुक्तांनी रिपोर्ट दिल्याची तारीख आम्हाला सांगावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, परत परत सांगण्याची आवश्यकता नाही. आपण या संदर्भात निदेश दिलेले आहेत. त्या पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल.

सभापती : मी निदेश दिलेले आहेत. परंतु एक दिवस मला ही बाब समजून कशी सांगता येईल हे सुध्दा आपण पहावे.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे

श्री.केशवराव मानकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा पहिला (2011-2012) अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीची बैठक गुरुवार, दिनांक 4 ऑगस्ट, 2011 रोजी दुपारी 4.00 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. या बैठकीमध्ये सर्वश्री नितीन गडकरी, अरुणकाका जगताप व राजेंद्र जैन, वि.प.स.यांच्या रजेचे अर्ज विचारात घेण्यात आले.

श्री.नितीन गडकरी, वि.प.स. यांना पक्षाच्या अधिवेशनासाठी दिल्लीमध्ये रहावे लागल्यामुळे दिनांक 22 मार्च ते 21 एप्रिल, 2011 पर्यंत 23 दिवस, श्री.अरुणकाका जगताप, वि.प.स.हे अहमदनगर महानगरपालिकेची पोटनिवडणूक असल्यामुळे दिनांक 15 मार्च ते 19 एप्रिल, 2011 पर्यंत 28 दिवस व श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. हे प्रकृती ठीक नसल्यामुळे दिनांक 30 मार्च ते 21 एप्रिल,2011 पर्यंत 15 दिवस विधानपरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित असल्याने त्यांनी केलेल्या अर्जावर विचार केला. तसेच विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थितीत राहण्यासंबंधी त्यांनी रजेच्या अर्जात दिलेली कारणे ग्राह्य धरुन त्यांना उपरोक्त कालावधीत विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थितीत राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीची शिफारस सभागृहाने संमत करावी असा प्रस्ताव मी मांडतो.

सभापती : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालात सर्वश्री नितीन गडकरी, अरुणकाका जगताप व राजेंद्र जैन, वि.प.स.यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीकरिता अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी, अशी शिफारस केलेली आहे. तरी अनुमती द्यावी काय ? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

NTK/

विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सभागृहामध्ये विशेष उल्लेखाच्या सूचनेविषयी बोलण्यासाठी माझ्या दालनामध्ये परवानगी मागितली होती. त्यांना मी परवानगी दिलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 1 एप्रिल, 2011 रोजी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. मी त्यावेळच्या सूचनेतील संपूर्ण मजकूर वाचणार नाही. परंतु इंग्रजी भाषेत "कौन्सिल हॉल, महाराष्ट्र" असे लिहिले असून संपूर्ण मजकूर इंग्रजी भाषेत लिहिलेला असल्याचे मी आपल्या निदर्शनास आणले होते. विधिमंडळाच्या कार्यालयाच्या जिन्याजवळ जो इंग्रजी फलक आहे तो तसाच ठेवला आहे. म्हणजे सरकार, मंत्री महोदय, अधिकारी मराठी भाषेत फलक लावण्याची कार्यवाही करीत नाहीत. मी यासंबंधी विशेष उल्लेख मांडल्यानंतर विधिमंडळाच्या सचिवांनी सुध्दा त्याची नोंद घेतलेली नाही. विधान भवनातील तळ मजल्यापासून ते वीस मजल्यापर्यंत आपल्या कार्यालयाच्याच्या कक्षासहित सर्व कक्षांचे क्रमांक इंग्रजीत लिहिलेले आहेत. मी विशेष उल्लेख मांडल्यानंतर संबंधितांना भेटलो होतो त्यावेळी त्यांनी मला बदल करण्यात येईल असे सांगितले होते.

सभापती महोदय, आज सभागृहात येत असताना माझ्या निदर्शनास एक बाब आली आहे. सभागृहाच्या शेजारीच ध्वनिनियंत्रण कक्ष आहे. त्याच्या बाहेर इंग्रजीत "कंट्रोल रुम" असा फलक लावलेला मला दिसला. तो फलक काढून आपल्याला दाखविण्यासाठी मी सभागृहात आणलेला आहे. मला असे वाटते की, मराठी भाषेची सुरुवात येथूनच झाली पाहिजे. त्यासाठी मी प्रत्येक वेळा भेटलेलो आहे. त्यानुसार तळमजल्यावरील फलक बदलण्यात आले आहेत. मी त्याबाबत तक्रार केली नव्हती. परंतु एप्रिल महिन्यात विशेष उल्लेख उपस्थित केल्यानंतरही एकही इंग्रजी फलक बदलण्यात आलेला नाही. आपल्या मंदिरातच अशी परिस्थिती असेल तर सरकार पक्षाला सांगून काय उपयोग होणार आहे ? विधानमंडळ हे आपल्या अधिपत्याखाली असल्यामुळे आपल्याकडे तसे घडू नये असे मला वाटते. मी हा फलक परत देत आहे.

सभापती : विधानमंडळात अनावधानाने जे जे फलक बदलण्याचे राहिले आहेत ते सोमवारपर्यंत मराठी भाषेतून लिहिण्याची सूचना मी विधानमंडळाच्या प्रमुख अधिका-यांना करीत आहे. त्यांनी ही बाब गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. देशाच्या अन्य राज्यांमध्ये माजी सैनिकांना सामान्य करात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून सूट देण्याचा नियम आहे. तथापि, दिनांक 24.7.1979 च्या शासनाच्या परिपत्रकानुसार माजी सैनिकांना या राज्यात या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. राज्यातील अनेक पालिकांमध्ये माजी सैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या करातून सूट दिली जाणे व त्याची परतफेड संरक्षण मंत्रालयाकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेला दिली जाते. बी.पी.एम.सी.ॲक्टच्या कलम 132 मध्ये करामध्ये कोणाला सवलत द्यावी या विषयी तरतूद आहे. त्यात माजी सैनिकांचा समावेश नाही. तथापि, 129 च्या परंतुकानुसार अशी सवलत दिली जाऊ शकते.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात 1,540 माजी सैनिकांनी घरे असून त्यांना कर सवलत मिळणे आवश्यक आहे. परंतु ती त्यांना मिळत नाही. स्पष्ट नियमाअभावी या लाभापासून ते वंचित आहेत. देशासाठी सेवा करणाऱ्या माजी सैनिकांना शहरातील सुविधांचा लाभ मिळावा व करातून सूट मिळावी यासाठी आवश्यक कार्यवाही व आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे. शासनाने ही बाब विचारात घेऊन योग्य कार्यवाही करावी अशी मी विनंती करीत आहे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. डहाणू (जि.ठाणे) परिसरातील आदिवासी विद्यार्थी वसतिगृहामध्ये राहून महाविद्यालयीन शिक्षण घेणारे त्यांच्या वसतिगृहाशी निगडीत समस्या सोडवून घेण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू येथील प्रकल्प अधिकारी यांची भेट घेण्याचा प्रयत्न गत एक आठवडयापासून करत आहेत. कारण प्रकल्प अधिकारी यांनी वसतिगृहाच्या जागा मालकाचे गत 2-3 वर्षांचे घरभाडे थकविले व सध्या जेथे एस.टी.चीही सोय नाही अशा ठिकाणी हलविल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

शासनाने जुन्या वसतिगृहाच्या घरमालकाचे जे काही थकीत भाडे आहे ते त्वरित देऊन जुन्या जागेवरच वसतिगृह सुरु करण्यात यावे व विद्यार्थ्यांना वा-यावर सोडणा-या प्रकल्प अधिका-यावर प्रशासकीय कारवाई करावी.

त्याचप्रमाणे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी तुकडी वाढविली नसल्यामुळे वसई तालुक्यातील 100 विद्यार्थी अजून बाहेर आहेत. तुकडी वाढवून मिळण्यासाठी आम्ही गेल्या दोन महिन्यापासून प्रयत्न करीत आहोत. माननीय आदिवासी विकास मंत्री हे पंढरपूरच्या वारीला गेले होते त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात त्यांच्याशी संपर्क साधता आला नाही. तुकडी वाढवून देण्याची परवानगी दिली तर या 100 विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. तेव्हा याबाबतीत त्वरित कारवाई करावी या दृष्टीने मी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे. आदिवासी विकास मंत्री सभागृहामध्ये आहेत. त्यांनी याबाबतीत सांगावे..

सभापती : मी सर्वच मंत्री महोदयांना सूचना देतो की येथे मांडलेले औचित्याचे मुद्दे हे विधान मंडळा मार्फत सुध्दा आपणास कळविण्यात येतात. या ठिकाणी औचित्याच्या मुद्याला कशा प्रकारे उत्तर देता येईल या दृष्टीने मंत्री महोदयांनी औचित्याच्या मुद्याची नोंद घेणे अपेक्षित आहे.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्यांचा मुद्दा आहे.

"राज्यात केन्द्र सरकार मार्फत राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत व खाजगी विमा कंपनयांच्या सहकार्यातून दारिद्ररेषेखालील कुटुंबाना (बीपीएल) 30 हजार रुपयापर्यन्त आरोग्य विमा योजना 31 जिल्ह्यात राबविली जाणे, त्याकरिता महाराष्ट्रातील आयसीआयसीआय, लोम्बार्ड, चोलामंडलम, दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी आदी कंपन्यांच्या माध्यमातून 39 लाख 84 हजार 466 बीपीएल कुटुंबासाठी योजना राबविली जाणे, परंतु सदर कंपन्याकडून बीपीएल यादीत नाव नसलेल्या कुटुंबांच्या लोकांचे छायाचित्र काढून बोगस स्मार्ट कार्ड तयार करणे, त्यापोटी शासनाकडून विमा कंपनीला 750 रुपये एका कार्डाकरिता दिले जाणे, गत दोन वर्षात शासनाने 126 कोटी 70 लाख 39 हजार 500 रुपये विमा कंपनीला भरलेले असणे, आयसीआयसीआय, लोम्बार्ड कंपनीच्या माहिती संकलन केन्द्रावर दोन बोगस कार्ड असल्याचे आढळून येणे, विशेष म्हणजे 30.6.2011 ला कामगार आयुक्त, अमरावती यांनी बैठक घेतली. त्या बैठकीत लोम्बार्ड कंपनीचे सहाय्यक उपाध्यक्ष यांनी ही चूक झाली असावी असे स्पष्ट केले. तक्रारकर्ते ॲडव्होकेट गजभीये यांच्यासमोर हे कबूल करुन हा विषय गंभीर असून त्याची चौकशी करण्यात येईल असे त्यांनी सांगितलेले आहे. ज्याचे बीपीएलमध्ये नाव आहे त्याचा फोटो काढून दुस-या व्यक्तीने स्मार्ट कार्ड काढलेले आहे. त्यामुळे या प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता आहे. तरी सदर आयसीआयसीआयच्या लोम्बार्ड कंपनीची जेवढी स्मार्टकार्डस् आहेत त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. दोन प्रकारची कार्डे होती. त्या कार्डावर कुटुंब प्रमुख आणि कुटुंबाचे छायाचित्र वेगवेगळे असल्यामुळे यात तफावत दिसून येणे, त्यामुळे शासनाचे पैसे लुबाडण्याचे काम कंपन्याकडून होत असणे, त्यामुळे या होत असलेल्या घोटाळ्याची शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता."

--

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मराठी महाराष्ट्राची राजभाषा असली तरी उपराजधानीत असलेल्या नागपूर विद्यापीठाला मात्र ते मान्य नसते. नागपूर विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमात मराठीचा समावेश फॉरेन लँग्वेज, परदेशी भाषागटात असणे,कायदा अभ्यासक्रमाच्या तिस-या वर्षासाठी नाव नोंदविलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम नजरेखालून घालताना अजब प्रकार कळणे, या प्रकरणी विद्यापीठाशी संपर्क साधला असता, विद्यापीठात कायद्याचा अभ्यास करण्यासाठी अनेक परदेशी विद्यार्थी येतात, त्यांच्यासाठी मराठी परदेशी भाषा आहे असे सांगण्यात येते. मराठीचा परदेशी भाषा म्हणून समावेश करणे ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. शासनाने या बाबतीत तत्काळ नागपूर विद्यापीठाला योग्य तो आदेश द्यावा यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडवा.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यात भारतीय प्रशासक सेवा (आयएएस अधिकारी) यांची मागील अनेक महिन्यापासून सुमारे 40 पदे रिक्त असल्याचे माहे जुलै 2011 रोजी वा त्या दरम्यान आढळून येणे, या 40 रिक्त पदापैकी 11 भारतीय प्रशासकीय सेवा अधिका-यांची पदे भरण्यात येऊनही त्यांना कोणत्याही विभागाचा कार्यभार देण्यात न येणे, सध्या सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक हे पद गेली 18 महिने रिक्त आहे. त्या शिवाय महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामध्ये व्यवस्थापकीय संचालक व वैद्यकीय शिक्षण विभागात प्रधान सचिव यांचे पद व अप्पर मुख्य सचिव, इत्यादी पदे रिक्त असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे 35 उप जिल्हाधिकारी व 15 अतिरिक्त जिल्हाधिकारी अशी असंख्य पदे रिक्त असल्यामुळे राज्यातील अनेक महत्वाच्या विकास कामांना खीळ बसली असल्याचे आढळून आले आहे, त्याचप्रमाणे मंत्रालयातील विविध विभागातील ऑक्टोबर, 2010 अखेरपर्यन्त 56 हजार 371 नस्ती (फाईल्स) निर्णयाच्या प्रतीक्षेत असल्याचे आढळून आले आहे. तरी ही रिक्त पदे त्वरित भरण्याची कार्यवाही शासनाने करावी."

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आपल्या सरकार आणि महापालिका वर्कींग मधल्या रेडटेपिंगचे शिकार असलेल्यांच्या बाबतीत काही ठोस निर्देश द्यावेत अशी अपेक्षा या औचित्याच्या मुद्याद्वारे मी व्यक्त करीत आहे. मुंबईच्या रेड लाईट भागातील सेक्स वर्करांची जी मुले आहेत ती रात्रीच्या वेळी त्या वातावरणात राहू नयेत म्हणून प्रेरणा ही संस्था नाईट केअर सेंटर चालविते. हे नाईट केअर सेंटर कामाठीपुरा येथील 7व्या लेनमधील महापालिकेच्या शाळेमध्ये चालविले जाते. हे नाईट केअर सेंटर चालविल्यामुळे त्या मुलांची शाळेतील गळती कमी झालेली आहे. कारण ती मुले रात्रीच्या वाईट वातावरणात राहात नाहीत. ती मुले वेगळया ठिकाणी रहावीत याची दखल प्रेरणा संस्था घेते. ही संस्था चांगले काम करीत असून मुंबई महानगरपालिका या संस्थेला मदत करते.

ब्राझीलमध्ये भरलेल्या थर्ड वर्ल्ड कॉंग्रेसमध्ये मुंबई महापालिका कशा पध्दतीने या प्रोजेक्टला मदत करते आणि हे प्रोजेक्ट कसे मार्गी लागतात याबाबतीत महापालिकेचे कौतुक करण्यात आले. या नाईट केअर सेंटर मधून शिक्षक, सोशल वर्कर, एमएसडब्ल्यू पर्यन्त शिक्षण घेतलेली मुले बाहेर पडत आहेत. मध्यल्या काळात या 7व्या लेन मधील महापालिकेची शाळा मोडकळीस आल्यामुळे स्वाभाविकपणे ती शाळा सिल करण्यात आली. परिणामी तेथे चालणारे नाईट केअर सेंटर बंद पडले. नवीन नियमानुसार अशा कोणत्याही सामाजिक संस्थांना महापालिकेच्या शाळेमध्ये जागा न देण्याचे धोरण आहे. परंतु जे काही जुने चालू आहे ते पुढे चालले पाहिजे असेही धोरण आहे. आता इमारत मोडकळीस आली नसती तर या प्रेरणा संस्थेचे नाईट केअर सेंटर पुढे चालू राहिले असते. परंतु दुर्दैवाने ही इमारत मोडकळीस आल्यामुळे ते सेंटर बंद पडलेले आहे. ही संस्था मागील 8-10 महिन्यापासून जागा मिळण्याबाबत सातत्याने प्रयत्न करीत आहे. बाजूला खेतवाडी मधील महापालिकेची शाळा जिला दगडी शाळा म्हणून ओळखले जाते त्या शाळेतील दोन खोल्या मिळाव्यात किंवा दुर्गादेवी या महापालिकेच्या शाळेमध्ये नाईट केअर सेंटर चालविण्यासाठी परवानगी दिली तर अतिशय चांगला उपक्रम पुढे चालू राहू शकेल आणि या सेक्सवर्करची जी मुले दुर्दैवाने जन्माला आलेली आहेत त्यांचे आयुष्याचे भले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होईल. या ठिकाणी महिला व बालकल्याण विभागाचे,समाजकल्याण विभागाचे, रिपेअर बोर्डाचे मंत्री सभागृहामध्ये आहेत. या मातब्बर मंत्री महोदयांकडून हा प्रश्न सुटावा म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत असतानाच तिलारी धरणाचे पाणी अचानक नदीपात्रात सोडण्यात आल्यामुळे नदीपात्रला पुराचे स्वरुप येऊन नदीपात्रालगत असलेल्या अनेक गावांना या पुराचा फटका बसला असल्याचे आढळून आले आहे. कुडासे येथील महानंदा राणे व तृप्ती देसाई या दोन महिलांचा या अपघातात मृत्यू झाला असल्याचे आढळून येणे यामुळे नदीकाठावर असलेल्या गावातील ग्रामस्थांना नेहमीच भीतीच्या व चिंतेच्या वातावरणात वावरावे लागत असणे, यामुळे कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक तिलारी धरणाचे पाणी नदीपात्रात सोडणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याची व या अपघातात मृत्यू पावलेल्या सदर महिलांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत त्वरित देण्याबाबत शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे."

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. बुलढाणा जिल्हयातील खामगाव तालुक्यामध्ये पिंपळगाव राजा या गावात शेत गट क्रमांक 170 मध्ये विना परवाना वीटभट्टी सुरु आहे. त्या परिसरातील सर्व वीटभट्टया शासनाच्या अधिकाऱ्यांनी बंद केलेल्या आहेत. असे असताना संपूर्ण तालुक्यामध्ये ही एकच वीटभट्टी अनधिकृतपणे सुरु आहे. मी स्वत: या संदर्भात तक्रार केली असून लेखी पत्र दिलेले आहे. या वीटभट्टी मालकाने कोणतीही रॉयल्टी भरलेली नाही, शासनाची परवानगी घेतलेली नसताना तेथे विटा तयार करण्याचे काम सुरु आहे. दिनांक 18 मार्च, 2011 व दिनांक 23 मे, 2011 रोजी तहसीलदार यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले. वीटभट्टी मालकाने 166 ब्रास इतक्या मातीचा अवैधपणे वापर केला आहे. त्यामुळे तहसीलदारांनी वीटभट्टी मालकाला 58 हजार रुपयांचा दंड भरण्याचे आदेश दिले. असे असताना उप विभागीय अधिकाऱ्यांनी या वीटभट्टी मालकाला अपील करण्यास सांगितले आणि त्यांनी अपील केल्यानंतर उप विभागीय अधिकाऱ्यांनी तहसीलदार यांच्या आदेशाला स्थगिती दिली. या वीटभट्टी मालकाला तहसीलदारांनी यापूर्वी 36720 रुपयांचा दंड केलेला होता व तो त्यांनी भरला होता. परंतु 58 हजार रुपयांच्या दंडाबद्दल अपील केल्यानंतर उप विभागीय अधिकारी आणि वीटभट्टी मालक यांनी संगनमत केले आणि तहसीलदार यांच्या आदेशाला स्थगिती दिली गेली. अवैधपणे वीटभट्टी सुरु असून शासनाच्या कराचे नुकसान होत असल्याने उप विभागीय अधिकारी तहसीलदार यांच्या आदेशाला स्थगिती देतात, या प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. ज्यांनी स्थगिती देऊन शासनाचे 58 हजार रुपयांचे नुकसान केले त्यांची चौकशी करण्यात यावी. संपूर्ण परिसरात ही एकच वीटभट्टी सुरु आहे, या भट्टीच्या मालकाने शासनाची परवानगी घेतलेली नाही. अवैधपणे उत्खनन केले जात आहे. त्यामुळे ताबडतोब वीटभट्टी बंद करुन ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात स्थगिती दिली आहे त्याची चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी, अशी मी माननीय महसूल मंत्र्यांना विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विविध मंडळाला सादर केलेल्या अहवालाद्वारे 1500 ते 2000 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस येणे, सर्वसामान्य माणसांची लूट करुन बिल्डर व राज्यकर्त्यांनी मर्जीतील लोकांना सिडकोने भूखंडांचे वाटप करणे, सिडकोने केलेल्या विविध भ्रष्टाचाराची चौकशी करण्याकरिता तिनईकर, शंकरन समित्या नियुक्त करणे, शंकरन समितीने 347 कोटी रुपयांच्या भूखंड घोटाळ्याबाबत सिडकोच्या कारभारावर ठपका ठेवणे, परंतु शासनाकडून सदर अहवाल दडपून टाकण्यात येणे, तिवरांचा बळी देऊन आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांच्या वनश्री, रेविरिया, शुमुख आदी सोसायट्यांना सिडकोने कोट्यावधी रुपयांचे भूखंड देणे, मार्बल मार्केट, व्हिडियोकॉन, रहेजा, मेट्रोपोलीस आदी समूह यांनाही याच पध्दतीने भूखंडाचे वाटप करणे, दारावे एकीकृत संकूल बांधणाऱ्या एल अँड टी कंपनीला सर्व नियम धाब्यावर बसवून सिडकोने 635.32 कोटी रुपयांचा दंड माफ करणे, असे अनेक प्रकारचे गैरव्यवहार सिडकोकडून सतत दडपले जाणे, त्यामुळे या प्रचंड भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एका बाजूला शासनाला 50 कोटी रुपयांची आवश्यकता असल्यामुळे शिर्डी साईबाबांच्या मंदिरासमोर दारात कटोरा घेऊन हे शासन उभे आहे. दुसऱ्या बाजूला 2000 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार शासनाने नेमलेल्या समितीमार्फत उघडकीस आलेला असताना सिडकोचे अधिकारी शासनाचे जावई आहेत का? करोडो रुपयांचा भ्रष्टाचार सिध्द होऊनही कारवाई का होत नाही? महत्वाच्या ठिकाणचे भूखंड सिडकोच्या अधिकाऱ्यांनी आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या घशात घातले, या मागे कोणाचा राजकीय वरदहस्त आहे? या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करुन शासनाने त्वरित निवेदन करावे अशी मी विनंती करीत आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, मी सांताक्रूझ येथे राहतो आणि मिलन सबवे याच मार्गावरुन मी प्रवास करीत असतो. मिलन सबवे येथे रेल्वे मार्गावरुन उड्डाणपूल उभारण्याचे काम सुरु आहे. उड्डाणपूल ज्या ठिकाणी उभारला जात आहे त्याच्या आजूबाजूला जे लोक रहात होते त्यांना विस्थापित करण्यात आले. या उड्डाण पुलाखाली एक मदरसा बांधण्याचा घाट राज्य शासनातील काही अधिकाऱ्यांनी घातला आहे. एमएमआरडीए आणि महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांकडून देखील या कामाला हातभार लावला जात आहे. सांताक्रूझ-विलेपार्ले भागामध्ये मुस्लीमांची केवळ 400 ते 500 इतकी अल्प लोकसंख्या असताना हिंदू आणि मुस्लीम समाजामध्ये तेढ निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे. उड्डाण पुलाखाली मदरसा उभारणीचे काम सुरु झाले आहे. ज्या ठिकाणी उड्डाणपूल उभारले जातील त्या पुलाखाली कोणतीही दुकानदारी चालवू नये, कोणतेही स्ट्रक्चर असू नये असा स्पष्ट अहवाल मेराणी समितीने शासनास सादर केलेला आहे. मदरसा उभारणीच्या विरोधात विलेपार्ले परिसरात स्वाक्षरी मोहीम सुरु आहे. केवळ 400-500 लोकांसाठी मदरसा उभारण्यात आल्यानंतर त्या भागातील समाज स्वास्थ्य बिघडले जाणार आहे. त्या परिसरातील हिंदूंचे एक देऊळ पूर्णपणे तोडण्यात आले असून एक देऊळ अर्धवट तोडण्यात आले आहे. असे असताना महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी, एमएमआरडीएचे आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी यांनी मिलन सबवे उड्डाण पुलाखाली नवीन मदरसा उभारण्याचा घाट घातला आहे, तो हाणून पाडावा, अन्यथा त्या परिसरात हिंदू मुस्लीम बांधवांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, या सभागृहात स्त्री भ्रूण हत्येसंदर्भातील प्रस्तावावर सोमवारी चर्चा होणार आहे. मी सोमवार, दिनांक 8 ऑगस्ट, 2011 रोजी सभागृहात उपस्थित राहू शकणार नसल्यामुळे मला त्या प्रस्तावावर माझे विचार मांडता येणार नाहीत म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

सभापती महोदय, गर्भजल प्रतिबंधक कायद्यानुसार कोल्हापूरमध्ये एक पॅटर्न तयार केले होते. त्याला कोल्हापूर पॅटर्न म्हटले जाते. कोल्हापूरमधील सर्वच सोनोग्राफी मशिनमध्ये सायलेंट ऑब्झर्व्हर बसविला गेला. या सायलेंट ऑब्झर्व्हरमुळे तेथील स्त्री भ्रूण हत्या कमी झाल्याचे दावा केला जात आहे. आरोग्य संचालक डॉ.डोके यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली, त्या समितीचा अहवाल अद्याप बाहेर आलेला नसला तरी त्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. या अहवालात या दाव्याबाबत काही उल्लेख केलेला नाही. कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री.लक्ष्मीकांत देशमुख यांनी हे सायलेंट ऑब्झर्व्हर सर्व रेडिऑलॉजिस्ट आणि संबंधित वैद्यकीय केंद्र प्रमुखांना 39 हजार रुपयांत विकत घ्यावयास लावले. वास्तविक या सायलेंट ऑब्झर्व्हरची जास्तीत जास्त किंमत 25 हजार रुपये असताना एखाद्या गोष्टीचा गैरफायदा घेऊन त्यातून आपले उखळ पांढरे करण्याचे काम करण्यात आले आहे. स्त्री भ्रूण हत्या होता कामा नये या मताचा मी आहे. परंतु अधिकारी फायदा घेण्याचा प्रयत्न करीत असतील तर ते योग्य नाही. कोल्हापूरमध्ये कोणत्याही ठिकाणी सायलेंट ऑब्झर्व्हर लावल्यानंतर त्याचे चेकिंग केले जात नाही. जिल्हाधिकारी श्री.लक्ष्मीकांत देशमुख यांनी जे काम केले आहे त्याची चौकशी करावी आणि डॉ.डोके यांचा अहवाल सभागृहापुढे सादर करावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 13:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : महोदय, गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे तहसीलदार पदावर कार्यरत असलेले श्री. दिलीप फुलसुंगे यांच्या जाचाला कंटाळून श्री हेमराज सिंह परिहार यांनी दि. 12 जुलै, 2011 रोजी विष प्राशन करुन आत्महत्या केल्याची लेखी तक्रार त्यांच्या पत्नी श्रीमती प्रभाताई परिहार यांच्याकडून प्राप्त होणे, यासंदर्भात त्यांनी मा. विभागीय आयुक्त, नागपूर, मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, गोंदिया, मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे सुध्दा दि. 15 जुलै, 2011 रोजी लेखी तक्रार करणे, परंतु अद्याप जिल्हा प्रशासनाकडून सदर तहसीलदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसणे, त्याचप्रमाणे देवरी तालुक्यातील ग्राम मुल्ला येथील तलाठी मीना अलोणे यांनी श्री. फुलसुंगे यांनी आपल्याला शरीर सुखाची मागणी केल्यामुळे आपण आत्महत्या करणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांपासून शासनापर्यंत केले असणे, त्यामुळे गावकरी आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये सदर तहसीलदाराविषयी पसरलेला असंतोष आणि चीडीची भावना, त्यामुळे सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन सदर तहसीलदारास तात्काळ निलंबित करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया आणि करावयाचे निवेदन. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहात उपस्थित केलेला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. अनिल भोसले : महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा देत आहे.

पुणे शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील नागरी सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या होत असलेल्या हलगर्जीपणामुळे नॉन क्रिमीलेयर, उत्पन्नाचे व रहिवासाचे दाखले वेळेवर मिळत नसणे, तसेच यासाठी दाखले वितरणाची ठिकाणे वाढवूनही जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार प्रचंड गोंधळ होत असणे, एजंटांकडून येणारे अर्ज अगोदर स्वीकारले जाणे, अन्य नागरिकांचे अर्ज मोठ्या प्रमाणात गहाळ करण्यात येणे, परिणामी दाखले घेण्यासाठी आलेल्या पालकांना व विद्यार्थ्यांना दिवसभर ताटकळत ठेवण्यात येणे, मुदत संपूनही पालक व विद्यार्थ्यांना दाखले वेळेवर न मिळणे, तसेच पुरेसे पुरावे देऊनही अर्ज नामंजूर केले जाणे, स्टँपसाठी जादा पैसे घेतले जाणे, याकडे शासकीय अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करुनही कारवाई करण्यात न येणे, त्याचबरोबर नागरी सुविधा केंद्रातील कर्मचारी हे सातत्याने उडवाउडवीची उत्तरे देत असणे, परिणामी दाखल्यासाठी आलेल्या पालक आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात मन:स्ताप सहन करावा लागणे, विहित वेळेत दाखले न मिळाल्याचे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती, याबाबत सखोल चौकशी करुन सदर दाखले विहित मुदतीत न देणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन अर्जदारांना दाखले देण्याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा देत आहे.

मुंबई कफ परेड पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी वसंत लक्ष्मण पवार यांनी अति मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून नाशिक-पुणे महामार्गावरील नाशिक शहरातील शिवाजीनगर येथे गायकर कुटुंबीयांना गाडीने उडविणे, यामध्ये गायकर पती-पत्नी गंभीररित्या जखमी होणे, व त्यांची चार वर्षाची निष्पाप मुलगी शुभ्रता हिचा मृत्यू होणे, स्थानिक पोलिसांनी श्री. पवार यांनी केलेल्या चुकीवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करणे, स्थानिक नागरिकांशी मद्यधुंद अवस्थेतील पवार यांनी अपघात करुनही उध्दट वर्तणूक केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप निर्माण होणे, याबाबत सखोल चौकशी करुन अपघात करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर तसेच त्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी व अपघातात मृत झालेल्या कुटुंबीयांना तसेच जखमींना मदत देण्यात यावी म्हणून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

सभापती महोदय, मी यापूर्वी देखील एक औचित्याचा मुद्दा दिलेला होता, तो मी आपल्या अनुमतीने मांडू इच्छितो.

महोदय, नाशिक शहरासह राज्यात पायरेटेड सीडी व डीव्हीडी द्वारे ब्ल्यू फिल्मची खुले आम व राजरोसपणे विक्री होत असणे. मोबाईल व इलेक्ट्रॉनिक वस्तुंच्या दुकानात पेन ड्राईव्हमध्ये विविध प्रकारच्या घाणेरड्या क्लिप्स काही मिनिटात भरुन मिळणे, दर आठवड्याला अशा प्रकारच्या क्लिप्स व बनावट सीडी आणि डीव्हीडी अन्य ठिकाणाहून नाशिक व मुंबईत आणण्यात येणे, त्यामुळे या प्रकारात मुंबईसह नाशिक व अन्य शहरात मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय, या अश्लील व घाणेरड्या क्लिप्सकडे तरुणांचे वाढत असलेले आकर्षण यामुळे राज्यातील तरुणाई नासविणारे सदरचे धंदे बंद करण्यासाठी शासनाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विशद करावी. यासाठी हा औचित्याचा मुद्दा मांडून मी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : महोदय, मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाचे पुढील विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो :-

महोदय, शासन अनेक वेळा जी.आर. काढते, सूचना देते तसेच परिपत्रक सुध्दा काढत असते, तरी देखील प्रशासन शासनाचे ऐकत नाही, अशा प्रकारचा अनुभव एमएमआरडीए संबंधात आला आहे. या संदर्भात डिसेंबर महिन्यात सभागृहात माननीय परिवहन मंत्र्यांनी सुध्दा आश्वासन दिले होते. तसेच मी सभागृहात हा विषय अनेक वेळा यापूर्वी देखील उपस्थित केला आहे, विधान मंडळाच्या बाहेर देखील यासाठी आंदोलन करुन त्या माध्यमातून हा विषय मांडला, पण यश आले नाही. शेवटी कंटाळून शासनाला सांगितले की, आपण जो जी.आर. काढलेला आहे त्याची अंमलबजावणी होत नसेल, प्रशासन आपले ऐकत नसेल तर किमान तो जी.आर. रद्द तरी करावा.

महोदय, एमएमआरडीए परिसरात रिक्षाला मुक्तपणे परवानगी मिळाली पाहिजे हा माझा विषय आहे. कारण सायनपासून मुंबई मध्ये रिक्षाला बंदी घालण्यात आली आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारे हद्दीचा वाद असू नये असे शासनाने परिपत्रक काढून सूचना दिल्या आहेत. त्यानुसार ठाणे-मुलुंड, घोडबंदर रोड-बोरिवली अशा हद्दीच्या ठिकाणी अनेक वेळा रिक्षाना परवानगी नाही असे दाखविले जाते. त्याचा त्रास अनेक वेळा वृध्द व महिलांना होतो. कारण अशा हद्दीच्या ठिकाणी एका रिक्षातून उतरुन अर्धा किलोमीटर चालून दुसऱ्या रिक्षात बसावे लागते. शासनाने यासंदर्भात परिपत्रक काढून त्याची अंमलबजावणी होत नसेल, शासनाची हा प्रश्न सोडविण्याची धमक नसेल तर किमान हे परिपत्रक मागे तरी घ्यावे. अन्यथा या परिपत्रकाची अंमलबजावणी करावी. ही अंमलबजावणी 15 ऑगस्टपर्यंत केली नाही तर हे परिपत्रक तरी मागे घ्यावे. अन्यथा आम्हाला जबरदस्त शेकडो रिक्षा घेऊन ही हद्द ओलांडावी लागेल. आज तर भारत-पाकिस्तान या दोन देशामध्ये सुध्दा हद्द मोकळी व्हायला लागली पण ठाणे-मुंबईची हद्द एवढी कडक करुन ठेवली म्हणून या प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : सभागृहात जे औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आले त्यांची शासनाने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "विदर्भ मराठवाडा वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याबाबत तसेच कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, यांनी "180 दिवसांची प्रसूती रजा सर्व महिला शिक्षकांना आणि महिला शिक्षण सेवकांना लागू असून महिला शिक्षण सेवकांना मात्र 180 दिवसांची रजा उपभोगल्याबद्दल अतिरिक्त सहा महिने शिक्षण सेवक म्हणून कार्यरत रहावे लागत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करुन बाधित व्यक्तिना त्वरित आर्थिक सहाय्य देण्याबाबत जिल्हा प्रशासन व शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व याकडे जिल्हा प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे जनतेत पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, भगवानराव साळुंखे यांनी "विद्यमान शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग येथे कार्यरत असलेले शिक्षणाधिकारी श्री. महेश करजगांवकर, यांनी केलेली नियमबाह्य कामे व भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री संजय केळकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील यांनी "शैक्षणिक संस्थांपासून 100 मीटरच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घालण्यासाठी केलेला कायदा, त्या कायद्याची

....6....

तालिका सभापती .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंमलबजावणी करण्यास आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर यांनी "मुंबईतील मरीन लाईन्स ते चर्नी रोड येथील शासकीय जमिनीवरील इस्लाम जिमखाना व इतर जिमखाने यांचा प्रत्यक्ष खेळासाठी उपयोग न होता तो विवाह समारंभासाठी भाड्याने देण्यात येणे, मंडप उभारताना मैदानावर पडणारे खड्डे त्यामुळे मैदानाची होणारी हानी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

....7...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :मागील वर्षी बीड जिल्हयात राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत शेतक-यांना वितरित करण्यात आलेल्या बियाण्यांमुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान

मु. शी.:मागील वर्षी बीड जिल्हयात राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत शेतक-यांना वितरित करण्यात आलेल्या बियाण्यांमुळे शेतक-यांचे झालेले आर्थिक नुकसान याबाबत सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गुलाबराव देवकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत आपण बियाणे वाटले. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे शासनाने बियाणे दिले म्हणून पेरले. त्याला शेंगा लागल्या नाहीत. शासन काय म्हणते, धुके, अवकाळी पावासामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्या काळी धुके व अवकाळी पाऊस होता याबाबत हवामान खात्याचा काही पुरावा आहे काय ? शासनाला जर प्रयोग करावयाचा होता तर आमची जमीन भाड्याने घेऊन करायला पाहिजे होता. आता शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. एका हेक्टरमध्ये 8 ते 10 क्विंटल कोरडवाहू तूर निघते. हमी भावाचा विचार केला तर शेतकऱ्याचे नुकसान 35 हजार रूपयाचे आहे. बाजार भावाचा विचार केला तर त्याचे नुकसान 60 हजार रूपयांचे आहे. असे असताना आपण शेतकऱ्यांना फक्त पाच हजार रूपयाची मदत दिली आहे. ती कशाच्या आधारावर दिली आहे ? तूर पीक हे वर्षातून एकदाच येते. दुबार पीक येत नाही माझे पीक गेले, माझे रान काळे पडले. माझे वर्षाचे उत्पन्न बुडाले. हे सत्य असताना त्या शेतकऱ्याने पाच हजार रूपयावर उदरनिर्वाह कसा करायचा ? माझे जेवढे पीक गेले आहे, तेवढा खर्च शासनाले दिला पाहिजे. आपण पाच हजार रूपये दिले म्हणजे माझे पीक गेले हे आपण मान्य करीत आहात. ते कशामुळे गेले हे आपण नंतर ठरवू या. माझे 10 क्विंटलचे पीक गेले असेल तर मला तेवढ्या क्विंटलचे पैसे का देण्यात येत नाहीत ? पाचच हजार रूपये देण्यात का आलेले आहेत ? त्या काळी ढगाळ वातावरण झाले होते, धुके पडले होते, अवकाळी पाऊस पडला होता, याचा पुरावा आपल्याकडे आहे काय ? उगाचच काही म्हणायचे आणि शेतकऱ्यांच्या माथी मारून जिरवून टाकायचे हे बरोबर नाही. त्यामुळे आपण शेतकऱ्यांना 35 हजार रूपयांची मदत देणार आहात काय ? तसेच अवकाळी पाऊस, धुके याचे दाखले सोबत जोडले आहेत काय ? जेवढे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे तेवढे ते दिले पाहिजे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत चार तालुक्यांमध्ये प्लॉट दिल होते. प्रामुख्याने बीड तालुक्यामध्ये तुरीचे नुकसान झाले होते. पिकाची वाढ जोमाने झाली होती, फुलोरा आला होता. त्यावेळी ढगाळ वातावरण होते. धुके आले होते, पाऊस आला होता. त्याचे पुरावा आता माझ्याकडे नसले तरी ते मी नंतर पटलावर ठेवतो. परंतु, या गोष्टीची शहानिशा करण्यासाठी बदनापूरच्या संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

यांना बोलाविण्यात आले होते. त्यांच्याकडून सर्व्हे केला, माहिती घेतली आणि त्यांनी शिफारस केली की, वातावरणामुळे फुलोरा गळला होता व नुकसान झाले आहे. दुसरी गोष्ट आपण विचारली की, पाच हजार रूपयेच मदत का ? ही नुकसान भरपाई नाही. आपण शेतकऱ्यांना अनुदान देण्याचा प्रयत्न करतो. आपला अनुदान देण्याचा प्रचलित जी.आर.आहे त्याप्रमाणे शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रूपये या दराने आर्थिक अनुदान देण्याचा प्रयत्न केला आहे. बीड तालुक्यात 1071 शेतकरी आहेत. त्याचे 984.20 हेक्टर क्षेत्र आहे. त्यांच्यासाठी जवळपास रूपये 49.21 लक्ष रक्कम मंजूर केली आहे. रूपये 44.91 लक्ष इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. आता फक्त रूपये 4.22 लक्ष रक्कम देणे बाकी आहे. आपण येथे 35 हजार रूपये देणार काय, अशी मागणी केली आहे, एवढी मदत शेतकऱ्यांना देता येणार नाही हे माननीय सभागृहाने लक्षात घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तूर डाळीचा प्रकल्प शासनाने शेतकऱ्यांच्या माध्यमातून राबविण्याचे ठरविले. तो शेतकऱ्यांच्या गळी उतरविला असे मी म्हणणार नाही. हा कार्यक्रमच शासनाचा होता. त्याप्रमाणे शासनाने अनुदान देण्याचे ठरविले होते ते शासनाने दिलेही. शेतकऱ्यांनी शासनाचा कार्यक्रम स्वीकारला. यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले हे आपणही मान्य केले आहे. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान बदनापूरच्या शास्त्रज्ञांनी पाहिलेले आहे. शासनाने म्हणणे असे आहे की, बियाणे चांगले होते, तूर आली होती, शेंगा लागल्या होत्या. फुलोरा झाला होता. पण वातावरणामुळे शेतकऱ्याचे पीक नासले. आपला प्रकल्प राबविणे हे निश्चितच चांगले काम आहे. भविष्यामध्ये हा प्रकल्प आपण राबवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. अशा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे भविष्य घडणार आहे. बाकी सगळे कॅश क्रॉप आहे. शेतकऱ्यांचे नुकसान झाले असताना त्यांना आधार दिला नाही तर भविष्यामध्ये शासनाचा हा प्रकल्प इतर शेतकरी स्वीकारणार नाहीत. ही दुर्दैवाने झालेली घटना आहे.नेमका त्यावेळी अवेळी पाऊस आला.दाट धुके पडले. त्याचा परिणाम म्हणून कीड पडली. आपल्याला 35 हजार रूपये देता येत नाहीत हे मला मान्य आहे.मी आपल्याला विनंती करतो की, हे प्रोत्साहित करणारे पीक आहे. भविष्य काळात शेतकऱ्यांचा शासनावरचा विश्वास टिकवायचा असेल तर ह्या बाबत शेतकऱ्यांना आधार दिला पाहिजे. हेक्टरी ऐवजी एकरी मदत दिली पाहिजे. ही मदत 35 हजार रूपये एवढी होणार नाही. एकरी मदत केली तर शेतकरी काही अंशी सांभाळला जाईल. तेव्हा माझी विनंती आहे की, हेक्टरी पाच हजार ऐवजी एकरी पाच हजार रूपये मदत शासन करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्याची सूचना तपासून घेऊन शिफारस करण्यात येईल.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, बायो टेक्नॉलॉजीचा आता उपयोग होत आहे. अशा वातावरणामध्ये फुलोरा गळू नये अशा प्रकारचे वाण विकसित करण्याची कल्पना आपल्याकडे आहे काय ? पाचच हजार रूपये मदत देण्यासंबंधीचे शासनाचे धोरण आहे ते आपण बदलावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय,ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणात बदल होत आहे. यामुळे या सगळ्या वातावरणाला सक्षम राहील असे नव्या पद्धतीचे बियाणे आपल्याला आणता येईल काय, या पद्धतीचा प्रयत्न कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करीत आहोत. अनेक वेळा यासंबंधी सूचना केल्या आहेत, चर्चाही झालेल्या आहेत. निश्चितपणे हा विचार झाला पाहिजे. केंद्र शासनाने कडधान्य विकास कार्यक्रम राबविला आहे. यामध्ये 5037 रूपयांचे निविष्ठाचे पॅकेट शेतकऱ्यांना फुकटात देतो. हीच मोठ्या प्रमाणावर मदत शेतकऱ्यांना झालेली आहे.

.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ. शी. : आश्रमशाळा एकाच पाळीत करणे

मु.शी.: आश्रमशाळा एकाच पाळीत करणे या बाबत सर्वश्री नागो गाणार, रामनाथ मोते,भगवानराव साळुंखे,चंद्रकांत पाटील,रणजीत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचचुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, आदिवासी विकास खात्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांच्या दुरवस्थेबाबत मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या बाबत मंत्री, आदिवासी विकास यांनी दिलेले निवेदन हे असमाधानकारक आहे. यासंबंधी मी आपल्या मार्फत पुढीलप्रमाणे चार प्रश्न विचारू इच्छितो पहिला प्रश्न आहे, आदिवासी विकास खात्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळा दोन पाळीत भरतात हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न देवरी प्रकल्पाकडे कर्मचारी मान्यतेचे एकूण 112 प्रस्ताव प्रलंबित आहेत. ते किती वर्षापासून प्रलंबित आहेत व त्याचा निर्णय किती दिवसात करणार आहात ? माझा तिसरा प्रश्न चंद्रपूर, चिमूर, गडचिरोली, देवरी व भामरागड या ठिकाणच्या प्रकल्प कार्यालयात किती मान्यता प्रस्ताव किती वर्षापासून प्रलंबित आहेत, ते किती दिवसात निकाली काढणार आहात व चौथा प्रश्न आहे की, या आश्रम शाळेतील भ्रष्टाचाराच्या तक्रारींची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी चार प्रश्न विचारलेले आहेत. आश्रमशाळेची वेळ दोन शिफ्टमध्ये करण्यात आली आहे. आदिवासी आमदारांची बैठक बोलावून चर्चेअंती हा निर्णय घेण्यात आला होता. त्यासंबंधी आता परत निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. तशा प्रकारचा निर्णय आपण लवकर घेत आहोत. आम्ही बायोमॅट्रीक सिस्टीम लावू द्यावी अशी एक अट घातली होती. त्यानंतर आम्ही हे करायला तयार आहोत. बायोमॅट्रीकचे काम सुरू झालेले आहे. दिवाळी नंतर ज्या शाळा भरतील त्या शाळेमध्ये हा बदल करून घेण्यात येईल. तेवढा वेळ हा दिलाच पाहिजे. दुर्गम भागात शिक्षक जात नव्हते. सकाळी शिक्षक आल्यानंतर त्याने संध्याकाळ पर्यंत थांबले पाहिजे होते. यात बऱ्याच अडचणी होत्या. बायोमॅट्रीक मशिन्स लावल्यानंतर तो विषय संपणार आहे. दिवाळी नंतर यामध्ये आपण बदल करणार आहोत. कर्मचारी भरण्यासंबंधीचे 112 प्रस्ताव आहेत त्यापैकी 22 प्रस्ताव निकाली काढले आहेत.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ....

सभापती महोदय, त्याचप्रमाणे सभागृहामध्ये येण्यापूर्वी मी चारही एटीसी यांना पत्र लिहिले आहे की, प्रलंबित असलेले सर्व प्रस्ताव विशेष कँप लावून या महिना अखेरीस मला पूर्ण करुन देण्यात यावेत अशाप्रकारच्या सूचना त्यांना दिल्या आहेत. त्याचा मला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. सभापती महोदय, मुळात कधी जास्त प्रस्ताव येतात. त्यांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये काही चुकीचे प्रस्ताव असल्याचे आढळतात. जेवढया प्रस्तावांना मान्यता दिली पाहिजे त्यापेक्षा जास्त प्रस्ताव आले आहेत. प्रस्तावांना मान्यता देण्यापूर्वी शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती, पटावरील विद्यार्थ्यांच्या आणि प्रत्यक्षात हजर असलेल्या विद्यार्थ्यांची उपस्थिती यामध्ये असलेली तफावत या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. त्या करिता स्वतंत्र कँप लावून अभ्यास करण्यात येईल.

सभापती महोदय, आपण बायोमॅट्रिक पध्दत सुरु केल्यानंतर या गोष्टी आपोआपच आपल्याला समजणार आहेत. त्यामुळे त्याबाबत काहीही अडचण होणार नाही. त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील 24 प्रकल्प अधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांच्या बाबतीत विशेष कँप लावून व त्यांचा अभ्यास करुन मला सादर करण्यात यावेत अशाप्रकारच्या सूचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत. सभापती महोदय, ज्या तक्रारी करण्यात आल्या होत्या त्या संदर्भात माहिती घेऊन संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकाच वेळी धाडी टाकण्यात आल्या. त्याचप्रमाणे संस्था चालक आणि कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी त्या तक्रारींची माहिती प्रत्येक महिन्याला घेऊन त्या दुरुस्त करण्याबाबत आयुक्तांना सूचना दिल्या आहेत. त्या आश्रमशाळेमध्ये येणारे विद्यार्थी हे त्या परिसरातील असतात, त्यामुळे त्या आश्रमशाळेबाबत तक्रारी आल्यानंतर त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. त्या आश्रमशाळेमध्ये उत्तम प्रकारचे शिक्षण मिळाले पाहिजे, जेवण उत्तम प्रकारचे मिळाले पाहिजे या करिता सर्व शासकीय आश्रमशाळांच्या इमारती तीन वर्षात बांधण्याचा निर्णय घेतला असून 135 इमारतींच्या बांधकामासाठी 640 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पुढील तीन वर्षात महाराष्ट्रातील सर्व आश्रमशाळा उत्तम प्रकारच्या इमारतीमध्ये सुरु होतील. या इमारतीचे बांधकाम इंटिग्रेटेड करण्यात आले असून त्या ठिकाणी शिक्षकांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, सॅनिटरी, वॉटर हार्वेस्टींग, सोलरची व्यवस्था एकत्र करण्यात आलेली आहे. त्यामुळे आश्रमशाळांच्या बाबतीत वारंवार येणाऱ्या तक्रारी थांबतील असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुणे शहर व जिल्ह्यातील गृहनिर्माण सोसायटयांचे "कन्व्हेअन्स डीड" विकासकाने न करणे

मु. शी. : पुणे शहर व जिल्ह्यातील गृहनिर्माण सोसायटयांचे "कन्व्हेअन्स डीड" विकासकाने न करणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक तीन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्या अनुपस्थित)

तालिका सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

(1.43 ते 2.15 मध्यंतर)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)

पृ.शी. : मौजे वांझोळे येथील वांझोळे भोईवाडा केंद्र शाळेत शालेय पोषण आहारांतर्गत शिजविण्यात आलेल्या आहारामध्ये मेलेल भुंगे व अळया सापडणे.

मु.शी : मौजे वांझोळे येथील वांझोळे भोईवाडा केंद्र शाळेत शालेय पोषण आहारांतर्गत शिजविण्यात आलेल्या आहारामध्ये मेलेले भुंगे व अळया सापडणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 24 जून, 2011 रोजी मौजे वांझोळे (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथील वांझोळे भोईवाडा केंद्र शाळेत विद्यार्थ्यांकरीता शालेय पोषण आहारांतर्गत शिजविण्यात आलेल्या आहारात मेलेले भुंगे व अळ्या सापडल्याचे आढळून येणे, सदर बाब मुख्याध्यापिका तसेच केंद्र प्रमुख, वांझोळे भोईवाडा यांच्या निदर्शनास आणून सुध्दा, शिजविण्यात आलेले तेच दूषित वरणभात विद्यार्थ्यांना खावयास देणे, ही बाब मुलांच्या निदर्शनास आल्याने विद्यार्थी उपाशी रहाणे, वांझोळे भोईवाडा केंद्र शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना विश्वासात न घेणे,यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्रीमती फौजिया खान (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहामध्ये अनेक वेळेला शालेय पोषण आहारा-बाबत चर्चा झाली आहे आणि काल आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळेजी यांनी याच विषयाबाबत अतिशय मोठ्या आवाजात सांगितले होते की, आश्रमशाळेमध्ये पोषण आहार म्हणून देण्यात येणाऱ्या खिचडीमध्ये साप, झुरळे मिळतात आणि याच संबंधाने ही लक्षवेधी सूचना देण्यात आली आहे.मी तालुका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथील वांझोळे गावातील घटना आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. तसेच याच्या बाजूला असलेल्या गोठणे येथील आश्रमशाळेमध्ये देखील अशाच प्रकारची घटना झाली होती. मे महिन्याची सुट्टी संपल्यानंतर शाळा सुरु झाल्या आणि 2011-2012 हे शैक्षणिक वर्ष देखील सुरु झाले.त्या दरम्यानच्या काळातील या घटना आहेत. मी माझ्या लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख केलेला आहे की, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहारामध्ये मेलेले भुंगे,अळया सापडलेल्या आहेत.आपण सर्वांनी सदरहू लक्षवेधी सूचनेचे निवेदन काळजी पूर्वक वाचले तर यामध्ये याचा कोणताही उल्लेख सापडेल की नाही अशी संभ्रमावस्था आहे. परंतु यासंबंधात वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे ती खोटी आहे काय?

याबाबत वर्तमानपत्रातील बातमीमध्ये असे म्हटलेले आहे की,"सदर आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लतिका यादव यांनी जेव्हा तेथील मुलांना आहार दिल्यानंतर मुलांनी तक्रार केली की, यामध्ये मेलेले भुंगे आणि अळ्या आहेत. त्यावेळी मुख्याध्यापिक यांनी मुलांना सरळसरळ दम देऊन सांगितले की, ही गोष्ट घरी जाऊन सांगावयाची नाही. नाहीतर उद्या पासून शाळेत यावयाचे नाही. अशा प्रकारे जर एखाद्या मुख्याध्यापिका यांचे वागणे असेल तर त्यांना राज्य शासनाची जरब कशी रहाणार हा प्रश्न आहे. याठिकाणी मी ते शब्द वापरत नाही पण काही प्रमाणात धान्य किडलेले असल्यामुळे ते साफ करुन वापरण्यात आले आहे. शालेय पोषण आहाराच्या नावावर खराब धान्य खरेदी करतात, मग त्यात अळ्या किंवा मेलेले भुंगे नसले तरी किडलेले धान्य फेकून का देत नाही? यातून राज्य शासनाची मानसिकत दिसते.म्हणून माझा पहिला प्रश्न अस आहे की, याबाबतीत तेथील व्यवस्थापन समितीला जाब विचारण्यात यावा. तसेच या समितीला मुख्याध्यापिका यांनी उलट उत्तरे दिली आहेत हे खरे आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जर आश्रमशाळेतील मुलांना जेवणामध्ये मेलेले भुंगे आणि अळ्या सापडलेल्या नाहीत तर याबाबतीत खोटी तक्रार करण्यात आलेली होती काय ? तसेच मुख्याध्यापिकेने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना याबाबत दम दिला होता काय ? या प्रश्नाचे उत्तर द्यावे.त्यानंतर बाकीचे प्रश्न विचारतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे उन्हाळ्याच्या सुटी पूर्वी तांदूळ साठवून ठेवण्यात आला होता. तो 7 मे 2011 पर्यंत विद्यार्थ्यांना नियमित शालेय पोषण आहार शिजवून देण्यात आला. त्यादिवशी तो पहिल्यांदाच शिजवण्यात आला होता. त्याबाबतीत काही समस्या नव्हती.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

त्यानंतर उन्हाळयाच्या सुट्टया लागल्या. त्या सुट्टयांमध्ये दोन ते अडीच महिने धान्य स्टोअरेज करुन ठेवण्यात आले. कशा प्रकारच्या स्टोअरेजमध्ये ते स्टोअर करुन ठेवण्यात आले होते, हे बघितलेले नाही, पण त्याबाबतची माहिती घेता येईल. त्यानंतर जेव्हा शाळा उघडली तेव्हा 24 तारखेला हे धान्य किडलेले असल्याचे आढळले तेव्हा तेथील सरपंच आणि पोलीस पाटील यांनी तक्रार केली. पंचायत समितीच्या स्तरावर याची चैकशी करण्यात आली असता हे धान्य काही प्रमाणात किडलेले आढळून आल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. हे धान्य स्वच्छ करण्याचे तसेच जे धान्य किडलेले आहे ते बाजूला करुन चांगले धान्य वापरण्यासाठी त्याचे सॉर्टिग करण्यात आले. या संदर्भात मुख्याध्यापकांना आणि शाळेला सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. शालेय पोषण आहाराच्या बाबतीत ही समस्य संपूर्ण राज्यात आहे. आजपर्यंत धान्य साठवून ठेवण्याची सुविधा योग्य नव्हती. लहान जागेत हे धान्य साठवून ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. त्यामुळे अशा प्रकारच्या समस्या निर्माण व्हायच्या. यासाठी राज्य शासनामार्फत 100 टक्के शाळांना हे धान्य ठेवण्यासठी कोठया देण्यात आलेल्या आहेत. आता सगळया शाळा या कोठयांमध्ये धान्य ठेवतात. तरी सुध्दा जोपर्यंत हे धान्य ठेवण्यासाठी मोठया जागा आणि चांगल्या पध्दतीच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार नाहीत, तोपर्यंत ही समस्या सुटणार नाही. या दृष्टिकोनातून राज्य शासनाने एक मोठे पाऊल उचललेले आहे.

सभापती महोदय, किचन शेड्स आणि स्टोअर्स उभे करण्याची केंद्र शासनाची योजना आहे. या योजनेंतर्गत 20 हजार शाळांमध्ये किचन शेड्स आणि स्टोअरेज बांधण्यात आलेले आहेत. त्या शिवाय 40 हजार शाळांमध्ये किचनशेड्स बांधण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.पण यामध्ये थोडी समस्या निर्माण झालेली आहे. या बांधकामसाठी शासनाने निविदा काढून एजन्सीची निवड केलेली आहे. या किचनशेड व स्टोअरेजच्या बांधकामासाठी परहेड 74 हजार रुपये खर्च येणार आहे. पण केंद्र शासना मार्फत फक्त 60 हजार रुपये देण्यात येतात त्यामुळे उर्वरित पैशांची तरतूद राज्य शासनामार्फत करण्यात येणार आहे. 74 हजार रुपये प्रती किचन शेड व स्टोअरेज बांधकाम या प्रमाणे 40 हजार शाळांमध्ये शेड्स आणि स्टोअरेज बांधण्यासाठी एका महिन्याच्या आत राज्य शासना मार्फत तरतूद उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या शिवाय केंद्र शासनाच्या नवीन नॉर्म्सप्रमाणे 1 लाख रुपये पर शेड या प्रमाणे 9200 शेड्स मंजूर झालेल्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

आहेत आणि त्यासाठी 228 कोटी रुपये राज्य शासनाला प्राप्त झालेले आहेत. शाळांची एकूण संख्या 88184 आहे. त्यापैकी 65783 शाळांमध्ये किचन शेड्सची आणि स्टोअरेजची सुविधा लगेच उपलब्ध होणार आहे. उरलेल्या शाळा नगरपालिका आणि महानगरापालिका क्षेत्रातील आहेत या शाळांसाठी केंद्रीय स्वंयपाक योजना लागू करण्यात येणार आहे. या शाळांच्या संदर्भात देखील अर्ज करुन दोन वर्षाच्या आत संपूर्ण राज्यात किचन शेड्स, स्टोअरेज आणि आवश्यक सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी राज्य शासन निश्चितपणे प्रयत्न करील.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये प्रत्येक अधिवेशनामध्ये सातत्याने या शालेय पोषण आहारा विषयी विविध आयुधांच्या माध्यमातून चर्चा होत असते. शालेय पोषण आहार हा गंभीर आणि जटील प्रश्न झालेला आहे. शालेय पोषण आहार देणे हीच शाळांना एक मोठी डोकेदुखी झालेली आहे. आज आपण शहरामध्ये काम करतो. पण शहरातील कुठल्या शाळेतील विद्यार्थी शालेय पोषण आहार घेतात? हा माझा प्रश्न आहे. वाडी, वस्त्या, आदिवासी व दुर्गम भाग, कुपोषित भाग या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना जरुर या पोषण आहाराचा फायदा मिळाला पाहिजे या बद्दल आमचे दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु जिल्हयाच्या ठिकाणचे, तालुक्याच्या ठिकाणचे किंवा ग्रामीण भागातील विद्यार्थी सुध्दा ही शिजवलेली खिचडी घेत नाहीत. आज मुंबई, पुणे या शहरांचे उदाहरण सोडाच पण इतर लहान-लहान गावातील विद्यार्थी हा शालेय पोषण आहार घेत नाहीत. सभापती महोदय, वारंवार अशा प्रकारच्या घटना घडत असतील तर विद्यार्थ्यांच्या जीवनाशी शासन कां खेळत आहे? शासन या पोषण आहाराच्या बाबतीत पुनर्विचार का करत नाही. याबाबतीत ऑप्शन ठेवण्यात यावा. ज्या शाळांना आणि विद्यार्थ्यांना या योजनेची आवश्यकता आहे त्यांनाच ती देण्यात यावी. आज शिक्षक आणि मुख्याध्यापक आचारी झालेले आहेत. आज विद्यार्थी खिचडी खावून गेल्यानंतर उद्या जोपर्यंत तो शाळेत येत नाही तोपर्यंत त्या शिक्षकांच्या आणि मुख्याध्यापकांच्या जीवात जीव नसतो, ही वस्तुस्थिती आहे. कारण या पोषण आहारामध्ये पाल पडते, साप पडतो म्हणजे हे पडण्यापेक्षा त्यामध्ये पाडण्यासारखी अवस्था त्या ठिकाणी असते. या राज्याच्या दृष्टिकोनातून हा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे शासन याचा पुनर्विचार करणार आहे काय?

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी संगितले की, धान्य ठेवण्यासाठी कोठया पुरविण्यात आलेल्या आहेत. या कोठया फक्त जिल्हा परिषदांच्या शाळांना पुरविण्यात आलेल्या आहेत. इतर खाजगी शाळांचे काय? त्यांना किचन शेड्स बांधून देण्यात येणार आहेत काय, त्यांना कोठया देण्यात येणार आहेत का, हा पोषण आहार शिजवणाऱ्या बचत गटांचे मानधन वाढवून देण्यात येणार आहे का? असे अनेक प्रश्न आहेत. ही केंद्र शासनाची योजना आहे, हे आम्हाला मान्य आहे. पण यातून निष्पन्न काहीच होत नाही. या पोषण आहारावर करोडो रुपये खर्च करण्यात येतात. म्हणून या योजनेचा पुनर्विचार का करण्यात येत नाही, केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन या योजनेमध्ये बदल घडवून का आणण्यात येत नाही? हा माझा महत्वाचा प्रश्न आहे. जर यामध्ये सुधारणा करण्यात येणार असतील मग त्या कोठया असतील, किचन शेड्स असतील, किंवा बचत गटांचे मानधन असेल या सर्व बाबींचा खाजगी शाळांना पुरवठा करण्यात येणार आहे का, आणि तो किती दिवसात करण्यात येणार आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत माझ्या असे लक्षात आलेले आहे की, राज्य शासन या योजनेत बदल का करीत नाही असे त्यांना विचारावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे मराठवाडयातून आलेले आहेत, मंत्री महोदया, मराठवाडयातील आहेत, त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे काही सांगितलेले आहे तशी परिस्थिती आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही केंद्र शासनाची योजना आहे. केंद्र शासनाच्या योजनेत बदल करणे किंवा त्यामध्ये मॉडिफिकेशन्स करणे हे एवढे सोपे नाही आणि त्या बाबतीत राज्य शासनाला मर्यादा आहेत. या योजनेच्या चौकटीत राहून राज्य शासन काय करेक्टिव्ह मेझर्स घेऊ शकते, कशा पध्दतीने उपाययोजना करता येतील या दृष्टीनेच शासन प्रयत्न करीत आहे ते मी सभागृहासमोर मांडलेले आहे. एक उपाययोजना किचन शेड्सची करण्यात येत आहे. या किचन शेड्स किती शाळांमध्ये करण्यात येणार आहेत, असा या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आला. ज्या ज्या शाळांना शालेय पोषण आहाराची योजना लागू आहे, त्या सर्व शाळांना हे किचन शेड्स देण्यात येणार आहेत. त्या शिवाय या योजनेमध्ये अनेक दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, शिक्षक आचारी झालेले आहेत. पण आता त्यासाठी स्वयंपाक्याची तरतूद केलेली आहे. विद्यार्थी संख्येनुसार स्वयंपाक्यासाठी मानधन देण्यात येणार आहे. त्यांनी स्वच्छता करावी, पोषण आहार तयार करुन त्यांनीच तो वाढून द्यावा, आणि इतर सर्व कामे करावीत यासाठी दर विद्यार्थ्यामागे असलेली तरतूद वाढविण्यात आलेली आहे. त्या शिवाय नागरी भागामध्ये कॉमन किचन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. काही शाळा क्लब करुन, जास्त विद्यार्थी संख्या घेऊन, मोठया एजन्सीला कॉन्ट्रक्ट देऊन त्यांच्याकडून हा पोषण आहार तयार करुन घेऊन रेडीमेड डबे काही ठिकाणी यशस्वीपणे देण्यात येत आहेत. काही राज्यामध्ये हा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. तशा पध्दतीचा कार्यक्रम आपण देखील राबवावा अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला आहे.त्याचे टेंडर देखील काढण्यात आलेले आहे. या शालेय पोषण आाहराच्या योजनेमध्ये अनेक दुरुस्त्या राज्य शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, यातून तीन प्रश्न उद्भवतात. प्रत्यक्षात कीड ही चणे, वाटाणे अशा कडधान्याला लागते. तांदळाला कीड लागत नाही तर तांदळामध्ये अळ्या होतात. त्या ठिकाणी कीड लागलेले चणे असतील, वाटाणे असतील ते स्वच्छ करुन द्यावे. मी स्त्री असल्यामुळे ते कसे स्वच्छ करावे लागते हे मला माहीत आहे. चणे, वाटाणे किडलेले असतील तर ते स्वच्छ होत नाहीत. त्यांना काढून बाजूला करावयाचे म्हटले तर त्या ठिकाणी ते स्वच्छ करण्याचे काम किती लोक करणार, त्यासाठी शासन त्या ठिकाणी किती पैसे देणार, मजुरीचे पैसे कोणी द्यावयाचे ? आधीच तेथील मुख्याध्यापिका मग्रूर आहे. ती कोणाच्या बापाला ऐकत नाही. मग ते पुन्हा जसेच्यातसे खाऊ घालणार आहेत. म्हणून चणे आणि वाटाण्याची ही जी पोती असतील ती आपण परत घेऊन दुसरी नवीन पोती देणार का ?

सभापती महोदय, आपण ज्यावेळी आपल्या घरी तांदूळ ठेवतो तेव्हा त्याला बोरीक पावडर लावतो. कित्येकदा आपण उन्हामध्ये ठेवतो. चण्याला, वाटाण्याला सुध्दा बोरीक पावडर लावतो. घरी जर आपण बोरीक पावडर लावतो तर त्या ठिकाणी शाळेला थोडी मदत करुन ते खराब होऊ नये म्हणून त्या ठिकाणी आपण बोरीक पावडर सारख्या औषधाचा वापर करणार का ? जे धान्य किडलेले आहे ते परत घेणार का ? पॅकींगची योजना शासनाने रद्द केल्याचे जाहीर केले आहे. त्याला महाराष्ट्रातून प्रचंड विरोध झाला होता. ती योजना पुन्हा मंजूर करुन लोकांमध्ये देणार का ?

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस नेहमी अभ्यास करुन बोलतात. त्यांच्याविषयी आम्हाला आदर आहे. परंतु आता त्यांनी असा उल्लेख केला की, तेथील मुख्याध्यापिका मग्रूर आहेत. त्या महिला मुख्याध्यापिका आहेत. त्यामुळे आपण हा उल्लेख काढून टाकावा असे मला वाटते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, त्या ठिकाणचे सरपंच, उप सरपंच, तंटामुक्ती संस्था या सगळ्यांनी ती आमचे ऐकत नाही अशा पध्दतीने रिपोर्ट केलेला आहे. म्हणून ती मग्रूर आहे असे माझे म्हणणे आहे. स्त्री असली तरी तिने जर मुलांवर अन्याय केला असेल तर ते तिच्या स्त्रित्वाला शोभत नाही. त्यामुळे या हरकतीच्या मुद्याचा विचार करण्याची गरज नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी पंचायत समिती स्तरावरुन झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी धान्य किडलेले असेल, जास्त खराब झाले असेल तर परत घेणार का असा प्रश्न विचारला. पुन्हा एकदा त्या ठिकाणी कशी परिस्थिती आहे ते बघू. सन्माननीय सदस्या स्त्री आहेत, मी सुध्दा स्त्री आहे. ते किती प्रमाणात खराब झालेले आहे हे बघणे गरजेचे आहे आणि ते बघून त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही गरीब मुले आहेत. त्यांनी किडलेले धान्य खावे अशी माननीय मंत्री महोदयांची अपेक्षा आहे का ? किडलेले धान्य फेकून दिले पाहिजे की नाही, आपण ते घरात खातो का, किडलेले धान्य त्या मुलांनी का खावे ? मी सांगितले की, त्या धान्यामध्ये अळ्या आणि भुंगे सापडले. मंत्री महोदय सांगतात की, ते किडलेले होते. एवढे कोट्यवधी रुपये येत असताना त्यांनी किडलेले अन्न त्या मुलांना का द्यावे ? गरिबांची मुले ही मुले नाहीत का ? या संदर्भात ताबडतोब कारवाई करणार की नाही ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी उत्तरामध्ये स्पष्टपणे सांगितले की, ते किती प्रमाणात खराब झालेले आहे हे बघून निर्णय घेऊ.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, जे किडलेले धान्य आहे ते काढूनच टाकले पाहिजे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्याबाबत आपण स्पष्ट सांगावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, किडलेले धान्य असेल तर ते परत घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया असे म्हणाल्या की, ती महिला आहे, सन्माननीय सदस्या महिला आहेत, मी महिला आहे. महिला आहे म्हणून जर असे वाटत असेल तर परवा जो बेशर्मी मोर्चा महिलांनी काढला त्याबाबत आपले काय मत आहे ?

प्रा. फौजिया खान : माझा सांगण्याचा उद्देश असा होता की, स्वयंपाकघरामध्ये काय असते आणि कशी प्रक्रिया करतो हे स्त्रियांना माहीत असते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा दुसरा प्रश्न किचन शेडबद्दल होता.

श्रीमती शोभा फडणवीस : मी औषधाच्या बाबतीत विचारले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : स्टोरेजसाठी ज्या काही सुविधा गरजेच्या आहेत त्या शासनाकडून करण्यात येत आहेत आणि करण्यात येतील. त्या शिवाय किचन शेडच्या बाबतीत नागरी विभागात लोकांकडून तक्रारी कमी आणि प्रशंसाच जास्त आहे आणि हे व्हावे असे लोकांचे म्हणणे आहे. राज्य शासन त्या बाबतीत निर्णय घेणार आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, शालेय पोषण आहार ही एक अतिशय महत्वाकांक्षी योजना आहे. त्यासाठी आपल्याला आवश्यक असलेला सगळा निधी केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणावर प्राप्त होतो. एवढा मोठा निधी प्राप्त झाल्यानंतर त्याचा अतिशय चांगला उपयोग होऊन ज्या उद्दिष्टासाठी हा निधी आपल्याकडे आलेला आहे त्यामधून शाळा सुरु होताना या सगळ्या मुलांची आरोग्य तपासणी केली जाते का ? त्यांना चांगला शालेय पोषण आहार मिळाल्यानंतर त्यांच्या प्रकृतीमध्ये काही सुधार होतो का किंवा आपल्या योजनेमध्ये काही त्रुटी राहिल्यामुळे त्यांची प्रकृती सुधारण्याऐवजी त्यांना वेगवेगळे आजार होऊन त्यांना औषधोपचाराची सोय करावी लागते का ? हे तपासण्यासाठी शासनाजवळ कोणती यंत्रणा आहे का ? महाराष्ट्रात ज्या ठिकाणी ही पोषण आहार योजना सुरु आहे त्याची संख्या आपण काही हजारांमध्ये सांगितली त्यापैकी नमुनादाखल प्रत्येक विभागातील शाळा निवडून त्या ठिकाणी प्रत्यक्षात जे काही झालेले असेल त्याचे मूल्यांकन करुन, त्याची गुणवत्ता तपासून त्यामध्ये कोणता गुणात्मक बदल झाला आणि मुलांना त्याचा काय फायदा झाला हे पाहण्याची काही यंत्रणा शासनाकडे आहे का किंवा तशी यंत्रणा उभी करण्याचा शासन विचार करील का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून शालेय आरोग्य तपासणी नियमितपणे करण्यात येते. तो चांगला कार्यक्रम आहे. त्यामध्ये काही आजार आढळून आले तर काही आजारांच्या बाबतीत शासनाकडून मोफत शस्त्रक्रिया करण्यात येते. अनॅलिसीसच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती चांगली सूचना असून त्याबद्दल जरुर विचार करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या शालेय पोषण आहाराचे काम केंद्र शासनाने देशामधील त्या त्या राज्याकडे वर्ग केलेले आहे. मी माननीय मंत्री महोयांचे उत्तर लक्ष देऊन ऐकत होते. फक्त त्या त्या राज्यांनी त्या पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

योजनेची अंमलबजावणी करताना धान्य किडलेले असेल किंवा त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील तर हे धान्य आमची लेकरे खाणार आहेत. शाळा जून महिन्यामध्ये सुरु होतात आणि आपण जानेवारी महिन्यामध्ये जर एका वर्षाचे धान्य देऊन टाकले तर मे महिन्याच्या सुट्टीमध्ये त्याची देखरेख कोणी करावयाची, त्याची निगा कोणी राखावयाची ? काल मी एक दुसरी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. मुंबई शहरामध्ये सुध्दा यापेक्षा फार काही चांगले कामकाज चालले आहे असे नाही. संडासच्या बाजूला हे सर्व अन्न शिजवले जाते. महाराष्ट्र सरकार सेंट्रल किचनची योजना राबवते. ज्या महिला संस्था किंवा बचत गटामध्ये चांगले काम करणाऱ्या संस्था असतील त्या सर्व संस्थांना एकदा एकत्र बोलावून सांगावे की, तुम्ही सगळे सेंट्रल किचनमध्ये एकत्र येऊन हे अन्न शिजवून द्यावे. असे केले तर चांगले काम होईल. जर मुलांनी किडे-मुंग्या खाल्ल्या तर त्यांची काय अवस्था होईल याबाबत आपण डॉक्टर सन्माननीय सदस्यांना विचारावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्यामध्ये त्यांचा काय प्रश्न होता हे आपण मला सांगावे, मी त्या प्रश्नाचे उत्तर देते.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न होता की, बचत गटांना एकत्र आाणून त्यांना सांगावे. श्रीमती सुप्रिया सुळे हे सर्व काम करतात हे आपल्याला माहीत नाही का, असे सन्माननीय सदस्यांना सांगा म्हणजे संपले.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, एखाद्या सन्माननीय सदस्याने प्रश्न विचारला की, त्याला जोडून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते पूरक प्रश्न विचारतात. हे काय गौडबंगाल आहे, हे कळत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शालेय पोषण आहाराच्या संदर्भामध्ये आम्ही सर्वच अडचणीत आहोत. म्हणजे शिक्षकही अडचणीत आहे, शासन अडचणीत आहे आणि सरकारी अधिकारी सुध्दा अडचणीत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या माध्यमातून शालेय पोषण आहार योजना राबविणे बंधनकारक आहे, त्यामुळे शासनाने ही योजना राज्यात लागू केली आहे. परंतु शालेय पोषण आहार दिल्यानंतर त्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. आहार दिला नाही तर तो का दिला नाही असे विचारल्यामुळे मुख्याध्यापक व शिक्षक अडचणीमध्ये येत आहेत. म्हणून शालेय पोषण आहार योजना काही ठिकाणी कुपोषण आहार योजना झाली आहे. काही ठिकाणी शोषण आहार योजना झाली आहे. या सभागृहात सातत्याने पोषण आहारासंबंधी प्रश्न येत आहेत. शासनालाही यातील अडचणी समजल्या आहेत. या पोषण आहाराच्या प्रभावी नियोजनासाठी एक समिती गठित करुन या योजनेतील समस्यांवर चर्चा करुन, त्यावर विचार करुन त्याच्यातून काय मार्ग काढता येईल. या योजनेत अधिक सुलभता व परिणामकारकता कशी आणता येईल या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

प्रा.फौजिया खान : शालेय पोषण आहार योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी अनेक समित्या व चर्चा सत्रे झालेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या विनंती प्रमाणे पुन्हा एकदा मी आपल्या स्तरावर सर्व सन्माननीय सदस्यांची बैठक बोलवून त्यांच्या महत्वाच्या सूचना ऐकून घेऊन त्यावर अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पत्र्याच्या शेडसाठी 7 हजार रुपये दिले जातील असे सांगितले आहे. आता केंद्र शासनाचे 75 हजार रुपये आले आहेत त्यातून 60 हजार रुपये दिले जाणार आहेत. परंतु आजपर्यंत हे अन्न उघड्यावर शिजविले जात होते काय, तसेच सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी अतिशय गंभीर प्रश्न विचारला होता. त्यांनी सांगितल्या प्रमाणे काही ठिकाणी त्या अन्नात जाणीवपूर्वक अळया किंवा किडे किंवा साप टाकण्याचे प्रकार होतात, असे महाराष्ट्रात कोठे झाले आहे काय, झाले असल्यास, असे प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी शासन काय खबरदारी घेणार आहे ?

प्रा.फौजिया खान : आजपर्यंत आपापल्या परीने शाळेतच अन्न शिजविण्याचे काम केले जात होते. परंतु ते उघडयावर शिजवित होते की खोलीत शिजवित होते ते या क्षणी मला सांगता येत नाही. केंद्र सरकारकडून किचन शेडसाठी पैसे मिळणार आहेत त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा टाकून विभागामार्फत ते शेडस् बांधून दिले जाणार आहेत.

------ 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चंद्रपूर रेल्वे माल धक्क्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप करण्यासाठी आलेला दोन रॅक गहू पावसामुळे भिजणे

मु. शी. : चंद्रपूर रेल्वे माल धक्क्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप करण्यासाठी आलेला दोन रॅक गहू पावसामुळे भिजणे यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, सुभाष चव्हाण, चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्हयात रेल्वे मार्गाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोरगरिबांना वाटप करण्यासाठी दिनांक २२ जून रोजी चंद्रपूर रेल्वे माल धक्क्यावर दोन रॅक माल आला असता अचानक पाऊस आल्याने रेल्वे सायडींग वर उचल करण्याकरीता ठेवण्यात आलेला गहू भिजणे, सदर ओला झालेला गहू गोदामात भरणे सुरू केल्यामुळे शेकडो टन गहू सडण्याची निर्माण झालेली शक्यता, भविष्यात हा सडलेला गहूच सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत जनतेला देण्याची भीती, याबाबत गोदामाचे अधीक्षक एम.एस.आत्राम यांनी गहू सडण्याच्या बाबीला नकार देत काही प्रमाणात ओला झाल्याची पुष्टी करणे, तसेच पुरवठा अधिकाऱ्यांनी गोदामातील गहू उचलला जात नाही तो पर्यंत जिल्हा पुरवठा विभागाचा त्यावर अधिकार राहात नसल्याचे सांगणे, यामुळे ओल्या गव्हाबाबत निर्माण झालेला प्रश्न, यावर शासनाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

श्री.अनिल देशमुख (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, शालेय पोषण आहाराबाबत पहिली लक्षवेधी सूचना होती. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाटप करण्यासाठी दोन रॅक गहू आला होता. मंत्री महोदयांनी हे अन्न आले, गेले, सडले, दिले अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाटप करण्यासाठी करोडो रुपयांचे अन्नधान्य मागविले जाते. त्यामुळे अनेक उद्योगपतीकडून धक्क्यावर करोडो रुपयांचा धान्याचा माल गोदामात येतो. परंतु सरकारी धान्यासाठी ताडपत्रीही नसते. याबाबत ठेकदारावर जबाबदारी टाकलेली नाही, वखार महामंडळाचे इनचार्ज असतात त्यांच्यावर जबाबदारी टाकलेली नाही. रेल्वेवर जबाबदारी टाकलेली नाही, हे सर्व विभाग एकमेकावर जबाबदारी ढकलतात. त्यामुळे असे प्रकार घडतात. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, मे महिन्यात शाळा बंद होतात. त्या ठिकाणी पाण्यामुळे भिजलेले धान्य 3-4 दिवस तसेच ठेवले होते. महिलांना हे प्रश्न चांगले माहीत असले तरी आम्ही सुध्दा आपल्या घरामध्ये धान्य विकत आणत असतो. मी जर भिजलेले धान्य घरात आणले तर माझी पत्नी ते घरात आणू देत नाही. पुरुषांनी विकत आणून दिलेल्या धान्याचे घरातील महिला जेवण तयार करुन देतात. त्यामुळे आपल्यालाही थोडीशी माहिती आहे.

सभापती महोदय, हा जो गव्हाचा साठा आला होता तो सर्व भिजलेला होता. त्याबाबत अनेक वर्तमानपत्रातून बातम्या आलेल्या आहेत. त्याची कात्रणे माझ्याजवळ आहेत, धान्याचे फोटोही आहेत. मालाचा हा धक्का गावात आहे. तेथे उघड्यावर माल ठेवला जातो. माल पुरविणारे ठेकेदार त्याच्यावर ताडपत्रीही ठेवत नाहीत. उत्तरात असे नमूद केले आहे की, ताडपत्रीवर धान्य ठेवले होते. धान्यावर ताडपत्री ठेवलेली नव्हती. ही वस्तुस्थिती असल्यामुळे याबाबत कोणाला दोषी धरण्यात येणार आहे ? शासनाने थोडेसे धान्य भिजले असल्याचे निवेदनात कबूल करण्यात आले आहे. हे धान्य गोरगरिबांना दिले जाणार आहे. असे प्रकार पुन्हा होऊ नये म्हणून शासन खबरदारी घेणार आहे काय व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, हे धान्य आले, गेले, खराब झाले आहे का, असा प्रश्न विचारला आहे. हे धान्य आले आहे हे खरे आहे. परंतु ते कोठेच गेलेले नाही. धान्य तेथेच आहे. जे काही धान्य खराब झाले असेल त्याबाबत दक्षता घेण्यात येईल. मी एक बाब

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय खाद्य निगम हे केंद्र शासनाच्या अखत्यारितीत आहे, राज्य शासनाच्या ताब्यात आलेले नाही. भारतीय खाद्य निगमची अनेक जिल्ह्यात गोदाम आहेत. भारतीय खाद्य निगमकडून हे धान्य दुसऱ्याना स्टोअर करण्यासाठी दिले जाते. वखार महामंडळाला देतात किंवा त्यांची गोदामे भाड्याने घेतात. हे धान्य भारतीय खाद्य निगमचे होते. दिनांक 22 तारखेला एक रॅक धक्क्यावर आली, त्यानंतर दि.23 रोजी एक रॅक आली. दोन दिवसात जवळपास 5 हजार मे.टन धान्य तेथे आल्यामुळे त्यांची अडचण झाली होती असे भारतीय खाद्य निगमने कळविले आहे. तेथे धान्य खराब झाल्याचे एफ.सी.आय.ने मान्य केलेले आहे. हे धान्य शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या वाटपासाठी आलेले नाही. एफ.सी.आय.चे हे धान्य खराब झालेले असेल तर ते सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या वाटपासाठी शासन घेणार नाही.

श्री.विनायक मेटे : सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे धान्य येते. ते राज्याच्या ताब्यात येईपर्यंत काही वेळा पावसात भिजण्याचे प्रकार होतात. त्यामुळे ते धान्य सडते किंवा त्याची नासाडी होते. हे टाळावयाचे असेल तर एफ.सी.आय.ची गोदामे असणे आवश्यक आहेत. महाराष्ट्रात असलेली गोदामे अपुरी आहेत. म्हणून महाराष्ट्र सरकारने त्याबाबत पुढाकार घेऊन गोदामांची व्यवस्था करावी किंवा वखार महामंडळ किंवा एफ.सी.आय.ची गोदामे असतात ती या कामासाठी घेतली जाणार आहेत काय, नसेल तर शासनाने त्याची व्यवस्था करावी, याबाबत शासन ठाम निर्णय घेऊन या पुढील काळात अन्नधान्याचे होणारे नुकसान टाळण्याची खबरदारी घेणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : एफ.सी.आय.च्या माध्यमातून गोदामे मिळविण्याचे प्रयत्न सुरु होते. केंद्रीय अन्न धान्य मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी पी.पी.पी. योजना सुरु केली होती. त्या योजनेद्वारे महाराष्ट्रातच नाही तर प्रत्येक राज्याने पी.पी.पी.अंतर्गत गोदामे बांधण्याची योजना चालू केली होती. त्याचे पहिल्यांदा काढलेले टेंडर एफ.सी.आय.ने ते रद्द केले होते. त्यानंतर दुसरे टेंडर काढण्यात आलेले आहे. आता एफ.सी.आय.च्या माध्यमातून जे टेंडर काढण्यात आलेले आहे त्याची लवकरात लवकर वर्क ऑर्डर द्यावी अशी मागणी केली जाणार आहे. त्यामुळे राज्यात 7.5 लाख मे.टनाची गोदामे बांधता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : काटोल येथील राजीव गांधी मूक, बधीर, अंध आणि अस्थिव्यंग विद्यालयात सहा महिन्यापासून कोणत्याही सुविधा नसल्यामुळे सर्व विद्यार्थी गैरहजर असणे

मु. शी. : काटोल येथील राजीव गांधी मूक, बधीर, अंध आणि अस्थिव्यंग विद्यालयात सहा महिन्यापासून कोणत्याही सुविधा नसल्यामुळे सर्व विद्यार्थी गैरहजर असणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, नागो गाणार,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर जिल्हा परिषदेतील समाजकल्याण समितीच्या वतीने जिल्ह्यातील निवासी शाळांच्या करण्यात आलेल्या पाहणीमध्ये काटोल (जि.नागपूर) येथे सुरु असलेल्या राजीव गांधी मूक, बधीर, अंध आणि अस्थिव्यंग विद्यालयात १८५ विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी हजर नसल्याचे निदर्शनास येणे, सहा महिन्यापासून सदर विद्यालयात कोणतीही सुविधा उपलब्ध नसणे, ५७ कर्मचाऱ्यांपैकी ४७ कर्मचाऱ्यांना सहा महिन्यापासून वेतनच मिळाले नसल्याची बाब समितीसमोर उघडकीस येणे, याशिवाय जिल्ह्यातील बहुतेक वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यल्प असल्याचे उघडकीस येणे, शासनाने याबाबत चौकशी समिती गठित करुन राज्यातील संपूर्ण निवासी शाळा, वसतिगृहांची सखोल चौकशी करुन दोषी संस्थापक, अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, नागपूर जिल्ह्यात समाजकल्याण खात्याच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या मूक, बधीर, अंध आणि अस्थिव्यंग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा होती. त्या निवासी शाळेची संस्था रविंद्रनाथ टागोर बहुउद्देशीय संस्था, पुलगांव यांनी तिन्ही शाळा एकाच ठिकाणी चालू केल्या आहेत व त्या ठिकाणी एकही विद्यार्थी उपस्थित नसल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत मूक, बधीर, अंध व अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी अनुदान दिले जाते. ते अनुदान लाटण्याचे काम या संस्था चालकांनी केलेले आहे. या लक्षवेधी सूचनेबाबत शासनाने सविस्तर व योग्य उत्तर दिलेले आहे. परंतु त्यातून अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे या संस्थेला काळ्या यादीत टाकले जाईल काय ? या तिन्ही शाळा रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाने पाठविलेला आहे. संचालकांना दोन वेळा नोटिसेस दिल्या होत्या, पण त्याचे उत्तर दिलेले नाही. शेवटची सुनावणी दि.8.8.2011 रोजी अपंग कल्याण आयुक्त, पुणे यांच्याकडे होणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ...

हे अधिवेशन संपण्यापूर्वी या तिन्ही शाळांची मान्यता रद्द करण्यात येईल काय, तसेच या तिन्ही शाळांच्या बाबतीत झालेला निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ? 57 पैकी 47 शिक्षकांना सहा महिने पगार दिला नव्हता. 10 शिक्षकांना एप्रिल महिन्यापर्यन्त पगार दिला होता. 47 शिक्षकांना पगार का देण्यात आला नाही याचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ? शाळेची नोंदणीची मुदत 31 मार्च पर्यन्त होती. ही नोंदणीची मुदत संपल्यानंतर या शाळांची मान्यता का रद्द करण्यात आली नाही ? हा प्रश्न केवळ एका जिल्हापुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे. अंध, अस्थिव्यंग, मूकबधिर अशा विद्यार्थ्यांवर अन्याय करणा-या 15 शाळा आहेत. त्या शाळांचा अहवाल आलेला नाही. महाराष्ट्रामध्ये सामाजिक न्याय विभागाअंतर्गत या शाळा चालविल्या जातात. या शाळांच्या बाबतीत कारवाई सुरु आहे असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. अंध, अस्थिव्यंग, मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी ज्या ज्या शाळा महाराष्ट्रामध्ये चालविल्या जातात त्या सर्व शाळांची तपासणी करुन अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय ? अशा अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेची आणि वसतिगृहाची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र समिती गठीत करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. ही समिती केव्हा गठीत करण्यात येईल आणि त्या समितीचा अहवाल किती महिन्यात पटलावर ठेवण्यात येईल ?

श्री. शिवाजीराव मोघे : निवेदनामध्ये सविस्तर असे उत्तर दिलेले असल्याचे सन्माननीय सदस्यांनी मान्य केलेले आहे. या तीन शाळांचे कामकाज सुव्यवस्थित नाही असा समाजकल्याण अधिका-यांचा रिपोर्ट आहे. त्या शाळांना दोन वेळा नोटीसेस दिलेल्या असून दिनांक 8.8.2011 रोजी अंतिम हिअरिंग आहे. त्या हिअरिंग नंतर या शाळांच्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : हा प्रश्न केवळ या शाळांची मान्यता रद्द करण्याचा नाही. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. मूक, बधीर विद्यार्थ्यांच्या नावाने बोगस शाळा चालवून सरकारचा पैसा घेतला जात आहे. अधिकारी सामील असल्या शिवाय अशा गोष्टी घडत नाहीत. शेवटच्या हिअरिंगमध्ये त्या शाळांची मान्यता रद्द होणार असली तरी सुध्दा ज्यांच्या आशीर्वादाने मूकबधीरांच्या टाळूवरचे लोणी खाल्ले जात आहे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय ? शाळांची मान्यता रद्द झाली तरी या मूकबधीर विद्यार्थ्यांच्या नावाने लाटलेले पैसे अधिका-यांना आणि संस्थाचालकांना पचता कामा नयेत म्हणून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे :या संस्थांचा परफार्मन्स बरोबर नव्हता म्हणून त्यांचे नोंदणीपत्राचे नूतनीकरण केलेले नाही. त्या शाळेतील कर्मचा-यांचे पगार देखील एप्रिल पासून बंद करण्यात आलेले आहेत.

श्री. भाई जगताप : माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. प्रश्नाला बगल दिलेली आहे. त्या शाळांना एक्स्टेन्शन दिलेले नसले तरी अपंग, मूकबधिर यांच्या नावाने जे लोक बोगस शाळा चालवित आहेत त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात काय अडचण आहे ? संबंधित अधिकारी आणि संस्थाचालकांना पाठीशी घालण्याचे काय कारण आहे ?

श्री. शिवाजराव मोघे : या प्रकरणी जे कोणी जबाबदार असतील त्यांची आयुक्त, अपंग यांच्या मार्फत, चौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल ?

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी संबंधित अधिकारी आणि संस्थाचालकांवर फौजदारी कारवाई करणार का असा प्रश्न विचारलेला आहे. 1) राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालय, काटोल, जि. नागपूर, 2) राजीव गांधी निवासी अंध विद्यालय, काटोल, जिल्हा नागपूर आणि 3) राजीव गांधी निवासी अस्थिव्यंग विद्यालय, काटोल, जि. नागपूर अशा तीन शाळा राजीव गांधी यांचे नाव घेऊन चालविल्या जात आहेत. या शाळांतील शिक्षक एप्रिल महिन्यापर्यन्त फुकट पगार घेत होते. शाळेत विद्यार्थी नसताना फुकट पगार घेणारे शिक्षकही याबाबतीत जबाबदार आहेत. शाळेत मुले शिकण्यासाठी येत नसताना शिक्षक पगार घेत होते ही अत्यंत गंभीर बाब आहे. राजीव गांधींच्या नावाने शाळा काढल्यामुळे त्या शाळांना मान्यता देण्यात आली असावी. तेव्हा राजीव गांधींच्या नावाने शाळा चालविण्यासाठी राजीव गांधींच्या कुटुंबीयांची परवानगी घेतलेली आहे काय ? नसेल तर त्याबाबतीत संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : मी सुरुवातीलाच सांगितले की, जे अधिकारी जबाबदार असतील त्यांची आयुक्त,अपंग यांच्या मार्फत चौकशी करण्यात येईल. अधिकारी असो, कर्मचारी असो की संस्थाचालक असो, त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल आणि या तिन्ही संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. दुर्दैवाने ज्यांच्यावर परमेश्वरच कोपला आहे अशा जन्माने मूकबधीर, अस्थिव्यंग मुलांसाठी शासनाने काही योजना सुरु केलेल्या आहेत. काही संस्थांनी शंभर टक्के अनुदान घेऊन अशा योजनांचा बट्टयाबोळ केलेला आहे. या बोगस शाळांची मान्यता रद्द केलीच पाहिजे. तसेच या प्रकारास कारणीभूत असलेल्या अधिकारी आणि संस्थाचालकांवर फौजदारी कारवाई केली पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, या शाळेतील विद्यार्थ्यांचे या शाळांची मान्यता रद्द केल्यामुळे नुकसान होईल. तेव्हा या शाळेतील विद्यार्थी दुस-या शाळामध्ये ट्रान्स्फर करण्यात येतील काय ? शाळेची इमारत सुविधायुक्त नसणे, विद्यार्थ्यांची अनुपस्थिती, शैक्षणिक सोयी सुविधेचा अभाव, शैक्षणिक दर्जा नसणे, तिन्ही शाळांचा एकच परिसर असणे, संस्था आणि कर्मचारी यांच्यात वाद असणे अशा त्रुटी आढळून आल्याचे निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. अशा गैरसोयी असतील तर विद्यार्थी शाळेत कसे येतील ? तेव्हा संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन या तिन्ही शाळांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द न करता त्या भागातील दुस-या चांगल्या संस्थांकडे मूकबधीर, अंध आणि अस्थिव्यंग संस्था हस्तांतरित करण्यात येतील काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : आयुक्त अपंग हे आयएएस अधिकारी आहेत. त्यांच्या मार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. तसेच कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. कर्मचा-यांची गॅरण्टी घेतलेली असल्यामुळे कर्मचा-यांचा प्रश्न येणार आहे. तेव्हा ही संस्था दीड-दोन महिन्यामध्ये दुस-या चांगल्या संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येईल.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक.3....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावरील ही लक्षवेधी सूचना आहे. 1995 साली केंद्र शासनाने डिसॅबिलिटी ॲक्ट मंजूर केला. अपंगांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांना त्या कायद्याखाली आणणे आवश्यक आहे. अतिशय महत्वाचा प्रश्न नेहमी निर्माण होतो की, अपंग असलेल्यांना शिक्षण मिळणे हा मुख्य हेतू आहे, त्यामुळे अपंग कल्याण विभागाकडे शिक्षणाबाबत काय हवे आणि काय नको या संदर्भात माहिती असणारे अधिकारी उपलब्ध नाहीत. अपंग विद्यार्थी अपंग म्हणून समाजापासून वेगळे राहू नयेत या उद्देशाने शासनाने वेगवेगळ्या योजना आखलेल्या आहेत. त्यातील महत्वाची योजना म्हणजे इंटिग्रेटेड एज्युकेशन आणि इन्क्लुसिव्ह एज्युकेशन ही आहे. प्राथमिक स्तरावरचे शालेय शिक्षण या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये जाऊन घेणे या कायद्याप्रमाणे नक्की करण्यात आले आहे. असे असताना जे अपंग विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणी राहतात त्यांना एका निवासी शाळेत आणणे आवश्यक राहील. ते त्या ठिकाणच्या शाळेत राहतील. तेथे अपंग विद्यार्थ्यांमागे एक रिसोर्सेस शिक्षक असणार आहे, ज्याने प्रशिक्षण घेतले आहे. सामान्य शाळेत जाणाऱ्या अपंगांसाठी विशेष वर्ग घेऊन त्यांना इतर मुलांबरोबर आणावयाचे आहे. अपंगांबद्दल एवढ्या समस्या या राज्यामध्ये असताना त्याकडे दुर्लक्ष करुन ज्या संस्था योग्य पध्दतीने काम करीत नाहीत त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे संरक्षण आणि अनुदान देण्याची परंपरा कायम सुरु आहे. याचा विचार करुन नवीन धोरण आखण्याची गरज आहे. या संदर्भात मंत्री महोदय विचार करणार आहेत काय?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. ज्या संस्थांना अनुदान मिळते त्या 2002 पूर्वी सुरु झालेल्या आहेत. अशा 138 संस्थांना 2002 पासून ग्रँट मिळते. या संस्था कोणत्या स्वरुपात सुरु आहेत याची चौकशी सामाजिक न्याय विभागामार्फत न करता सीईओ यांनी परस्पर चौकशी करावी असे सांगितले आहे. पात्र संस्था असतील तर त्यांना ग्रँट मिळेल. या पुढील काळात आमच्या विभागाकडून चौकशी केली जाणार नाही. 138 संस्थांची चौकशी झाली आहे, त्या संस्था वगळून सर्व अपंगांच्या संस्थांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, 10 वर्षापासून या संस्था सुरु आहेत. दरवर्षी अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाते, त्या तपासणीमध्ये हे लक्षात आले नाही का? यावर्षी जिल्हा परिषदेच्या वर्ग.1 च्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली तेव्हा ही बाब लक्षात आली. 9 वर्षापासून तपासणी करुन या शाळांचे पाप झाकण्याचे काम ज्यांनी केले त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, यापुढे सामाजिक न्याय विभागामार्फत चौकशी न करता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल. आमच्या विभागाकडून चौकशी संदर्भात मुद्दे दिले जातील. अमुक गोष्टी आहेत की नाही हे पाहून त्या आधारे ग्रँट द्यायची वा शाळा बंद करायची याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मंत्री महोदय अतिशय मोघम उत्तरे देत आहेत. संस्था चालकांना वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अंध, अपंग व मूकबधीर विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. जेव्हापासून या शाळांना अनुदान दिले जात होते ते सर्व अनुदान संस्थाचालक व शिक्षकांकडून वसूल केले जाईल काय? या संदर्भात जे दोषी अधिकारी आहेत त्यांना तात्काळ निलंबित करुन त्यांच्याविरुध्द चौकशी केल्यानंतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : मी यापूर्वीच सांगितले की, अपंग आयुक्त हे आयएएस दर्जाचे अधिकारी आहेत, ते या प्रकरणाची चौकशी करतील. अधिकारी वा कर्मचारी जे कोणी असतील, चौकशीमध्ये जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रेमंड (जि.ठाणे) कंपनीतील कामगारांना त्यांची थकलेली देणी मिळणे

मु. शी.: रेमंड (जि.ठाणे) कंपनीतील कामगारांना त्यांची थकलेली देणी मिळणे यासंबंधी सर्वश्री सुभाष भोईर, हेमंत टकले, प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक २२ ऑक्टोबर, २०१० रोजी सिंघानिया समुहाने जि.ठाणे येथील रेमन्ड कंपनी बंद करण्याबाबत कामगार मंत्री महोदयांच्या समक्ष निर्णय घेताना सिंघानिया कंपनीच्या शाळेत या कामगारांच्या मुलांची फी-सवलत कायम राहील असे स्पष्ट आश्वासन व्यवस्थापनाने देवूनही शाळेतील २३० कामगारांच्या मुलांना प्रत्येकी ३० हजार रुपये फी तातडीने भरण्याचे फर्मान काढून फी न भरल्यास विद्यार्थ्यांना शाळेतून कमी करुन टाकण्यात येईल असा सज्जड दम देण्यात येणे, अगोदरच नोकरी गमावल्यामुळे व कंपनीकडून अद्यापही सर्व देणी न मिळाल्याने आर्थिक संकटात असलेला कामगार वर्ग, फी न भरल्यास त्यांच्या पाल्याचे होणारे शैक्षणिक नुकसान याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4...

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कामगारांना आश्वासन दिल्यानुसार त्यांच्या मुलांची 50 टक्के शालेय फी व्यवस्थापनाने भरावयाची होती. त्याची अंमलबजावणी ही लक्षवेधी सूचना चर्चेला आल्यानंतर झालेली आहे. दिनांक 4.8.2011 रोजी व्यवस्थापनाने करार केलेला आहे. ही नोटीस किती तारखेला दिली होती आणि नोटीस आणि फी भरलेल्या काळात काही विद्यार्थ्यांना शाळेतून काढण्यात आले का? 100 टक्के फी पालकांकडून वसूल केली असेल तर त्यातील 50 टक्के फी कामगारांना परत करण्यात आली आहे काय? करारानुसार कामगारांचे 110 कोटी रुपये पुढील तीन वर्षात देण्याबाबत बँक गॅरंटी युनियनला देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर 10 वी पर्यंत शाळेची फी भरण्याबाबत युनियन किंवा शाळेला बँक गॅरंटी देण्याबाबत शासनाकडून व्यवस्थापनावर बंधन आणले जाईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : ठाण्यामध्ये 1925 पासून रेमंड हा कारखाना सुरु होता. त्या कारखान्यात टाळेबंदी झाली आणि 1855 नियमित व इतर कामगारांना स्वेच्छानिवृत्ती दिली गेली. ते सर्व कामगार स्वेच्छानिवृत्ती स्वीकारुन घरी गेलेले आहेत. मुंबई आणि ठाण्यातील उद्योगपतीना एक आजार जडला आहे. जमिनी विकायच्या म्हणून ते कारखाने बंद करु लागले आहेत. रेमंड कारखाना बंद करण्याचा निर्णय झाला त्यापूर्वी श्री.सिंघानिया यांनी 1970 पासून सुरु केलेली शाळा बंद न करता तेथे कर्मचाऱ्यांच्या मुलांना 50 टक्के सवलत दिली जाईल असे सांगितले होते. परंतु कारखाना बंद पडला त्यावेळी सांगण्यात आले की, कारखाना बंद केला असला तरी शाळा सुरु ठेवणार आहोत, तेथील कामगारांच्या मुलांना सवलती दिल्या जातील. परंतु वृत्तपत्रातून बातम्या प्रसिध्द झाल्यानंतर शासनाने कामगार आयुक्तांमार्फत कामगारांच्या मुलांना सवलती सुरु ठेवण्याबाबत आदेश दिले. एकही विद्यार्थी शाळा सोडून गेलेला नाही. कोणत्याही कामगाराकडून 100 टक्के फी वसूल केलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे 3 वर्षात द्यावयाच्या धनादेशाबाबत बँक गॅरंटी दिली तशी बँक गॅरंटी फी संदर्भात देतील काय याबाबत निश्चितपणे शासन व्यवस्थापनाबरोबर बोलून तशा प्रकारची व्यवस्था करण्याचे प्रयत्न केले जातील.

श्री.भाई जगताप : प्रश्न विद्यार्थ्यांच्या संदर्भात असला तरी शासनाचे मी स्वागत करतो आणि आभार मानतो. विद्यार्थ्यांना फी संदर्भात सवलत मिळाली पाहिजे, ते शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेतलीच पाहिजे. कंपनी आणि युनियनमध्ये करार झाला असे

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

निवेदनात म्हटले आहे. 151 कोटी रुपये व्हीआरएसच्या माध्यमातून कामगारांना द्यायचे ठरले आहे असेही नमूद केले आहे. 151 कोटीपैकी 110 कोटी रुपये तीन वर्षे व्यवस्थापन स्वत:कडे ठेवणार असेल तर तीन वर्ष पगार देणार आहे का? कामगारांचे, कष्टकऱ्यांचे पैसे अशा प्रकारे ठेवता येत नाहीत. अशा पध्दतीची या देशातील एकही व्हीआरएस योजना ऐकिवात नाही.

नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू. क्र. 4..... श्री. भाई जगताप ....

अशा प्रकारे कामगारांची 110 कोटी रुपये एवढी रक्कम जर ठेवणार असाल तर त्या कामगारांना तीन वर्षांचा पगार देण्याची व्यवस्था करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, हा करार आता होऊन गेला आहे. तसेच त्या करारावर मान्यताप्राप्त कामगार संघटनांनी मान्यता सुध्दा दिली आहे त्यामुळे आता प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई जगताप : महोदय, कामगारांच्या स्वेच्छा निवृत्तीची रक्कम अशा प्रकारे करार करुन लिहून घेता येते काय हा महत्वाचा प्रश्न आहे. असे कोणत्याही युनियनने म्हटले तरी शासन त्यासंदर्भात कसे गप्प बसते हेच मला समजत नाही. तो करार योग्य की अयोग्य आहे हे पाहून जर करार अयोग्य असेल तर या कामगारांना पगार देण्याची व्यवस्था शासन करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, हा करार तपासून बेकायदेशीर असल्याचे दिसून आले तर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. रमेश शेंडगे : महोदय, 1830 कामगारांची 43.53 कोटी एवढी रक्कम कायदेशीर देणी व स्वेच्छा निवृत्तीची 151.20 कोटी असे एकूण 194.71 कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. मग यामध्ये 194.71 कोटी अधिक 109.03 कोटी असा हा हिशेब आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, यामध्ये करारानुसार जे ठरले होते ते लेखी दिले व उरलेल्या रकमेची बँक गॅरंटी देण्यात आली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

विशेष उल्लेख

पृ.शी.: भटक्या व विमुक्त तसेच ओबीसीच्या विद्यार्थ्यांना मागील वर्षीची शिष्यवृत्ती अद्यापही न मिळणे

मु.शी.: भटक्या व विमुक्त तसेच ओबीसीच्या विद्यार्थ्यांना मागील वर्षीची शिष्यवृत्ती अद्यापही न मिळणे याबाबत श्रीमती अलका देसाई यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : **सन्**माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

राज्यातील भटक्या व विमुक्त तसेच ओबीसी विद्यार्थ्यांना मागील वर्षाची स्कॉलरशीप अद्यापही देण्यात आली नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी येऊन अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. यामुळे विद्यार्थी व पालक यांच्यात निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, यामुळे या भटक्या व विमुक्त तसेच ओबीसी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी या विद्यार्थ्यांना तातडीने स्कॉलरशीप देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना याकरिता मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: आरोग्य विभागाकडून रिक्त पदांच्या भरतीबाबत होत असलेला विलंब

मु.शी.: आरोग्य विभागाकडून रिक्त पदांच्या भरतीबाबत होत असलेला विलंब याबाबत श्रीमती शोभा फडणवीस यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : **सन्**माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

राज्यातील आरोग्य विभागाकडून आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांच्या मार्फत 5 ऑक्टोबर, 2008 ला प्रयोगशाळा तंत्रज्ञ 1007 पदांच्या भरतीबाबत जाहिरात देण्यात येणे, व त्या अनुषंगाने दि. 14 फेब्रुवारी, 2010 ला राज्यातील विविध केंद्रांवर सदर पदाची लेखी परीक्षा घेण्यात येऊन त्याबाबत पात्र उमेदवारांची दि. 24 जून ते 7 जुलै 2010 या कालावधीत मुलाखतीची प्रक्रिया पुणे येथील संचालनालयाच्या कार्यालयातून पार पाडली जाऊनही अद्याप नियुक्ती झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्र देण्यात न येणे, सदर यादीत गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील बाळू मदन मडावी, मु. फरारा, ता. चामोरशी येथील विद्यार्थ्यांच्या यादीत नाव असूनही अद्याप नियुक्ती पत्र न मिळणे, तीन वर्षे लोटूनही अद्याप नियुक्ती पत्र न मिळाल्यामुळे सदर पात्र उमेदवार नोकरीपासून वंचित होणे, त्यामुळे उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने सदर उमेदवारांना त्वरित नियुक्ती पत्र देण्यासंबंधी करावयाची कार्यवाही. त्याकरिता वरील विषयासंबंधीचा मुद्दा मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: के.ई.एम. रुग्णालयातील हृदय शल्य विभागात असलेला सोयी-सुविधांचा अभाव

मु.शी.: के.ई.एम. रुग्णालयातील हृदय शल्य विभागात असलेला सोयी-सुविधांचा अभाव याबाबत श्री. प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

मुंबई महापालिकेच्या परळ, केईएम रुग्णालयाच्या हृदयशल्य विभागात जंतू संसर्गामुळे सुमारे 10 रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच उघडकीस आली, या रुग्णालयात राज्यातील शेकडो रुग्ण हृदयावरील उपचार करण्यासाठी येत असणे, रुग्णांच्या वाढत्या संख्येने त्या ठिकाणी सोई-सुविधा कमी असल्याने रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत नसणे, या आधी सुध्दा या रुग्णालयात 254 हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणे, त्यापैकी 46 रुग्णांचा मृत्यू होणे, या रुग्णालयामध्ये हृदय शस्त्रक्रिया विभागात मृत्यूचे प्रमाण वाढत असल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, यापुढे असे प्रकार होणार नाहीत याची दक्षता घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात बनावट पॅनकार्ड तयार करणारे रॅकेट कार्यरत असणे

मु.शी.: राज्यात बनावट पॅनकार्ड तयार करणारे रॅकेट कार्यरत असणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

बनावट मालमत्ता धारकांची माहिती मिळवून बनावट पॅनकार्ड तयार करणारे मोठे रॅकेट राज्यभर कार्यरत असणे, यातून कोट्यवधी रुपयाच्या भुखंडांची विक्री, राज्यात किमान 30 हजार बनावट पॅनकार्ड, शिधा पत्रिकेतील गोंधळ अशा खाजगी एजंटांमार्फत पॅनकार्डचा दुरुपयोग करणे, प्राप्ती कर व विक्रीकराच्या करदात्यांसाठी वापरला जाणारा टॅन व पॅन तपासणीत नाशिकचे 1100 क्रमांक मिसमॅच असणे, मुंबईत सर्वाधिक बोगस, मुंबई व सुरत याबाबतचे बनावट रॅकेट, त्यात शोध गोपनीयता राखणे, कार्यवाही क्लिष्ट असल्याने सरकारने हात टेकले असणे, लाखो रुपयांच्या भुखंडाच्या विक्रीचा दस्त मुद्रांक शुल्क विभागाकडे नोंदणी करुन विकण्यास आले, 6 लाखात 3000 कार्ड बनविण्याचे कंत्राट मिळावे, बनावट कार्डच्या आधारे वैद्यकीय क्षेत्रात फसवणूक, देशात प्राथमिक माहितीनुसार 13 लाख बनावट पॅनकार्ड एकापेक्षा अधिक कार्ड असल्यास 10 हजार रुपये दंड यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. अशा प्रकारे खाजगी कंत्राटदारांना पॅनकार्ड बनविण्याचे काम दिल्यामुळे असा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे, म्हणून संबंधितांवर शासनाने कारवाई करावी.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ग्रंथालयांच्या सेवाविषयक बाबी व अनुदानात वाढ करणे

मु.शी.: ग्रंथालयांच्या सेवाविषयक बाबी व अनुदानात वाढ करणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

राज्यातील गावागावांत सुरु असलेल्या शासनमान्य ग्रंथालयांना महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम 1967 मधील तरतुदीनुसार अनुदानाची तरतुद असणे, परंतु राज्यात सदर योजनेतील 11 हजार 754 ग्रंथालयांच्या अनुदान वाढीचा प्रश्न गेल्या सात वर्षापासून शासनस्तरावर प्रलंबित असणे, त्यामुळे प्रामुख्याने "ड" वर्गातील वाचनालयांना कमालीची कसरत करावी लागत असणे, "ड" वर्गातील वाचनालयाला मिळणाऱ्या वार्षिक 20 हजारातून किमान 5 हजार रुपये कर्मचाऱ्यावर, अडीच हजार रुपये इमारत भाडे , तीन हजार रुपये वर्तमानपत्रासाठी, एक हजार रुपये मासिकांकरिता आणि वार्षिक अहवाल सादर करण्याकरिता दीड हजार रुपये आणि शिल्लक रक्कमेतून वाचकांच्या आवडीची पुस्तके खरेदी करण्याचा प्रश्न वाचनालयांना भेडसावणे, संदर्भात मार्च 2011 च्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या ताराकित प्रश्न क्र. 14975 ला शासनाकडून असमाधानकारक उत्तर प्राप्त होणे, त्यामुळे राज्यभरातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या सोवाविषयक बाबींमध्ये एकसुत्रता आणणे आणि वाचकांचे समाधान करण्यासाठी सदर ग्रंथालयांच्या अनुदानात तातडीने वाढ करण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही आणि निवेदन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात शेतकऱ्यांना तुषार व ठिबक सिंचनाचे अनुदान न मिळणे

मु.शी.: राज्यात शेतकऱ्यांना तुषार व ठिबक सिंचनाचे अनुदान न मिळणे याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : समाननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

संपूर्ण देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील सिंचनाखालील जमिनीचे प्रमाण बरेच कमी आहे. संपूर्ण भारतामध्ये सरासरी 46 टक्के जमीन सिंचानाखाली असताना महाराष्ट्रामध्ये केवळ 18 टक्के एवढीच जमीन सिंचनाखाली आहे. उपलब्ध पाण्यामध्ये जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली येण्याकरीता तुषार व ठिबक सिंचनाचा जास्तीत जास्त वापर करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी तुषार व ठिबक सिंचनाचा वापर करावा या करिता त्यांना 50 टक्के अनुदान देण्यात येते सन 2010 च्या दरम्यान तुषार व ठिबक सिंचन वापरण्यास शेतकऱ्यांना आणखी प्रोत्साहन मिळावे या हेतूने 75 टक्के अनुदान या दोन्ही सिंचनाकरीता देण्याची घोषणा करण्यात आली. परंतु या घोषणेची अंमलबजावणी अद्याप झाल्याचे दिसून येत नाही. उलटपक्षी 50टक्के दराने तुषार व ठिबक सिंचनाचे सन 2010 -2011 चे अनुदान अद्याप मिळालेले नाही. तुषार व ठिबक सिंचनाचे पाईप व इतर साहित्याची किंमतसुध्दा नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे.अन्यथा वाढलेल्या अनुदानाचा लाभ केवळ खाजगी कंपन्याना मिळण्याची शक्यता आहे. ते होऊ नये म्हणून तुषार व ठिबक सिंचनाचे पाईप व इतर साहित्याची किंमत नियंत्रणात ठेवण्यास्तव व शेतकऱ्यांना घोषणा केल्याप्रमाणे 75 टक्के अनुदान देण्याकरीता मा. कृषी मंत्री महोदयांना सूचित करावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे.

...8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सुरक्षेसाठी कोणत्याही उपाययोजना नसणे

मु.शी.: पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सुरक्षेसाठी कोणत्याही उपाययोजना नसणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. मोहन जोशी : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

पुणे शहरातील शिवाजीनगर, खडकी, चिंचवड रेल्वेस्थानक, स्वारगेट एस.टी. स्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय, मध्यवर्ती शासकीय कार्यालय, ससून रुग्णालय आदि अतिशय महत्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी सुरक्षेसंदर्भात कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे माहे जुलै, 2011 रोजी वा त्यादरम्यान आढळून येणे, काही ठिकाणी येणा-या प्रत्येक प्रवाशाची तपासणी करण्यासाठी प्रवेशाच्या ठिकाणी लावण्यात आलेले मेटल डिटेक्टर मागील काही महिन्यांपासून बंद अवस्थेत पडून असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे काही महत्वाच्या ठिकाणी लाखो रुपये खर्च करण्यात येऊन खरेदी करण्यात आलेली मेटल डिटेक्टर मागील काही महिन्यांपासून धूळ खातच पडली आहेत. पुणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी असतांनाही बॅगांची तपासणी करणारे मेटल डिटेक्टर बाजूला झाकून ठेवण्यात आले आहेत. शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी असलेल्या पार्किंगच्या ठिकाणी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात न आल्याने सुरक्षेसंदर्भात कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचे आढळून आले आहे. जर्मन बेकरी बॉम्ब स्फोटानंतर शांत असलेल्या पुण्याच्या या प्रतिमेला तडा जावूनही मागील 2 वर्षात पुण्याच्या सुरक्षेसाठी कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. यामुळे पुणेकरांमध्ये निर्माण होत असलेली भितीचे व चिंतेचे वातावरण, सबब शासकीय कार्यालय, व गर्दीचया ठिकाणी सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्याची आवश्यकता, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री. जुन्नरे ...

पृ. शी. :मॅगेसेस पुरस्कार मिळालेल्या श्रीमती निलीमा मिश्रा यांचा शालेय पाठय पुस्तकात परिचय करुन देणारे धडे समाविष्ट करण्याबाबत

मु. शी. :मॅगेसेस पुरस्कार मिळालेल्या श्रीमती निलीमा मिश्रा यांचा शालेय पाठय पुस्तकात परिचय करुन देणारे धडे समाविष्ट करण्याबाबत श्री.हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : मा□□य सदस्य श्री.हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यातील जळगाव जिल्हयात महिला बचतगटांची चळवळ यशस्वीपणे चालविणा-या श्रीमती निलीमा मिश्रा यांना सन 2011 चा प्रतिष्ठेचा मॅगसेसे आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. हयापूर्वी कै. डॉ. आरोळेंपासून अनेक मान्यवरांना हा पुरस्कार मिळाला आहे. राज्यातील शालेय शिक्षणाच्या पुस्तकांमध्ये हया व्यक्तींच्या कार्याचा परिचय करुन देणारे धडे समाविष्ट करण्यात यावे त्यायोगे विद्यार्थ्यांना हया व्यक्तींची व कार्याची ओळख होवून चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. हयाबाबतीत त्वरित पावले उचलावीत यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अशासकीय कामकाज-विधेयके</u>

पृ.शी.: लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VIII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPALOKAYUKTA ACT, 1971.)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 8, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम,1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 8, मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IX OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.)

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 9, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम,1976 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 9, मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: इमारत बांधकाम व्यवसायातील कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) विधेयक

L.C. BILL NO. III OF 2011

(A BILL TO REGULATE THE SERVICES OF NON-UNITED AND UNSECURED LABOUR WORKING IN THE BUILDINGS CONSTRUCTION INDUSTRY IN THE STATE AND TO MAKE PROVISIONS FOR THEIR WELFARE AND THE MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.)

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 3, राज्यातील इमारती बांधकाम व्यवसायातील असंघटित व असुरक्षित कामगारांच्या नोकरीचे नियमन व त्यांचे कल्याण यासाठी आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबीसाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, राज्यात विशेषत: मुंबई शहर, मुंबई उपनगर तसेच राज्याच्या इतर ठिकाणी झपाटयाने बांधकामे होत आहेत. बांधकाम व्यवसायाची झपाटयाने वाढ होत आहे. गरजू लोकांच्या निवा-याची अथवा निवासाची गरज लक्षात घेऊन ही वाढ होत असली तरी या बांधकामासाठी जो कामगार मजूर घाम गाळतो, राबतो त्याकडे मात्र दुर्लक्ष होत चालले आहे. बांधकामाच्या ठिकाणी जे मजूर काम करतात ते परिस्थितीने खूप गरीब असतात व त्यांच्या कौशल्याच्या व मेहनतीच्या मानाने त्यांना पैसे मिळत नाहीत, मात्र बांधकाम व्यावसायिक या व्यवसायात वारेमाप पैसा कमावून अल्पावधीत गर्भश्रीमंत झाल्याची उदाहरणे आपल्याला अनेकदा पहावयास मिळतात. परिणामी बांधकामातील कामगारांचे शोषण होत असल्याचे आढळून आलेले आहे. बांधकाम कामगारांमध्ये असुरक्षिततेची भावना दिवसेंदिवस वाढीस लागली आहे. अशा असंघटीत असुरक्षित कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून त्यांना दिलासा देण्यासाठी कायदा करण्याची नितांत आवश्यकता आहे. ज्या प्रमाणे माथाडी हमाल अथवा सुरक्षा रक्षक यांच्या कल्याणासाठी शासनाने जशी सुरक्षा मंडळे स्थापन केलेली आहेत तशीच मंडळे बांधकाम कामगारांसाठी स्थापन करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांच्या कल्याणाच्या योजना शासनाने राबवाव्यात अशी विनंती आहे. ..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

सभापती महोदय, राज्यामध्ये वेगवेगळया इंडस्ट्रीज आहेत. या इंडस्ट्रीजमध्ये काम करणा-या 40 टक्के लोकांमध्ये कामगार म्हणून ज्या शब्दाची गणना केली जाते त्या 40 टक्क्यामध्ये मग ती ऑटोमोबाईल इंडस्ट्रीज असो, फार्मास्युटीकल इंडस्ट्रीज असो, आयटीमध्ये काम करणारी असो या सर्वांमध्ये बांधकाम कामगार येत असतो. तसेच काही सर्व्हीस इंडस्ट्रीजमध्ये काम करणा-यांमधील एक भाग हा बांधकाम कामगारांचा देखील आहे. बांधकाम कामगारांकडे बघण्याचा जनतेचाच नाही तर आपल्या सर्वांचा दृष्टिकोन वेगळा होत चालला आहे. बांधकाम कामगारांना गरजे पुरते वापरुन सोडून दिले जाते अशी या कामगारांची व्यथा आहे. आपल्याकडे समाजातील सर्व वर्ग वेगळया नजरेने पाहतो असे त्यांना वाटत असते. शहरीकरणामुळे बांधकाम व्यवसाय मोठया प्रमाणात वाढत चालला आहे. बहुतेक वेळा कारखाने ग्रामीण भागात न जाता शहरामध्येच सुरु होत असतात. परंतु बांधकाम व्यवसायातील कामगार शहरामध्ये आणि ग्रामीण भागात सुध्दा आढळून येत असतात. बांधकाम कामगार हे शहरी आणि ग्रामीण भागात रात्रंदिवस काम करत असल्याचे आढळून येत असतात.

बांधकाम व्यावसायिकाला बांधकामाच्या सुरुवातीला शासनाची, महानगरपालिका, नगरपालिकांची परवानगी घेतल्यानंतर वारंवार परवानगी घ्यावी लागत नाही. बांधकाम व्यावसायिकाला शासनाची, महानगरपालिका, नगरपालिकांची परवानगी घेतल्याशिवाय बांधकामाला सुरुवात करता येत नाही. बांधकाम व्यावसायिकाच्या कामाची सुरुवात शासन दरबारी होत असतांना देखील बांधकाम कामगार उपेक्षितच राहत असतो. बांधकामाची परवानगी घेत असतांना जमिनीवर रिझर्व्हेशन असेल, डीसी रुलमध्ये फरक असेल किंवा हायराईज कमिटी कडून किंवा बीएमसी कडून बांधकामाची परवानगी घ्यावी लागत असते. वेगवेगळया परवानग्या घेतल्यानंतर बांधकामास खरी सुरुवात होत असते. बांधकामाला सुरुवात झाल्यानंतर..

यानंतर श्री. भारवि...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

त्या साईटवर जाणाऱ्या कामगाराला रोजगार मिळण्यास सुरूवात होते. त्या अगोदर एखादा व्यवसायी सरकारी कार्यालयात जाऊन आल्या नंतर त्याच्या कामाला सुरूवात करतो. त्याच्या कामाला सुरूवात झाल्यानंतर ज्या हाताला आपण काम पुरवितो त्यांची परिस्थिती काय आहे, याचा विचार करीत नाही. काम पूर्ण झाल्यानंतर देखील काही परवानगी घ्याव्या लागतात. ज्याला आपण ओ.सी.म्हणतो. या सर्व प्रक्रियेमध्ये म्हणजे काम सुरू झाल्यापासून काम संपेपर्यंत जो प्रमुख वर्ग काम करतो, एका चांगल्या जमिनीवर, चांगला टॉवर उभा करतो तो कामगार मात्र आपल्या मूलभूत हक्कपासून उपेक्षित राहतो. एखाद्या चांगल्या मूर्तिकाराने मूर्ती बनविली तर त्याचे आपण कौतुक करतो. चित्रकाराचे देखील त्याच्या कलेचे भरभरून कौतुक करतो. मात्र, ज्याने चांगले टॉवर बांधल्यामुळे एखादी ओळख निर्माण होते त्या कामगारांची स्थिती काय आहे, त्या कामगाराला नक्की काय मिळते आहे, त्याला मूलभूत हक्क, सोयी सुविधा मिळतात काय, याचा साधा विचारही केला जात नाही. कारखान्यातील काम करणाऱ्या कामगारांना पी.एफ.देतो, ग्रॅज्युईटी देतो, वयो मर्यादाची अट असते आरोग्याची सवलती असतात, निवृत्तीचे फायदे असतात यातील कोणती सुविधा आपण त्यांना देतो ? पी.एफ., ग्रॅज्युईटीचे सोडा, कामगार किती वाजता येतो आणि किती वाजता जातो याची साधी कल्पना त्या व्यावसायिकाला नसते.

काही ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट सिस्टीम सुरू झालेली आहे. आता बांधकाम व्यवसायामध्ये ऑन कॉन्ट्रॅक्ट ठेवण्याची पद्धत सुरू झालेली आहे. त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. याचा दुरूपयोग इंडस्ट्रीमध्ये सर्रासपणे करताना दिसून येत आहे. आपण कामगार नेमला आहे, कॉन्ट्रॅक्टर नेमला आहे. जर कामगाराने युनियनच्या मार्फत मालकाकडे न्याय मागण्याचा प्रयत्न केला तर त्याला न्याय मिळत नाही. तो मालक एकच सांगतो की, मी कॉन्ट्रॅक्टर नेमले आहे. त्यामुळे आपण कॉन्ट्रॅक्टरशी बोलावे. तुम्ही माझे एम्प्लॉयर होऊ शकत नाही. बांधकाम व्यवसायी एक असतो तो एकाला कॉन्ट्रक्ट देतो आणि तो कॉन्ट्रॅक्टर दुसऱ्याला सब कॉन्ट्रक्ट देतो. त्यामुळे ते कामगार प्रिन्सिपल एम्प्लॉयर कोणाचे आहेत, त्यांचे खरे मालक कोण आहेत ? तो सब कॉन्ट्रॅक्टर आहे की तो मालक आहे. आज बांधकाम व्यवसायामध्ये अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

ग्लोबलायझेशनचा विचार मनामध्ये आणून विकसनशील देशासारखे आम्ही आमचे टॉवर वाढवित आहोत. आज मुंबईमध्य स्पर्धा सुरू झाल्यामुळे कुठे 50 मजल्यांचा, कुठे 90 मजल्यांचा टॉवर बनत आहे. आज मुंबईत 140 मजल्यांचा टॉवर उभा राहिलेला आहे. थरावर थर रचणारे कामगार आहेत, त्यांच्या सेफ्टी, सिक्युरिटीसाठी ज्या ज्या काही सुविधा वापरणे आवश्यक आहे त्या वापरल्या पाहिजेत. हेल्मेट, बेल्ट, शूज कामगारांनी वापरले पाहिजे हे नियम फक्त कागदावरच राहिलेले आहेत. मुंबई शहरामध्ये नव्हे महाराष्ट्रा मध्ये सेफ्टी आणि सिक्युरिटीसाठी जे नियम आहेत त्याचे पालन बांधकाम व्यावसायिकांनी केले नाही तर तेथे कामगारांना पाठविता येणार नाही असे धोरण स्वीकारले तर एकही टॉवर शहरामध्ये उभा राहणार नाही. हे सर्व नियम कागदावरच ठेवले आहेत. नियमानुसार कोणतीही कारवाई केली जात नाही. वर्षानुवर्षे असेच चालले आहे.

हा व्यवसाय बघितला तर हा परंपरागत व्यवसाय आहे. जो सुतार काम करणारा आहे, त्याचे वडील देखील सुतार होते. वडिलां बरोबर साईट वर जाऊन सुतार काम करू लागला. गवंडी काम करणाऱ्याचा मुलगा गवंडी काम करीत आहे, प्लंबरचे काम करणाऱ्याचा मुलगा प्लंबरचे काम करतो. चांगले मार्बल लावायचे असतील तर आपण म्हणतो राजस्थानचे कडिया आणायचे. आपण हे सर्व मान्य करतो. पोवाडा गाणारा असेल तर आपण म्हणतो की, त्याचे वडील चांगले पोवाडा गाणारे होते म्हणून त्याचा सन्मान केला जातो. चित्रकला असेल तर ती दुसऱ्या पद्धतीने मांडली जाते. सुतार, गवंडी, ही परंपरागत कामे केली जातात. राजकीय नेत्यांविषयी प्रश्नच येत नाही. काहीही काम न करता फ्लेक्सवर फोटो लावायचा आणि मुंबईभर प्रदर्शन करायचे ही गोष्ट वेगळीच आहे. ती अनुवंशिकतेनुसार आहे. असे जरी असेल तरी जे उपेक्षित कामगार आहेत त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपण मल्टी नॅशनल कंपनी हे एक गोंडस नाव दिलेले आहे. चांगल्या कंपनीत काम करणारा कामगार असेल तर गाडी दिली जाते, बारावी पास असलेल्या एअर होस्टेसला घरातून नेण्यासाठी गाडी असते. ती काम काय करते तर विमानात व्हेज, नॉनव्हेजचे पुडे खायला देते. पण तिच्यासाठी घरातून गाडी असते. आयपीओ,बीपीओ मध्ये काम करणाऱ्यांना गाडयांची सुविधा आहे. ह्या कामगाराला साईटवर राहण्यासाठी स्वत:चे घर देखील मिळत नाही. ते घर म्हणजे कसे असते तर एखाद्या खोपटीसारखे असते. त्या झोपडीमध्ये त्याने आपल्या मुला-

..3

श्री.किरण पावसकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाळांसह त्या साईटवर रहायचे असते. त्या साईटचे काम संपले की, दुसऱ्या जागेवर स्थलांतरित करायचे. काम संपण्याची वेळ नाही, आरोग्या सारखी सुविधा नाही.

मधल्या काळात मुंबई शहरात मलेरियाची साथ आली होती. त्यावेळी सर्व विचारवंत अधिकाऱ्यांनी विचार केला की, मलेरियाची साथ ज्या ज्या ठिकाणी बांधकामे सुरू आहेत तेथे पाणी साठल्यामुळे सुरू झाली आहे. मग त्या जागेवर महानगरपलिकेने फवारणी करण्यास सुरूवात केली. ही फवारणी खरी मालकांवर व्हायला पाहिजे होती पण ती झाली साईटवर साठलेल्या पाण्यांवर. संपूर्ण मुंबईला मलेरियाचा विळखा पडतो म्हणून फवारणी करण्याचा निर्णय घेतला. तो फार चांगला आहे. त्या साचलेल्या डबक्यातील डासांमुळे मलेरिया होतो म्हणून फवारणी करीत आहात. परंतु, त्याच पाण्या जवळ बांधकाम क्षेत्रातील कामगारांची कुटुंबे राहतात. वर्षानुवर्षे ते त्या साईटवर रहात आहेत, त्यांच्या आरोग्या विषयी शासनाने किंवा बिल्डरने कोणताही विचार केलेला नाही. आपण मुंबईतील जनतेसाठी फवारणी केली पण तेथे रहात असलेल्या कामगारांच्या मुलांसाठी फवारणी केली असे कधीच झालेले नाही. या कामगारांची गणना होऊ शकत नाही. याला कारण आहे.

जनगणना झाल्यानंतर सर्व म्हणतात की, महाराष्ट्राची लोकसंख्या एवढी आहे. मुंबईमध्ये एवढे लोक राहतात. देशामध्ये एवढे लोक राहतात. बाहेरे गावावरून या व्यवसायात येणारे कामगार किती आहेत याची गणना कुठल्या तरी सरकारी यंत्रणेत आहे काय ? यात इतर राज्यातील नागरिकांसह, बांगलादेशी नागरिक देखील आहेत. हे कामगार वेगवगळ्या ठिकाणी रहात आहेत. पुलाखाली रहात आहेत. साईटवर रहात आहेत. यांच्या जनगणनेसाठी सरकारी यंत्रणा राबविली जाते. यामध्ये काम करणारे मजूर किती आहेत, स्त्रिया किती आहेत, मुलांचे प्रमाण किती आहे, याची सरकारी यंत्रणेकडे नोंद आहे काय किंवा भविष्यामध्ये अशी नोंद मिळावी म्हणून प्रयत्न करीत आहोत काय ? या सभागृहात ज्या ज्यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झाली तेव्हा शहरात फक्त लोंढे येतात असे म्हणतो. मागे असे एक आंदोलन झाले होते. म्हणून पुणे-पिंपरी-चिंचवड मधून काही लोकांना पळवून लावले होते. ज्यावेळी लोक घाबरून गेले त्यावेळी तेथील काही उद्योग बंद पडले. तेथील काम थांबले. तेव्हा आपल्याला कळले की, यु.पी., बिहार मधून आलेले लोक आपल्याकडे किती काम करत होते.

यानंतर सरफरे....

अशोधित प्रत/शोधनीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

ज्या कामगाराच्या घरावर नंबर टाकलेला नाही, जो कामगार कुठे राहतो त्यांचा पत्ता नाही, त्याला रेशनकार्ड मिळत नाही, त्याला लाईट मिळत नाही तरीसुध्दा तो काम करुन पोट भरतो. त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आपण पाहिले तर त्याची कोणत्याही प्रकारची आपल्याकडे नोंद नाही. आपण आज पहातो की, या शहरामध्ये किती बांगलादेशी नागरीक आले आहेत?

एखाद्या दुसऱ्या राज्यातील कामगाराचे वडील सुरुवातीला या शहरामध्ये अकुशल काम करण्यासाठी आल्यानंतर कालांतराने ते कुशल काम करु लागले, ते नावारुपाला आल्यानंतर या शहरात कुठेतरी एखादी झोपडी बांधून राहतात. कालांतराने त्या झोपडीचे पुनर्वसन करीत असतांना त्याला एस.एस.आर. योजनेमधून घर मिळाले. अशाप्रकारे या कामगारांची या शहराला लागण लागलेली आहे त्यामध्ये या व्यवसायामधील कामगारांना सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत अशी आपण मागणी करीत असलो तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने या व्यवसायामध्ये किती कामगार काम करतात? याची आपल्याकडे नोंद नाही. हे सर्व लोक स्थलांतरीत असतात. आज ते पुण्याला तर उद्या नागपूरला काम करण्यासाठी जातात. ज्यांचे स्वत:चे घरदार नाही अशा लोकांची सरकारी यंत्रणेमध्ये नोंद नाही त्यामुळे या लोकांची किती संख्या आहे याची सरकार दरबारी नोंद नसल्यामुळे आपण सांगू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या सुविधेचा प्रश्न उपस्थित करीत असतांना राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने देखील हा एक महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, प्रत्येक बांधकाम व्यावसायिकाच्या साईटवर किती कामगार काम करीत आहेत याची नोंद होत नाही. बिल्डर्सची फक्त एकच भूमिका असते की, आपण मंत्रीमहोदयांकडे जावयाचे, शासन दरबारी जावयाचे, प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे जावयाचे आणि आपल्या बांधकामाला परवानगी मिळाल्यानंतर आपला कॉट्रॅक्ट दुसऱ्याला द्यावयाचा. त्यामध्ये काही राजकीय पक्षाचे लोक असे सांगतात की, तुला काम मिळाले आहे आता तू आमचे काम कर, मुंबईवर आमचे वर्चस्व असल्यामुळे तुला जर यापुढे अडचण येऊ नये असे वाटत असेल तर 15 ते 20 टक्के आम्हाला द्यावेत. अशाप्रकारचा एक नवीन व्यवसाय त्यामध्ये सुरु होतो. अशावेळी तो काम करणारा व्यावसायिक कुणाकडे जाणार आहे? आज आपण पहातो की, प्रत्येक बिल्डर, किंवा प्रत्येक बांधकाम व्यावसायिकाकडे त्याच्याकडे डायरेक्टर भरपूर आहेत, वेगवेगळे पार्टनर आहेत. ती कुणाची जबाबदारी आहे, ते कामगार कुणाकडे काम करीत आहेत? अशावेळी जर एखाद्या कामगाराचा अपघात झाला तर मग सर्व जण हात वर करतात. सभापती महोदय, मी ज्या दिवशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

हे विधेयक पुरस्थापनार्थ या सभागृहामध्ये मांडले त्या नंतर आजपर्यंत वर्षभरामध्ये 60 कामगार मृत्युमुखी पडले आहेत. यामध्ये कुणी उंचावरुन पडले आहे, कुणाच्या डोक्याला मार लागला आहे. परंतु मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना आजपर्यंत आपण काहीही मदत दिलेले नाही. या बाबतीत त्या ठिकाणी काम करीत असलेल्या सुपरवायझरवर कारवाई होते. तो सुध्दा एकप्रकारे कामगार असतो त्यावर आपण कारवाई करतो, त्याच्याविरुध्द एफ.आय.आर. दाखल केला जातो, त्याने न केलेल्या गुन्हयाची नोंद होते, त्याला कामापासून बाजूला ठेवले जाते. परंतु जो बांधकाम व्यावसायिक आहे, जो मालक आहे, जो त्या व्यवसायामधून करोडो रुपयांचा नफा कमावितो त्याच्यावर आजपर्यंत सरकार दरबारी किंवा शासनातर्फे कोणतीही कारवाई झालेली नाही. ज्या बांधकाम व्यावसायिकाच्या टॉवरवर काम करीत असतांना एखादा कामगार खाली पडून मृत्युमुखी पडला तर त्याला तो बिल्डर जबाबदार राहील तो, कॉंट्रॅक्टर जबाबदार राहणार नाही. या बाबतीत आपण नियम तयार करणार आहात की नाही?

मंत्रीमहोदय, मला आपणाला विचारावयाचे आहे की, ज्या कंपन्यांनी कॉंट्रॅक्टर नेमले आहे, त्या कॉंट्रॅक्टरना त्यांचे पैसे मिळाले नाहीत व अशावेळी त्या कामगाराला अपघात झाला तर प्रिन्सिपल एम्प्लॉयर म्हणून त्या कंपनीच्या मालकावर कारवाई करता. अशाप्रकारे बांधकाम व्यावसायिक म्हणून काम करणाऱ्या बिल्डरवर गुन्हा दाखल कां केला जात नाही? एखाद्या सुपरवायझरविरुध्द आपण गुन्हा नोंदवायचा, आणि सगळयांना सांगावयाचे की, एफ.आय.आर.मध्ये नोंद झाली असून संबंधित माणसाला अटक करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरामध्ये 60 माणसे मृत्युमुखी पडणार असतील तर ती संख्या कमी नाही. एखादा पोलीस अधिकारी जनतेचे रक्षण करण्यासाठी समोरच्याबरोबर दोन हात करतांना जर चुकीच्या पध्दतीने मारला गेला तर त्याविरुध्द मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करुन त्याला तुरुंगामध्ये टाकले जाते. अशाप्रकारे जाँबाज अधिकारी जनतेचे रक्षण करीत असतांना तुरुंगात जात असेल तर दुसऱ्या बाजूला करोडो रुपयांचा फायदा कमाविणाऱ्या बिल्डरच्या टॉवरवरुन पडून मृत्युमुखी पडलेल्या कामगारासाठी त्याविरुध्द कोणतीही कारवाई करणार नसाल तर ते चुकीचे होणार आहे. त्यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे तरच त्याला आळा बसेल. या बाबतीत बांधकाम व्यवसायाकरिता सेफ्टी आणि सिक्युरिटीचे जे निकष आपण ठरविले आहेत ते केवळ कायद्याच्या पुस्तकात न ठेवता ते उपयोगात आणून त्या मधून या कामगारांना आपण नक्कीच दिलासा देऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकतो. त्याचप्रमाणे आज बांधकाम व्यवसायामध्ये जास्तीत जास्त महिला साईटवर काम करीत असतात.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे बांधकामाच्या साईटवर महिला सुध्दा जास्तीत जास्त काम करीत असल्याचे आपल्याला दिसते. त्या साईटवर एका बाजूला आई-वडील काम करीत असतांना दुसऱ्या बाजूला लहान मुलांचा सर्रासपणे वावर सुरु असतो. ती लहान मुले वीटा आणि रेतीबरोबर खेळतांना दिसतात. तो मुलगा मोठा झाल्यानंतर त्याच्या डोक्यावर विटांचे घमेले दिले जाते. त्याला सांगितले जाते की, तू दुसऱ्या मजल्यापर्यंत तरी दोन-दोन वीटा घेऊन जा. अशाप्रकारे या लहान मुलांना बांधकाम व्यवसायामध्ये कळत न कळत ओढून घेतले जाते. याची जाणीव म्हणून 14 वर्षाखालील मुलांना कामावर ठेवण्यात येऊ नये असा आपण कायदा केला. तशाप्रकारच्या 25 ते 26 केसेस आपल्याला आढळल्या. भिवंडी येथील यंत्रमागावर, गिरण्यांमध्ये, हॉटेलमध्ये, गॅरेजमध्ये काम करणाऱ्या मुलांना पकडले गेले आहे. परंतु बांधकाम व्यवसायामध्ये किंवा मोठया प्रकल्पावर लहान मुले काम करीत असतांना शासनाने त्या बांधकाम व्यावसायिकावर कधी कारवाई केली आहे काय? त्यावेळी कारवाई झाली असती तर या लहान मुलांना त्यांच्या आई-वडिलांबरोबर कामावर ठेवले गेले नसते ती मुले बाजूला राहिली असती. त्यांच्या शिक्षणाचा बटयाबोळ आहे. याचे कारण हा कामगार कायम स्थलांतरीत असल्यामुळे आज मुंबईला काम करतो तर काही दिवसानंतर अंबरनाथला काम करावयास जातो . त्यामुळे त्या मुलांकरिता शिक्षण किंवा शाळा हा विषय त्यांच्या नशिबामध्ये नाही. अशा लहान मुलांना त्या कामामध्ये गुंतवू नये, जर गुंतविल्यास त्या बांधकाम व्यावसायिकावर कडक शासन करण्याची कायद्यात असलेली तरतूद आपण वापरली पाहिजे, त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचप्रमाणे महिला कामगारांची संख्या जास्त असल्यामुळे इतर ठिकाणी काम करणाऱ्या महिलांसाठी मिळणाऱ्या सवलतीचा फायदा सुध्दा या महिलांना मिळाला पाहिजे.

तालिका सभापती : या विधयेकावरील चर्चेसाठी एक तासाचा वेळ दिलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय,विधेयकावर बोलण्यासाठी वेळेचे बंधन नाही...

तालिका सभापती : काल अशासकीय विधेयके व ठराव समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये या चर्चेकरिता 1 तास 50 मिनिटांचा अवधी देण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, नियमानुसार अशासकीय ठरावाला वेळेचे बंधन आहे, परंतु विधेयकाला वेळेचे बंधन घालता येत नाही, विधेयकावर सन्माननीय सदस्य कितीही वेळ बोलू शकतात. आपण नियम तपासून पहा.

तालिका सभापती : बैठकीमध्ये ठरविल्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालविले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अशासकीय कामकाजाला अडीच तासाच्या वेळेचे बंधन घातले आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. किरण पावसकर: सभापती महोदय, आपण मला बोलण्याकरिता अधिक वेळ दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. आपण मला हा न्याय देत असतांना बांधकाम व्यवसायामध्ये काम करणाऱ्या कामगारांना न्याय मिळाला तर मी आपला आभारी राहीन. मी आता सभागृहाचा अधिक वेळ न घेता एवढेच सांगतो की, या कामगारांच्या कामाची वेळ आपण ठरविली पाहिजे. इतर ठिकाणी कामगारांच्या कामाची वेळ ठरविली जाते. त्याप्रमाणे या कामगारांच्या कामाची वेळ शिफ्टप्रमाणे ठरविली गेली पाहिजे. काही ठिकाणी कॉंट्रॅक्टर त्यांना खाणे-पिणे देऊन त्यांच्या कामाच्या वेळेच्या बाबतीत त्यांची दिशाभूल करीत असतात. म्हणून त्यांच्याकरिता आपण नियम तयार केले पाहिजेत. आज मिळालेले काम पुन्हा केव्हा मिळेल याची त्यांना शाश्वती नसते. एखाद्या बिल्डरचे किंवा कंत्राटदाराचे ब्रिज, रस्त्याचे पाचशे ते हजार कोटींचे काम सुरु असेल, अशा मोठया कामाच्या ठिकाणी त्या कॉंट्रॅक्टरने कामगारांना तीन ते पाच वर्षाच्या कालावधीसाठी ऑन कॉंट्रॅक्ट ठेवल्याचे आपण पाहिले आहे काय? अशाप्रकारे कोणत्याही कामगाराला तीन ते पाच वर्षाच्या कालावधीसाठी ऑन कॉंट्रॅक्ट म्हणून साईन केलेले डॉक्युमेंट आपल्याला सापडणार नाहीत. हे कामगार केव्हा निवृत्त होणार याची निश्चित अशी कालमर्यादा ठरविलेली नाही. त्यांना अंधत्व आले, अपंगत्व आल्यानंतर त्यांचे हातपाय चालत नाही, ते जास्त वेळ काम करु शकत नाही, याकरिता ते बांधकाम व्यवसाय करण्यासाठी येत नाहीत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणजे नैसर्गिकरित्या आपण काम थांबविले की तो कामगार रिटायर झाला अशी त्याच्या संबंधातील एक भूमिका मांडली गेली आहे. जेव्हा तो कामगार नैसर्गिकरित्या रिटायर होत असताना, आपण अशा कामगाराला किती वर्षे सेवेमध्ये ठेवावयाचे याबाबत नियमावलीमध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही. बांधकाम व्यवसायातील कामगारांची वयोमर्यादा काय असावी आणि त्यानंतर आपण त्या कामगाराला स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर काय देणार आहोत हे ठरविले पाहिजे.

सभापती महोदय, आपल्या देशामध्ये जास्तीतजास्त नफा देणाऱ्या इंडस्ट्री म्हणून ज्या ओळखल्या जातात अशा ठिकाणी त्यांचे स्वत:चे कामगार मात्र सुख-सोयी उपलब्ध होण्याच्या बाबतीत फार लांब अंतरावर उभे आहेत. म्हणून गेल्या दोन वर्षामध्ये केंद्र शासनाने 2008 मध्ये असंघटित कामगारांसाठी कल्याणकारी कायदा केला. परंतु तो अपूर्ण असून त्यामध्ये सेवाशर्ती व कल्याणकारी असे दोन भाग केलेले आहेत.केंद्र शासनाने 2008 मध्ये कायदा केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी किती होत आहे, त्याचे पर्सेंटेज काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न केला तर मला असे वाटते की, त्याचे झिरो पर्सेंटेज असू शकेल. कारण या कायद्यामध्ये सेवाशर्ती बाबत अपूरे असे काही नियम केले. परंतु कामगारांच्या कल्याणकारी योजनांबाबत कोणताच विचार केलेला नाही. मात्र सेवाशर्ती बाबत काहीतरी करण्यात यावे असा कागदावर तरी उल्लेख केलेला आहे. पण उद्योगधंद्यामध्ये किंवा बिल्डर व्यवसायात असंघटित कामगारांसाठी आणि आपण युनियन लिडर म्हणून काम करतो त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आणि सेवाशर्ती बाबत नियमावली तयार करण्यात आलेली नाही. निवृत्ती वेतन, अपघात, बाळंतपणाची रजा इ.बाबत अंमलबजावणी होत नाही. कल्याणकारी योजना फक्त दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी आहेत म्हणजे केंद्र शासनाने आणलेला कायदा हा दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांकरता रुपांतरीत करणार असलो तर जो रोजंदारीवर काम करतो, ज्याचा रोजगार जास्त आहे मात्र तो नियमित मिळेल अशी स्थिती नाही अशा कामगारांना दारिद्रयरेषे खालील लोकांसाठी असलेले नियम लावण्यात काय अर्थ आहे?

सभापती महोदय, आपण दारिद्र्यरेषेखाली लोकांसाठी कायदा केला ही चांगली गोष्ट आहे. रोजंदारीवरील कामगांसाठी सेवाशर्ती किंवा योजना केल्या,1 टक्के रक्कम सरकारकडे जमा करुन त्यातून कामगारांसाठी कल्याणकारी योजना आखावी अशी तरतूद केली..परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नाही. देशात आणि मुंबईमध्ये मोठया प्रमाणात होणाऱ्या बांधकामातून खर्चातून 1 टक्के रक्कम जमा झाली असती तरी देशातील बांधकाम क्षेत्रातील कामगार सुखी झाले असते. मागच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,141 कोटी रुपये जमा झालेले आहेत.महाराष्ट्रासाठी, मुंबईसाठी कायदा तयार केला आहे, त्यानुसार सेस प्रमाणे बांधकाम व्यवसायातून येणारे संपूर्ण उत्पन्न,तसेच सर्व बिल्डरकडून टर्न ओव्हर त्याप्रमाणे एक टक्का रक्कम जमा झालेली आहे काय? अशा प्रकारे जरी एक टक्का रक्कम जमा झाली तरी महाराष्ट्र राज्य हे बांधकाम व्यवसायातील कामगारांना लागणाऱ्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊ शकतात. म्हणून माझी या विधेयकाच्या माध्यमातून विनंती आहे की, ज्याप्रमाणे आपण माथाडी, हमाल, सुरक्षा रक्षक यांच्यासाठी मंडळ स्थापन केले आहे, त्याचपध्दतीने बांधकाम व्यवसायातील कामगारांसाठी देखील मंडळ स्थापन करुन कल्याणकारी योजना राबविण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, याठिकाणी माननीय कामगार मंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेब उपस्थित आहेत. एखाद्या कंपन्यांच्या बाबतीत सांगावयाचे तर काही कंपन्या कधी सुरु झाल्या हे लिहिलेले असते म्हणजे 1856-रहेजा. एखाद्या बांधकाम व्यवसायिकांकडे 1856 पासून चेक घेण्यासाठी अकाऊंटन्ट किती आहेत ते समजते पण तेथे कामगार किती आहेत ते समजत नाही.जर सदरहू कंपनी जुनी आहे किंवा इतर ज्या मोठ्या कंपन्या आहेत, त्या कंपन्यांमध्ये जेव्हा युनियन तयार केली जाते त्यावेळी त्या बांधकाम व्यवसायिकांकडून एकच उत्तर मिळते की, हे कामगार आमचे नाहीत. मी माननीय कामगार मंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेब यांना सांगू इच्छितो की, जर या बांधकाम व्यवसायिकांकडे युनियन तयार होत असेल तर महाराष्ट्र शासनाने यामध्ये लक्ष घातले पाहिजे. मी केवळ युनियन लिडर म्हणून बोलत नाही पण त्यांना काहीतरी न्याय देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. याठिकाणी युनियन लिडर बरेचजण आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप येथे बसलेले आहेत. अशा प्रकारे बांधकाम व्यावसायिकांकडे काम करणाऱ्या कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने न करता रास्त मार्गाने आम्ही त्यांच्याकडे कामगार नियमानुसार न्याय हक्क मागू शकतो.म्हणून मी शासनाला विनंती करतो की, अशा प्रकारे दुर्लक्षित झालेल्या कामगारांना, मालकाला मोठया प्रमाणात नफा मिळवून देणाऱ्या कामगारांसाठी नियम तयार करुन न्याय मिळवून द्यावा एवढीच विनंती करुन मी माझे दोन शब्द थांबवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सदरहू विधेयकावरील चर्चा दुपारी 03 वाजून 25 मिनिटांनी सुरु झाली असून त्या वरील माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासह 04 वाजून 25 मिनिटांपर्यंतची म्हणजे एक तासाची वेळ या विधेयकासाठी देण्यात आलेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .2 डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकरजी यांनी सदनामध्ये महाराष्ट्र विधान परिषद विधेयक क्रमांक - 3 हे अतिशय चांगले असे अशासकीय विधेयक चर्चेसाठी आणलेले आहे.आपण आजची परिस्थिती पाहिली तर राज्यामध्ये आणि मुंबई शहरामध्ये संघटित कामगारांची जी संख्या होती, ती आज 50 टक्के देखील राहिलेली नाही. राज्यातील संघटित कामगार कमी होत आहे आणि असंघटित कामगारांची संख्या वाढत आहे.आपण जर मुंबईचा विचार केला तर याठिकाणी असलेल्या गिरण्यां मध्ये संघटित कामगारांची संख्या साडेबारा लाखापर्यंत होती. पण आज दोन ते अडीच लाखाच्यावर संघटित कामगारांची संख्या नाही. उद्योग वाढत असताना संघटित कामगारांची संख्या कमी होत आहे अशा प्रकारची समस्या निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितले की, 1969 मध्ये महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम हा कायदा आला. माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आता याला 42 वर्षे झाली आहेत.परंतु आपण मोठया संख्येने बांधकाम व्यवसायामध्ये काम करणाऱ्या श्रमजीवी मजुरांसाठी काही करु शकलो नाही. त्यामुळे सदरहू कायदा आणणे अत्यंत गरजेचे आहे. इमारत बांधकाम कामगारांना नियमितपणे काम मिळावे हे निश्चित करण्यासाठी योजना कलम-3 मध्ये दिलेली आहे. आज आपण जर गुलालवाडी, लालबाग, परळ, काळाचौकी या भागामध्ये गेलो तर सकाळी शेकडो कामगार हे आपल्याला मजूरी मिळावी, दोन-चार दिवस का होईना काम मिळावे म्हणून उभे असलेले दिसतील. आठवड्याचे संपूर्ण 5-6 दिवस नोकरी मिळेल याची त्यांना खात्री नसते. या विधेयकातील कलम-3 (ड) मध्ये म्हटलेले आहे की,"वेतनाचे दर निश्चित करणे, कामाचे तास निश्चित करणे, प्रसूतीच्या काळातील लाभ मिळणे, अतिकालीन प्रदान वेतनासह रजा, उपदानासाठी तरतूद आणि नोकरीच्या अटी व शर्ती" मला असे वाटते की, आपण या दृष्टीकोनातून सुरुवात तर करु या.आपण बांधकाम मजुरांना काय देऊ शकतो याबाबतीत शासनाने आपले निश्चित असे धोरण जाहीर करणे गरजेचे आहे असे मला वाटते. बांधकामासाठी लागणारे कामगार हे दोन-तीन प्रकारचे असतात. त्यांना कुशल आणि अर्धकुशल मजुरांची आणि अकुशल मजुरांची देखील आवश्यकता असते.अशा प्रकारे आपण वर्गवारी केली आणि त्याप्रमाणे किमान वेतन किती देता येईल यादृष्टीने धोरण आखले किंवा तसा कायदा केला तर त्यांना त्याचा लाभ निश्चितपणे मिळू शकेल.

सभापती महोदय,मघाशी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितल्याप्रमाणे 14

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्षाच्या आतील मुलांना कामावर ठेवता येणार नाही याची कार्यवाही देखील अत्यंत काटेकोरपणे व्हावयास पाहिजे. तसे पाहिले तर भटक्या आणि विमुक्त जाती कोण ? बांधकामावर काम करणारा मजूर हा भटक्या आणि विमुक्त जातीचा आहे. "भाई तेरी सुबह कहीं, तो तेरी शाम कहीं" तो आज कुठे आहे आणि उद्या कोणत्या झोपडीमध्ये रहाणार आहे हे त्यालाही माहिती नाही आणि इतरांनाही माहिती नाही. म्हणून भटक्या विमुक्त समाजाला जो लाभ देत आहोत, त्यातील काही तरतुदी किंवा काही फायदे यांना देता येतील काय याचा शासनाने विचार करावा. आपण साखर कारखान्याजवळ जशा शाळा काढतो.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

तशा पध्दतीने ज्या ठिकाणी वर्षे-सहा महिने चालणारे मोठे बांधकाम असेल त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांना शिकविण्याच्या संदर्भातील विचार केला पाहिजे. अन्यथा ते निरक्षरच रहातात, ज्याचे वडील डोक्यावर पाटी वाहतात त्याचा मुलागा तेच काम करतो. म्हणून शाळेच्या संदर्भातील जबाबदारी कशी घेता येईल याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मला वाटते. मला या ठिकाणी अशी विनंती करावयाची आहे की, एकदा कायदा झाला की, त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात होते हे निरीक्षकाच्या माध्यमातून तपासण्याची गरज आहे, याचा विचार शासनाने करावा. फॅक्टरी ॲक्टमध्ये सिक्युरिटी फेनसिंगचा नियम आहे. तसा कायदा सुध्दा या ठिकाणी आणला पाहिजे. हेल्मेट शिवाय काम करता येणार नाही, या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितले आहे. 60 लोकांना त्यांचे जीव गमवावे लागलेृआहेत. त्यांचा मृत्यू झाला आहे. म्हणून इमारतीचे बांधकाम लक्षात घेऊन सिक्युरिटीचे नियम करण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे.

सभापती महोदय, आणखी दोन बाबी मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. जशी महागाई वाढते त्याप्रमाणात वर्क्समेन कॉम्पेन्सेशनचा लाभ त्या कामगारांना मिळाला पाहिजे. आज वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्ट अस्तित्वात आहे. पण या ॲक्टमध्ये 22 वर्षा पूर्वी करण्यात आलेल्या तरतूदी प्रमाणे एक हात गेला तर अमुक इतकी मदत आणि दोन डोळे गेले तर अमुक इतकी मदत देण्यात येते. ज्या प्रमाणात महागाई वाढत गेली त्या प्रमाणत वर्क्समेन कॉम्पेन्सेशन वाढवून देण्यात यावे अशी माझी विनंती आहे. कारखान्यांमध्ये पाळणा घराची सुविधा करण्यात येते, त्या पध्दतीने या ठिकाणी सक्तीचे करुन त्या ठिकाणी पाळणा घर करता आले तर निदान इमारतीचे बांधकाम करणाऱ्या कामगारांसाठी, मजुरांसाठी शासनाने काही केले असे होईल. एवढेच चार-पाच मुद्दे मला मांडावयाचे होते. माननीय मंत्री महोदय, याची नोंद घेत आहेत, त्याबद्दल मला आनंद होत आहे. त्याची कार्यवाही व्हावी, अशी मी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य आमचे सहकारी श्री. किरण पावसकर यांनी या ठिकाणी जे अशासकीय विधेयक मांडलेले आहे त्याचे पहिल्यांदा स्वागत करतो, या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मला मुद्दाम या ठिकाणी सांगावयाचे आहे की, कामगार क्षेत्रामध्ये आम्ही अनेक जण गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. मी सुध्दा जवळ जवळ गेली 22-23 वर्षे या क्षेत्रामध्ये काम करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी जे म्हटलेले आहे ते खरे आहे. एकेकाळी या देशामध्ये 13 टक्के कामगार संघटित होते. आज ते प्रमाण 6 टक्के झालेले आहे. म्हणजे कामगार कमी झालेले आहेत असे समजण्याचे कारण नाही. लोकसंख्या वाढली, खाणारी तोंडे वाढली, याचा अर्थ काम करणारे हातही वाढले आहेत.पण यातून दुसरा अर्थ असा निघतो की, असंघटित कामगार वाढत चालला आहे. या देशाचे आणि राज्याचे कायदे आपण पाहिले तर ते जवळ जवळ 50 ते 60 कायदे हे संघटित कामगारांसाठी आहेत. अर्थात त्यासाठी त्या कामगारांनी लढा दिला. वेळ प्रसंगी रक्त वाहिले तेव्हा त्यांना हे कायदे मिळालेले आहेत. त्यांना कोणी असे आणून दिलेले नाहीत, हे मला मुद्दाम येथे सांगावेसे वाटते. मात्र आज जवळ जवळ 93 ते 94 टक्के असंघटित कामगार आहेत. त्यांच्यासाठी सन 2008 पर्यंत या देशामध्ये एकही कायदा नव्हता.

सभापती महोदय, दिनांक 1 मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन असतो. सुर्दैवाने या देशामध्ये त्या दिवशी गेली 22 वर्षे आम्ही फार मोठा मेळावा घेतो. सन 2007 साली या मेळाव्याला तत्कालीन केंद्रीय श्रम मंत्री श्री. ऑस्करजी फर्नांडिस आले होते. त्यावेळी आम्ही ही व्यथा त्यांच्याकडे मांडली होती. 1 मे हा महाराष्ट्र दिन आहे, आंतरराष्ट्रीय कामगार दिन हा जास्त महत्वाचा आहे. आम्हाला सर्वांना त्याचा अभिमान आहे. कामगारांचा वर्षातून एकदा खऱ्या अर्थाने सणाचा दिवस कोणता असेल तर तो आंतरराष्ट्रीय कामगार दिन हा असतो. सन 2007 साली माननीय केंद्रीय श्रम मंत्री येथे आले होते. मी सभागृहाच्या माहिती करिता सांगू इच्छितो की, 70 हजार असंघटित कामगारांचे नेतृत्व माझी संघटना भारतीय कामगार कर्मचारी महासंघ करते. या कामगार संघटनेमध्ये बांधकाम व्यवसायातील कामगार आहेत. घरेलू कामगार आहेत हे सगळे कामगार या संघटनेत आहेत. या सगळयांचे एक निवेदन तत्कालीन सन्माननीय केंद्रीय श्रम मंत्री यांना आम्ही दिले होते. त्यावळी त्यांनी शब्द दिला होता त्याप्रमाणे सन 2008 साली असंघटित कामगारांच्या कल्याणकारी कायद्याची निर्मिती झाली याचा मला या ठिकाणी मुद्दाम उल्लेख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

करावासा वाटतो. आपण नेहमी असे म्हणतो की सुरुवात झाली पाहिजे. होय, या देशामध्ये 60 वर्षांनी का होईना, जवळ जवळ 58, 59 वर्षांनी का होईना एका नवीन पर्वाची सुरुवात झाली. परंतु अलीकडच्या बदलत्या सगळया इंडस्ट्रिजची परिस्थिती आपण पहात आहोत. आज इंडस्ट्रिजमध्ये संघटित पेक्षा असंघटित कामगार वाढलेले आहेत. अशा वेळेला अनेक कायद्यांची गरज आहे. आजच्या विषयाची व्याप्ती फक्त मर्यादित बांधकाम व्यवसाया पुरती आहे, म्हणून मी या व्याप्तीच्या बाहेर बोलणार नाही. मला माहीत आहे की, या मंडळाची आधीच निर्मिती झालेली आहे आणि या मंडळाच्या दोन बैठका झालेल्या आहेत. त्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचे मनापासून अभिनंदन करुन आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांच्या सारखे शाहू महारांच्या, शाहू नगरीतील कामगार मंत्री आपल्याला मिळाले आहेत. तसेच श्री. राजेंद्र गावित यांच्या सारखे एक सर्वसामान्य, आदिवासी विभागातून, कष्टकऱ्यातून, तळागाळातून आलेले मंत्री आम्हाला मिळाले आहेत. या दोन्ही मंत्र्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. मी ज्या वेळी या दोन्ही मंत्र्यांचे अभिनंदन केलेले आहे त्या वेळी त्यांची जबाबदारी वाढणार आहे हे आपण लक्षात ठेवावे. या मंडळाचे गठन करीत असतांना माझी विनंती अशी आहे की, या मंडळात जे सदस्य येणार आहेत ते त्या क्षेत्रात काम करणारे लोक असावयास पाहिजेत तसेच इतरही सदस्य असले पाहिजेत या बद्दल दुमत असण्याचे कारण नाही. तरी देखील या मंडळाचे सदस्य कोण असावेत आणि कोण असू नयेत, यामध्ये मी जाणार नाही. परंतु या विषयाची माहिती असलेले, या विषयाचा अभ्यास असलेले, सदस्य असले पाहिजेत. सदस्य किती असावेत हे आपण ठरवू शकतो, त्याला काही बंधन नाही. या मंडळाच्या दोन बैठका जरुर झालेल्या आहेत परंतु या विभागातल्या लोकांना त्यामध्ये जरुर सामावून घेण्यात यावे. मग ते जरी मालक असले, बिल्डर असले तरी ते असावे लागतील. आपण कोणाकडे दाद मागणार आहोत. या सर्व गोष्टी ओघाने येतीलच. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी या ठिकाणी मांडल्या प्रमाणे कुठल्या तरी कॉन्ट्रॅक्टरचे नाव घेऊन आणि कुठले तरी मस्टर साईन करुन जबाबदारी टाळता येणार नाही. गेल्या 6 महिन्यात 60 माणसे पडून मरत असतील आणि त्याची दखल शासन घेत नसेल, कायद्याचे गठन करीत असताना आणि या साठी सर्वंकष असे मंडळ तयार करीत असताना जर याची दखल घेतली नाही तर कुठे तरी त्रुटी रहातील, मला या ठिकाणी ही बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

सभापती महोदय, सर्वात प्रथम या कामगारांच्या नोंदणीचा प्रश्न निर्माण होतो. मी खालच्या सभागृहाचा जेव्हा सदस्य होतो तेव्हा हा प्रश्न मांडला होता. आज या ठिकाणी पुन: हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. हे सर्व करत असताना एक महत्वाची गोष्ट आपण विसरत आहोत. हा असंघटित कामगार मुळात कामगार या व्याख्येत मोडतच नाही.'वर्कर्स' डेफिनेशनमध्ये तो येतच नाही. या कामगारांच्या बाबतीत या देशात जेवढे कायदे आहेत ते कामगार या संज्ञेमध्ये मोडणाऱ्या कामगारांच्या बाबतीतच आहेत आणि ते तसेच असले पाहिजेत. जगभरचा कायदा तसाच आहे. आपलाही कायदा तसाच आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या बोर्डाची निर्मिती करत असताना बांधकाम विभागात काम करणाऱ्या कामागारांच्या नोंदणीचा विषय जेव्हा येईल तेव्हा त्याला कामगाराची संज्ञा देता येईल काय अशा दृष्टीने आम्ही विचार करुन शकलो तर अर्धी लढाई जिंकण्यासारखे होईल.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

या देशातील जेवढे कायदे कामगारांना लागू आहेत ते सगळे कायदे आपोआप त्यांना लागू होतील.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे. या अशासकीय विधेकावरील चर्चा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह दुपारी 4.25 वाजता संपवावयाची आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी आताच सुरुवात केलेली आहे. मी फक्त सहा मिनिटे बोललो. या अतिशय महत्वाचा विषयाच्या बाबतीत थोडा वेळ वाढवावा.

तालिका सभापती : आपल्याला वेळेचे बंधन आहे.

श्री. भाई जगताप : मग आपण माननीय मंत्री महोदयांना उत्तरच देण्यास सांगावे.

तालिका सभापती : आपण बोला परंतु आपले भाषण लवकर संपवावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, विधेयकाचे कामकाज संपविण्याच्या बाबतीत बंधन नाही. चर्चेच्या बाबतीत बंधन असू शकेल. आपण सन्माननीय सदस्यांना ऑनलेग ठेवावे आणि नंतर पुढे चर्चा घ्यावी.

तालिका सभापती : आपण ठराव संमत केला आहे. आपल्याला पुढील अर्ध्या तासामध्ये हे बिल संपवावयाचे आहे.

श्री. कपिल पाटील : ठराव संमत केला आहे हे मान्य आहे पण ते चर्चेपुरते आहे. ते बिल मंजूर किंवा नामंजूर करण्याच्या बाबतीत नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडावेत.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी सगळे मुद्देच मांडत आहे. मी इकडचे तिकडचे काहीही बोलत नाही. आतापर्यंत आपण त्यांच्या नोंदणीपर्यंत आलेलो आहोत. त्याचप्रमाणे त्यांच्या आरोग्याच्या गोष्टी आहेत, त्यांच्या सुरक्षेच्या गोष्टी आहेत. सुरक्षेच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांना आठवत असेल की, मागच्या वर्षी माटुंगा येथे एक सर्व्हिस लिफ्ट कोसळून 6 कामगार मृत झाले. एवढा मोठा प्रसंग घडलेला असताना आपल्या खात्याने काय केले ? खऱ्या अर्थाने या ज्या सर्व्हिस लिफ्ट आहेत त्या माणसांची ने-आण करण्यासाठी नसतात. तरी सुध्दा त्या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

तशा प्रकारे वापर केला. तेथील पर्यवेक्षक किंवा सुपरवायजर काय करीत होता ? 6 कामगार मृत झाल्यानंतर आम्ही या ठिकाणी एखादा इश्यू उपस्थित करावयाचा, सरकारने त्यांना लाखभर रुपये देतो. आमच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये कामगाराची किंमत जर लाखभर रुपयात होत असेल तर ते योग्य नाही. म्हणून माझी अशी विनंती राहील की, बांधकाम विषयाच्या संदर्भामध्ये या सगळ्या गोष्टी कोटेकोरपणे पाहणे आवश्यक आहेत. आपण कित्येक वेळा पाहिले असेल की, बांधकामासाठी रेती, सिमेंट मिक्स करुन मटेरियल वर घेऊन जाणाऱ्या या लिफ्ट आहेत त्यातून कामगार जात असतो. अशा लिफ्टमधून पडून 6 कामगार मृत्युमुखी पडले. म्हणून हा जो सुरक्षेचा प्रश्न आहे तो अतिशय महत्वाचा आहे. त्यासाठी विशिष्ट नियम पाहिजे. कारण आधी माणसाच्या जीव आहे आणि व्यवसाय वगैरे ज्या काही गोष्टी असतील त्या नंतर येतात. माननीय मंत्री महोदयांनी सुध्दा त्यामध्ये पुढाकार घेतला. समाजाचाही दबाव होता. आपण त्यामध्ये त्या बिल्डरला, त्या मालकाला पार्टी जरुर बनविले आहे परंतु या गुन्ह्यामध्ये 6 माणसे मेली. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितल्या प्रमाणे एखादा अपघात होतो किंवा एखादा पोलीस असेल त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करतो. ते या ठिकाणी का लागू करु नये असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, कामगारांच्या आरोग्याचा मुद्दा आहे. मी आपल्याला स्पष्टपणे सांगू इच्छितो की, त्या लोकांच्या आरोग्याची काय अवस्था असते ? या कामाच्या ठराविक वेळा नाहीत. आपण बघत असाल की, रात्री 12.00-1.00 वाजता सहज बाहेर पडलो तरी त्या ठिकाणी लाईटच्या प्रखर झोतामध्ये काम चालू असते. त्याचे कारण असे की, ते कामगार संज्ञेत मोडत नाहीत. त्यामुळे त्यांना कोण विचारणार ? मी स्वत: एक नव्हे तर शेकडो तक्रारी केलेल्या आहेत. पोलिसांकडून असे सांगण्यात येते की, आम्ही काय करणार ? हे मंत्रालयातून झाले पाहिजे. रात्री 2.00-3.00 वाजेपर्यंत स्लॅबचे काम चालू असते. आपण ते काम करा त्याबद्दल काही म्हणणे नाही. मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या पाहिजेत आणि ते काम हे कामगारच करणार आहेत पण त्यांच्या कामाच्या तासाचे काय ? म्हणून आपल्या मंडळाला या सर्व गोष्टींना सामोरे जावे लागणार आहे. या देशामध्ये आपले महाराष्ट्र राज्य हे खऱ्या अर्थाने पुरोगामी राज्य आहे आणि या राज्याने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

या मंडळाची निर्मिती केलेली आहे. म्हणून माझी अशी विनंती राहील की, त्यांच्या कामाच्या तासाच्या बाबतीत सुध्दा आपल्याला काही तरी विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या कामगारांच्या आरोग्याच्या बाबतीत मी नम्रपणे सांगू इच्छितो. हे सगळे कामगार मोठमोठे टॉवर्स बांधतात, इमारतीच्या आत सगळ्यांची आलिशान शयनगृहे असतात, आलिशान बाथरुम असतात पण कामगारांसाठी खाली बाथरुम नसते. त्यांना उघड्या पत्र्याच्या शेडखाली सर्व प्रातर्विधी वगैरे उरकावे लागतात. आरोग्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी जो उल्लेख केला तो बरोबर आहे. मी यापूर्वी सुध्दा या सभागृहामध्ये तो मुद्दा मांडला होता. त्या ठिकाणी जास्तीत जास्त महिला डोक्यावरुन घमेले घेऊन जाणाऱ्या असतात आणि त्यांची लहान-लहान मुले त्या ठिकाणी वावरत असतात. त्या ठिकाणी जे पाण्याचे हौद असतात त्यात मुले पडून मृत झाल्याच्या शेकडो घटना घडलेल्या आहेत. पोलीस मात्र अपघाती मृत्यूची नोंद करतात. हे कसे काय ? तो अपघाती मृत्यू कसा ? त्यामध्ये निष्काळजीपणा आहे. त्यांना आरोग्याची व्यवस्था बरोबर पुरविली गेली नाही. त्या ठिकाणी सुरक्षेची व्यवस्था केलेली नाही. त्या ठिकाणी पाळणाघर असावे असा कायदा नसला तरी ती व्यवस्था असावी असे अंतर्भूत आहे. त्या मुलांसाठी त्या ठिकाणी व्यवस्था करावयास पाहिजे. म्हणून माझी या ठिकाणी विनंती राहील की अशा ज्या सगळ्या गोष्टी आहेत त्यादृष्टीने त्यांना विम्याचे संरक्षण मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, यामध्ये अनेक मुद्दे आहेत. आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे यावर सविस्तरपणे बोलले आहेत. मी त्याचा परत उल्लेख करणार नाही परंतु यामध्ये खरोखरच महत्वाचे मुद्दे होते. तरी सुध्दा मी एवढेच सांगेन की, कामगाराच्या व्याख्येमध्ये या बांधकाम कामगाराला कसे आणता येईल याचा विचार करावा. हा फक्त एकट्या बांधकाम कामगारांचा विषय नाही. आपल्याकडे ऊसतोड कामगारांचाही हाच प्रश्न आहे. हे सगळे सिझनल आहे. मी ॲफकॉन कंपनीच्या विरोधामध्ये एक केस लढलो. आपल्याला आठवत असेल की, नवी मुंबईला जोडणारा पहिला पूल ॲफकॉन कंपनीने बांधला. त्या पुलाच्या कामाला जवळजवळ 6 ते 7 वर्षे लागली. त्या कामगारांना जेव्हा काढले तेव्हा मी कोर्टात गेलो. त्यावेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

मला एका शब्दामध्ये सांगण्यात आले की, ते कामगार संज्ञेत मोडत नाहीत आणि म्हणून आमची केस फेकून दिली. हजारो कामगार बेरोजगार झाले. सी-लिंकचे काम सुध्दा 6-7 वर्षे चालले. त्या ठिकाणी काम करणारे किती कामगार बुडाले असतील याचा जर तपशील मागविला तर तो आकडा भयानकच असेल, याची मला खात्री आहे. म्हणून या सर्व कामगारांना, असंघटित कामगारांना कामगार सज्ञेमध्ये कसे आणता येईल या बाबतीत शासनाकडून प्रयत्न व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो. खरे तर कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत बऱ्याच वेळा अन्याय होतो. मी ही बाब विधानसभा सभागृहामध्ये सुध्दा मांडली होती आणि या सभागृहामध्ये सुध्दा मुद्दा मांडू इच्छितो. याचे कारण असे की, कामगारांच्या संदर्भात ज्या वेळेला चर्चा झालेल्या आहेत त्यावेळी अशी परिस्थिती येते. मी नियम तोडून काही करा असे अजिबात म्हणणार नाही पण कामगारांच्या प्रश्नांना कधी तरी प्रधान्य द्यावे. या सभागृहामध्ये कामगारांचे प्रतिनिधी आहेत त्यांना निदान त्यांच्या व्यथा मांडू द्या अशी मी आपल्याला विनंती करतो. आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांचे मी अभिनंदन करतो. आदरणीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी तसेच सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचेही मनापासून यासाठी अभिनंदन करतो की, या तिघांबद्दल मला पूर्वीपासून आदर होता पण आज अधिक प्रेम वाटले. कारण त्यांनी अतिशय दुर्लक्षित, अतिशय वंचित अशा कामगारांच्या प्रश्नावर अत्यंत पोटतिडिकीने प्रश्न मांडले. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी जे अशासकीय विधेयक आणलेले आहे ते अधिक महत्वाचे आहे. जो संघटित कामगार 13 टक्के होता तो 6 टक्के राहिला. संघटित कामगार कसा हद्दपार होईल अशी सगळी अर्थव्यवस्था कामाला लागलेली आहे. माननीय मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, आपल्या हातात सुध्दा काय आहे ? आपण फक्त आपली उत्तरे देत असता. ठरविणारे दुसरेच असतात. राज्यकर्त्यांच्या हातामध्ये काही राहिलेले नाही. ज्यांच्या हातात आर्थिक सूत्रे आहेत तेच आता कायदे बनवावयास लागले आहेत आणि त्यांनी ठरविलेली प्रारुपे या ठिकाणी कायदे म्हणून येतात, ही महत्वाची अडचण आहे. म्हणून मला या अशासकीय विधेयकाच्या प्रयत्नाचे अधिक महत्व वाटते. या असंघटित मजुरांबद्दलची कोणतीही सुरक्षा आणि आरोग्याची व्यवस्था मुंबईत नाही. ज्या मुंबईमध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारांना रविवारची सुट्टी मिळावी म्हणून संप केला, आंदोलन केले आणि ते यशस्वी केले, ज्यांचे नाव आम्ही घेतो, त्या महाराष्ट्रामध्ये या संबंध कामगारांच्या बाजूने कोण उभे आहे, असा प्रश्न पडतो. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर आणि सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी केला. गेल्यावेळी मुंबईमध्ये जेव्हा पाणी साठले आणि मलेरियाचा प्रादूर्भाव झाला त्यावेळी असे बोलले गेले की, बाहेरुन आलेल्या कामगारांमुळे मलेरिया आणि इतर रोग पसरत आहेत. इतकी क्रूर चेष्टा राज्यकर्त्या वर्गाकडून आणि राजकारणामधील वर्गाकडून यापूर्वी मी ऐकलेली नव्हती.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सगळी संवेदनशीलता बोथट होऊन गेलेली आहे. मूर्तीकाराने मूर्ती घडवावयाच्या, मूर्ती घडविली की, तो घराच्या बाहेर आहे. घर बांधणारे आज घराच्या बाहेर आहेत. रस्ते बांधणाऱ्यांना रस्त्यावर सुध्दा राहू द्यावयाचे नाही. अशी आपली सर्व व्यवस्था काम करीत आहे. जो रस्त्यावर राहतो त्याला अनधिकृत ठरविले जाते. नाव बांगलादेशीय नागरिकांचे दिले जाते. पण ज्यांनी आमच्या घरांसाठी कष्ट घेतले, घाम गाळला, जीव दिला, रक्त सांडले त्या कामगारांना आपण कोणतीही ओळख देणार नाही ही कोणती राज्य व्यवस्था आहे ? कल्याणकारी राज्यामध्ये आपण काम करतो आणि विधिमंडळ हे त्यासाठी आहे. तो सार्वभौम असतो, सभागृह सार्वभौम नसते. आपण येथे निर्णय घेऊ शकतो, परंतु या सभागृहाची मालक सुध्दा ती जनता आहे. त्या जनतेला आम्ही बाहेर काढतो.

या मुंबईमध्ये मलेरिया कोणी पसरविला ? अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांनी नाही, झ ोपडपट्टीत राहणा-यांनी नाही, कामगारांनी नाही. त्याला पहिला कामगार बळी पडला आहे. कारण तो त्या डबक्याच्या बाजूला रहात होता. ती डबकी उंच टॉवरच्या ठिकाणी होती. ही डबकी त्या बिल्डर्सनी उभी केली होती. ही डबकी ज्या ज्या राजकारण्यांची बांधकामे चालू आहेत त्यांच्या कंत्राटदारांनी ती निर्माण केलेली आहेत. कधी कधी लाज वाटते की, ज्या राजकीय क्षेत्रामध्ये आपण काम करीत आहोत त्या राजकारणातील लोकांची 80 टक्के बांधकामे मुंबईत सुरु आहेत. तेच उंच टॉवर्स बांधत आहेत, तेच डबकी तयार करतात, त्यावर फवारणी सुध्दा करीत नाहीत. त्या कामगारांना कायद्याने सुरक्षा देणे, सुरक्षिततेची साधने देणे हे तर फार लांबच राहिले. मलेरियाच्या फवारणीसाठी 4-5 हजार रुपये लागतात ते सुध्दा खर्च केले जात नाहीत. त्यामुळे मी महापालिकेकडे माहिती मागितली होती त्यांनी मला असे सांगितले की, मुंबईत जेवढे बिल्डर्स आहेत त्यांना नोटिसा पाठवून सुध्दा त्यांनी डबक्यांवर फवारणी केलेली नाही. शेवटी महानगरपालिकेला फवारणीचे काम करावे लागले. मग शासनाने त्यांची बांधकामे का थांबविली नाहीत ? कामगार मेला तरी चालेल, पुन्हा बोलावयाचे की हा कामगार बाहेरुन आलेला आहे. एकदा या कामगारांना मुंबईच्या बाहेर काढून बघावे. यापूर्वी एकदा पुण्यातील कामगारांना बाहेर काढण्यात आले होते, त्यामुळे सर्व उद्योगधंदे थांबले होते. पुण्याच्या विकासाला खीळ बसली

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होती. नाशिकच्या विकासाला खीळ बसली होती.

या राज्याचा विकास करावयाचा असेल तर त्यासाठी कामगारांची गरज भासणार आणि कोठूनही आलेल्या कामगाराला आपल्याला स्वीकारावे लागणार. आज तुमचा आमचा भाऊ कामगार म्हणून काम करु शकत नाही. कारण हा चांगला भाग आहे. महाराष्ट्र अधिक उन्नत झाला, अधिक विकासित झाला, अधिक व्यवसाय करु लागला आहे. आता खडी फोडण्याचे काम माझा भाऊ करु शकत नाही. मग जो उत्तम प्रकारे खडी फोडतो त्या कामगाराला बाहेरुन आणावे लागेल, जो उत्तम कडियाचे काम करतो त्याला बाहेरुन आणावे लागेल. जो मार्बल बसविण्याचे काम करतो त्याला बाहेरुन आणावे लागेल, चांगले फर्निचर तयार करणाऱ्या कामगाराला बाहेरुन आणावे लागेल, उंच टॉवरवर जाऊन मोजमाप घेतो त्याला बाहेरुन आणावे लागेल. या कामगारांना बाहेरुन आणले नाही तर विकास थांबेल. आम्हाला विकास हवा, आम्हाला इन्फ्रास्ट्रक्चर पाहिजे, आम्हाला सी-लिंक पाहिजे, आम्हाला फ्लायओव्हर ब्रीज पाहिजेत, पण ते बांधणाऱ्या कामगारांना कोणतीही ओळख देण्यास आम्ही तयार नाही. हा भयंकर प्रकार आहे. म्हणून मला सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे अभिनंदन करावयाचे आहे. त्या असंघटित मजुरांना ओळख देण्याचा आपण प्रयत्न करीत आहात. ही ओळख आपण दिली पाहिजे. तो बांगलादेशी आहे, कोणत्या जातीचा, धर्माचा आहे हे मला माहीत नाही. माझ्यासाठी तो घर बांधत आहे, माझ्यासाठी रस्ता बांधत आहे, त्याला संरक्षण देण्याची जबाबदारी माझ्यावर आहे, या राज्य शासनावर आहे. या कामावर जे कामगार काम करतात, त्यांच्या मुलांची हालत कशी असते ? सरकारी कामावर अपघाती मृत्यू केवळ 60 दाखविण्यात आले आहेत, अधिकृतपणे नोंदविली गेलेली ही संख्या आहे. परंतु सी-लिंकच्या कामावर झालेल्या अपघातात मृत्यू पावलेल्यांची कोठे नोंद झाली आहे काय ? त्याची माहिती माहितीच्या अधिकारातही मिळत नाही. परंतु त्या पुलावरुन वेळ वाचावा म्हणून आपण सर्वजण थाटात जातो. पण त्या समुद्रात बुडून मरण पावलेल्या कामगारांची शासनाने नोंद केलेली नाही. त्या कामावर शेकडो कामगार मेले आहेत. प्रत्येक बिल्डिंगच्या डबक्यात शेकडो लहान लहान मुले बुडून मरतात, टाकीत बुडून मरतात, आपण त्याची साधी नोंदही घेत नाही.

या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी राज्य शासनावर आहे. एका बाजूला "राईट टू

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एज्यूकेशन" हा कायदा पास केल्याच्या फुशारक्या मारतो. दुसऱ्या बाजूला आजही या बांधकाम मजुरांची 2 लाख मुले शाळेत जाऊ शकत नाहीत अशी भयाण अवस्था आहे. त्यांच्या शाळांची शासनाने कोणतीही व्यवस्था केलेली नाही. एक हजारात एखाद्या बिल्डरने पाळणा घर बांधल्याचे उदाहरण असू शकेल. त्या व्यतिरिक्त कोणीही कोणतीही बिल्डिंग शोधावी, आवश्यकता असल्यास आमदारांची समिती नेमून या इमारतींची पाहणी करावी. जेथे जेथे मोठमोठ्या इमारतींची कामे चालू आहेत तेथे एकही पाळणा घर अस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत त्यांच्या लहानग्यांनी काय करावयाचे, ते मूल रडत असताना ती बिचारी आई त्या मुलाना ना दूध पाजू शकत, ना भरवू शकत, ना शिकवू शकत, ना शाळेत पाठवू शकत. या मुलांच्या शिक्षणाची तरी शासन व्यवस्था करणार की नाही, या कामगारांच्या सुरक्षिततेची व्यवस्था करणार की नाही ते येथे सांगितले पाहिजे. हे जर केले जाणार नसेल आणि शासनाने त्यांच्यासाठी मंडळ केले असे सांगून कृपा करुन अशी फुशारकी मारु नये. कधी कधी असे वाटते की, आपण या सभागृहात कशासाठी चर्चा करीत असतो ? जर त्या कामगारांना, श्रमणाऱ्यांना आपण न्यायही देऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे कामगारांच्या राज्यासाठी, शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण असे म्हणणाऱ्या साने गुरुजींचे ते शिष्य आहेत. ही गाणी आता राहिलेली नाहीत. आज आपण शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे राज्य निर्माण केले आहे असे म्हणत असलो तरी आता कष्टकऱ्यांचे राज्य राहिलेले नाही. स्व.यशवंतरावजींनी असे सांगितले होते की, हे शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे राज्य आहे. आता त्यांचे राज्य राहिलेले नाही. साने गुरुजींचे राज्य राहिलेले नाही. बिल्डरांचे राज्य झालेले आहे. हे स्व.यशवंतरावजींचे राज्य राहिलेले नाही. सर्व क्षेत्रातील कामगारांना वापरुन आपल्याला त्यांना फेकून द्यावयाचे आहे. तो येथे राहिला की, त्याला कसे बाहेर काढावयाचे, त्याला अनधिकृत कसे ठरावयाचे, या स्पर्धेत आपण आहोत. आपल्याला बांधकामे पाहिजेत, मग बांधकाम मजूर का नको ? या बांधकाम कामगारांना आरोग्याची हमी, किमान शिक्षणाची हमी, त्या प्रत्येक स्त्रीला सन्मानाची हमी शासनाने दिली पाहिजे आणि ती देणार की नाही या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी सरकारच्या वतीने द्यावे एवढीच अपेक्षा व्यक्त करतो व पुन्हा एकदा सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे अभिनंदन करुन येथेच थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी अतिशय महत्वाचे हे विधेयक आणलेले आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, समाजातील अतिशय शोषित, वंचित कामगार वर्गासंबंधीचे हे विधेयक आहे. यामध्ये माथाडी, हमाल व सुरक्षा मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी मंडळे स्थापन केली आहेत. यातून हा वर्ग कसा राहून गेला ते मला कळत नाही. हा सर्वात मोठा वर्ग आहे. मुंबईची लोकसंख्या दीड कोटी असेल, ठाणे जिल्ह्याची सव्वा कोटी आहे. आजुबाजूच्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात टालेजंग इमारती बांधल्या जात आहेत, एमएमआरडीएच्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले जाणार आहे. त्यासाठी पुढील दशकामध्ये 25 हजार कोटी खर्च केले जाणार आहेत. त्यांच्या रिपोर्टमध्ये हे नमूद केलेले आहे. अशा परिस्थितीत हा कामगार वर्ग तेथे काम करणार आहे. त्याला अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित केलेले आहे. एका बाजूला पाचवा वेतन आयोग लागू केला, सहावा वेतन आयोग लागू केला, सर्व क्षेत्रातील कामगार आपल्या हक्काकरिता लढतो, कल्याणासाठी लढतो. हा जो कामगार आहे त्याच्यासाठी काहीच नाही, त्याला वेतन नाही, आरोग्य नाही, त्यांच्या मुलांना शिक्षण नाही, कुटुंबाला कोणतेही संरक्षण नाही. या कामगारांसाठी जी नियमावली तयार केली जाईल त्यामध्ये या गोष्टी महत्वाच्या आहेत.

सभापती महोदय, पुढील काळात या कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या कामगारांच्या जीवावरच या इमारती उभ्या राहतात. मग मुंबई असेल, नवी मुंबई असेल, उद्या तिसरी मुंबई निर्माण होईल. तेथे मोठया प्रमाणात बांधकामे होतील. त्यामुळे पुढील दशक यांच्या जीवावर चालणार आहे. त्यामुळे त्यांच्या संरक्षणाकरिता, त्यांच्या मुलांकरिता, शिक्षणाकरिता काही तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या मंडळाच्या नियमांमध्ये त्यांचा अंतर्भाव करण्याची गरज आहे. या अर्थाने हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. या विधेयकातील विषय महत्वाचा असल्यामुळे अन्य सन्माननीय सदस्यांनी सुध्दा त्यावर आपले विचार मांडलेले आहेत. म्हणून या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिनिधींना या मंडळात घ्यावे असे मी अवश्य सुचवितो. खऱ्या अर्थाने जो असुरक्षित, असंघटित कामगार आहे, त्यांच्यासाठी जी माणसे काम करीत आहेत त्यांना यामध्ये घेतले तर ती माणसे याची जाणीव ठेवून या वर्गाला सुरक्षितता व न्याय देण्याचे काम करु शकतील. ते शासनाने करावे एवढे बोलून मी माझे बोलणे संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी महाराष्ट्र इमारत बांधकाम व्यवसायातील कामगार या विषयाचे अत्यंत महत्वाचे हे विधेयक सभागृहात आणलेले आहे.

सभापती महोदय, जे असंघटित कामगार आहेत ज्यांचे कोणी नाही त्या कामगार वर्गासाठी त्यांनी हे विधेयक आणले असल्यामुळे मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी, भाई जगताप, कपिल पाटील, संजय केळकर यांनी या असंघटित कामगारांसंबंधी, इमारत बांधकाम मजूर आहेत त्यांच्या संदर्भात आपली मते व्यक्त केली आहेत. इमारत बांधकाम हा विषय केंद्र सरकारशी निगडीत असलेला विषय आहे. केंद्र सरकारने 1998 साली हा कायदा प्रत्यक्षात अंमलात आणला आहे. त्याची राज्य सरकारने 2007 साली नियम तयार केले. त्यानंतर दिनांक 1 मे, 2011 रोजी त्रिपक्षीय कल्याण मंडळ राज्यात प्रत्यक्षात स्थापन झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपल्या भाषणातून अत्यंत महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5 मालक प्रतिनिधी, 5 कामगार प्रतिनिधी आणि 5 शासकीय प्रतिनिधी या मंडळावर आहेत आणि कामगार आयुक्त हे अध्यक्ष आहेत. ज्या इमारत बांधकाम व्यवसायामध्ये 10 पेक्षा जास्त कामगार असतील आणि ज्यांनी 12 महिने काम केले असेल अशा कामगारांची नोंदणी केली जाते. इमारत आणि बांधकाम अधिनियमांतर्गत आतापर्यन्त 1829 आस्थापनांची आणि 21462 कामगारांची नोंदणी झालेली आहे. बांधकाम कामगार कल्याण मंडळामध्ये ज्यांचा या क्षेत्राशी संबंध आहे, ज्यांचा या क्षेत्राचा चांगला अभ्यास आहे अशा व्यक्तींची नेमणूक केलेली आहे. बांधकाम कामगार कल्याण मंडळ 1 मे 2000 रोजी स्थापन झालेले आहे. या मंडळाकडून जमिनीचे मूल्य वगळून बांधकामाच्या किंमतीच्या 1 टक्का उपकर वसूल करण्यात येतो. आतापर्यन्त 150 कोटी रुपये या मंडळाने वसूल केलेले आहे. इमारत बांधकाम व्यवसायामध्ये काम करणा-या कामगारांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्याचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केला. यासंबंधीच्या अधिनियमामध्ये कामगारांसाठी बांधकामाच्या ठिकाणी बाथरुमची व्यवस्था असणे, पाळणाघर असणे इत्यादी गोष्टी अंतर्भूत केलेल्या आहेत. या असंघटित कामगारांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले होते. एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांना 1 लाख रु. नुकसान भरपाई देण्याची तरतूद अधिनियमामध्ये आहे. 1 लाख रु. हे महत्वाचे नाहीत.

मी आपणास मुख्यत्वे ठाणे जिल्हयाचे उदाहरण देतो. ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, वसई, पालघर या भागातील कामगार वीटभट्टयावर आणि इमारत बांधकामावर मोठया प्रमाणावर असतात. एखादा मजूर मग तो कोणत्याही जाती-धर्माचा आणि प्रांताचा असो, तो दगावला तर त्याच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई दिली जात नवहती. महाराष्ट्र इमारत व बांधकाम मंडळाच्या माध्यमातून दोन बैठका झाल्या. त्यामध्ये एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेऊन तशी तरतूद कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे. महिला कामगारांना प्रसूतीसाठी 5 हजार रु. देण्याची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून 93 निरीक्षकांची नेमणूक मंडळाच्या माध्यमातून झालेली आहे. 80 टक्के सिव्हिल इंजिनिअर्स,10 टक्के मेकॅनिकल इंजिनिअर्स आणि 10 टक्के इलेक्ट्रिकल इजिनिअर्सची नेमणूक झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितल्या प्रमाणे बांधकाम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राजेंद्र गावित...

कामगार कल्याण मंडळाची पुनर्रचना करीत असताना त्या व्यवसायाचा संबंध असणा-या, त्या व्यवसायाचा अभ्यास असणा-या व्यक्तींची त्या मंडळावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, मी सुध्दा एका सामान्य घरातील आहे. मला सुध्दा कामगारांबद्दल मग ते ऊस कामगार असोत, बांधकाम व्यवसायातील कामगार असोत, माथाडी कामगार असोत, नितांत आदर आहे. बांधकाम कामगार कल्याण मंडळामार्फत या कामगांसाठी जे जे काही शक्य आहे ते इमानेइतबारे करण्याच्या निश्चित प्रयत्न करु. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी आपले विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. किरण पावसकर : या कामगारांच्या बाबतीत शासनाने काही ठोस आश्वासन दिले तर मी माझे विधेयक मागे घेईन.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, बांधकाम कामगार कल्याण मंडळ 1 मे 2000 ला स्थापन करण्यात आले. बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या बाबतीत केन्द्र सरकारचा कायदा आहे आणि 2008 साली त्यासंदर्भातील नियम बनविण्यात आले. जे 10 लाखाच्या वरचे बांधकाम असेल अशा बांधकामापासून 1 टक्का सेस वसूल करण्यात येणार आहे. मग ती खाजगी इमारत असो, एमएमआरडीचा किंवा एमएसआरडीसीचा रस्ता असो इमारत असो, पूल असो, इरिगेशनचे काम असो, असे कोणतेही 10 लाखाच्या वरचे बांधकाम असेल त्यापासून 1 टक्का सेस वसूल होईल. त्यासाठी ग्रामसेवक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त, बांधकाम विभागाचे सचिव, इरिगेशन विभागाचे सचिव या सर्वांना आदेश देण्यात आलेले आहेत की त्यांनी 10 लाखाच्या वरच्या कामाचा 1 टक्का सेस बोर्डाकडे जमा करावा. तीन-चार महिन्यामध्ये बोर्डाकडे 188 कोटी रुपये जमा झालेले आहेत. दरवर्षी 1200 कोटी रुपयापेक्षा जास्त सेस वसूल होईल असा अंदाज आहे. हे बांधकाम कामगार कल्याण मंडळ सर्वांत श्रीमंत असे मंडळ होईल. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितले की, या कामगारांनी किती तास नोकरी करावी, नोकरी कशी असावी याबाबतीत कायदा होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्यांनी बांधकाम व्यवसायाशी संबंधित तीन महिने काम केलेले आहे अशा कामगारांची नोंदणी करण्यात येणार आहे मग ते दगडखाण कामगार असतील, वाळू काढणारे कामगार असतील, सुतार असतील, लोहार असतील, पेण्टर असतील, प्लम्बर असतील या सर्वांचा अंतर्भाव त्यामध्ये असणार आहे. कामगाराने तीन महिने काम कलेले असल्याचे सर्टिफाय कोण करणार ? कॉण्ट्रॅक्टरने हे सर्टिफाय केले पाहिजे. किंबहुना कामगार संघटना आणि एनजीओ यांचेही सर्टिफिकेट घेणार आहोत. इतकेच नाही तर कामगारांचे ॲफिडेव्हिट घेऊन नोंदणी करण्यात येईल. यामध्ये बोगसपणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे बांधकाम कामगार कल्याण मंडळ आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेले असून त्याचे काम सुरु झालेले आहे. एखादा अपघात झाला तर त्याबाबतीत काय करावे, यासाठी इन्स्पेक्टरची नेमणूक केलेली आहे.

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नोंद

श्री.हसन मुश्रीफ.....

कारखाने संचालकांमार्फत निरीक्षक नेमले जातात, सध्या राज्यभर तपासणीसाठी 97 पदांची आवश्यकता आहे. त्या निरीक्षकांनी नोंदणी करणे, अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. सध्या शासनामध्ये नोकर भरती बंद असल्यामुळे पदे भरु शकलो नाहीत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे पद निर्मितीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. उप कामगार आयुक्त आणि सहाय्यक कामगार आयुक्त यांना नोंदणी करण्यास सुरुवात करावी असे सांगितल्यानंतर आतापर्यंत 21 हजार कामगारांची नोंदणी झालेली आहे. कामगार मयत झाला तर त्याच्या कुटुंबाला अनुदान देणे, त्यांच्या मुलांना शैक्षणिकदृष्टया शिष्यवृत्ती देणे, कामगारांच्या पत्नींच्या बाळंतपणासाठी अनुदान देणे, त्यांना निवृत्तीवेतन देणे अशा अनेक योजना आहेत. निधी भरपूर गोळा होणार आहे. या कामगारांसाठी काही चांगले करु शकलो तर एक उत्तम मंडळ या देशामध्ये निर्माण होणार आहे. कामगारांसाठी डयुटी किती तासाची असावी या संदर्भात कायदा करावा लागेल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी ज्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे त्या प्रश्नांकडे पाहूनच शासनाने बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी हे मंडळ स्थापन केले आहे. बिल्डरकडे काम करीत असताना सेफ्टीच्या दृष्टीने आपण उपाययोजना केलेली आहे. काम करीत असताना हेल्मेट पुरविले पाहिजे, पायात बूट घातले पाहिजेत. परंतु त्यांची डयुटी किती तास असावी आणि ती कशा स्वरुपाची असावी यासाठी कायदा अस्तित्वात नसल्यामुळे यथोचित कायदा करावा लागेल. कामगारांचे कल्याण करता येईल इतका निधी गोळा होत आहे. राज्यातील सगळ्या अधिकाऱ्यांनी चांगल्याप्रकारे सेस गोळा केला तर बांधकाम कामगारांचे कल्याण मंडळ उत्तमप्रकारे काम करु शकेल. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जे विधेयक आणले आहे त्या दृष्टीने शासन कायदा आणणार असल्यामुळे हे अशासकीय विधेयक मागे घेण्यात यावे अशी मी विनंती करतो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे की, 10 लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचा बांधकाम व्यवसाय असल्यास 1 टक्का सेस घेण्यात येणार आहे. आपल्या या बांधकाम कामगार कल्याण मंडळाचे स्वरुप आहे त्या नुसार जास्तीत जास्त निरीक्षक, साईट निरीक्षक पदे भरली जाणार आहेत. सध्या एखादे कन्स्ट्रक्शन पूर्ण झाल्यानंतर ओ.सी. दिली जाते, सी.सी. दिली जाते. यापुढे जोपर्यंत सेस भरला जात नाही तोपर्यंत ओ.सी.वा सी.सी. दिली जाणार नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. महाराष्ट्र शासनाने जे कल्याणकारी मंडळ स्थापन केले आहे त्यासाठी दरवर्षी सेसच्या माध्यमातून 1200 कोटी रुपयांपर्यंत निधी गोळा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी असलेले हे सगळ्यात श्रीमंत असे मंडळ होऊ शकेल. या मंडळाच्या माध्यमातून कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविता येऊ शकतील. या योजना बांधकाम कामगारांसाठी यशस्वीपणे राबविल्या तर केंद्र सरकार नव्हे तर इतर राज्ये, इतर देश सुध्दा या मंडळाचा आदर्श घेतल्याशिवाय राहणार नाहीत. माननीय राज्यमंत्री आणि मंत्री महोदयांनी ज्या काही घोषणा केल्या आहेत त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो आणि मला हे अशासकीय विधेयक मागे घेण्यास सभागृहाने अनुमती द्यावी अशी विनंती करतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मागे घेण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा
(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. IV OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE RIGHT OF CHILDREN TO FREE AND COMPULSORY EDUCATION ACT, 2009 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 4 बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विषयाबाबत स्वतंत्र विधेयकाची गरज का भासणार आहे याचे विवेचन मी सभागृहात केले होते. त्यानुसार हे विधेयक चर्चेला आलेले आहे. चिनी भाषेत एक म्हण आहे. If you are planning for a year then, sow rice. If you are planning for a decade then, plant trees. If you are planning for a life-time then, educate people. आज आपल्या देशात चिनी बनावटीच्या वस्तूंचे आकर्षण निर्माण झालेले आहे. मागील अधिवेशनात स्वतंत्र विधेयकाची आवश्यकता व्यक्त करताना ज्या गोष्टी सभागृहापुढे मांडल्या होत्या त्यात संविधानामध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाबद्दल मार्गदर्शक तत्वामध्ये तरतूद करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्ष 60 वर्षानंतर तो कायदा तयार करण्यात आला. केंद्र सरकारचा कायदा आल्यानंतर त्या कायद्याच्या संदर्भात राज्यांनी ज्या नियमावली केल्या पाहिजेत, त्याचा आढावा घेतला तर आतापर्यंत आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, बिहार, हरियाणा, केरळ, मणिपूर, पंजाब, ओरिसा, सिक्कीम, तामीळनाडू या राज्यांनी नियम तयार केले. उत्तरप्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, गुजराथ, राजस्थान कर्नाटक व महाराष्ट्र या राज्यांनी नियमांचे प्रारुप तयार केले आहे. काही राज्यांनी या कायद्यानुसार नियम तयार करीत असताना शिक्षणाच्या धोरणात बदल केला. बिहारचे नियम पाहिले तर पहिली ते पाचवी प्राथमिक आणि पाचवी ते आठवी प्रारंभिक शिक्षण असे म्हटले आहे. केरळ राज्याने आणखी चार पावले पुढे टाकली आहेत.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

केरळ राज्याने सदर कायद्याची अंमलबजावणी करीत असताना नियमामध्ये युआयडी नंबर आणि बायोमेट्रिक आयडेंटिफिकेशनचा समावेश करुन घेतला.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे म्हणत असू तर आपण कुठे आहोत? केरळ राज्यामध्ये आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. केरळ राज्यामध्ये प्रमाणपत्रामध्ये युआयडी नंबर टाकण्याची सक्ती केली जाणार आहे. त्या राज्याने अगदी बारकाईने विचार केला आहे. त्याचबरोबर प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मल्याळम भाषा विषय सक्तीने शिकविला जाणार आहे. आपल्या राज्यातील मातृभाषेचा विचार त्या राज्याने केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये या कायद्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने व्हावी म्हणून खालच्या सभागृहातील माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी आणि मी व भारतीय जनता पक्षाच्या सोशिओ पॉलिटीकल रिसर्च ग्रूपने तीन महिने अभ्यास करुन हे विधेयक तयार व्हावे म्हणून प्रयत्न केले.

नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

त्याची नियमावली तयार करुन आपल्या राज्याला स्वतंत्र कायदा करता येऊ शकतो. आपले राज्य शिक्षणाच्या दृष्टीने अधिक प्रगत आहे हे इतर राज्यांना दाखवून द्यावे, आदर्श घालून द्यावा की आमच्या राज्याने सुध्दा केंद्राच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा केला आहे. असे केले तर खऱ्या अर्थाने महाराष्ट्र राज्य देशातील सर्व राज्यांपेक्षा पुरोगामी राज्य आहे व हे पुरोगामीत्व आपण दाखवू शकू, पण केंद्राचा कायदा लागू झाला तरी अद्याप आपण या कायद्याचे नियमच बनविले नाहीत. या कायद्याचे नियम केंद्र सरकारने तयार केले आणि सुरुवातीलाच केंद्र शासनाने दिलेल्या आदर्श नियमावलीचा मसुदा आपल्या शिक्षण विभागाने जसाच्या तसा भाषांतरित केला होता. पण राज्यात शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक लोकांनी त्याबाबत आक्षेप घेतल्यानंतर तो मसुदा अद्याप अंतिम करावयाचा आहे या निमित्ताने, पण वेबसाईटवर हा मसुदा आल्याने तो अंतिम झाला नाही, अद्याप प्रोसेसमध्ये आहे, असे शासनाने नंतर सांगितले. हा कायदा आपल्या राज्यात स्वतंत्रपणे करण्याची गरज का आहे यावर मी नंतर बोलणार आहे. पण त्यापूर्वी यातील कलमवाईज चर्चा करणे आवश्यक आहे.

या कायद्यातील कलम (2) (डी), (ई) व (पी) मध्ये म्हटले आहे की, दुर्बल व वंचित घटकातील मुलांना विशिष्ट प्रकारच्या शाळा यामध्ये अंतर्भूत बाबी परिपत्रक (नोटिफिकेशन) जारी करुन प्रसिध्द करणे अपेक्षित असताना असे परिपत्रक जारी करण्यात आले नाही. मग आपण कशाच्या आधारे हे आयडेंटिफाय करणार आहात याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. असे नोटिफिकेशन निघाल्याशिवाय आपल्याला ते करता येणार नाही. कायद्याच्या कलम 8 मध्ये शासनाने करावयाची कर्तव्ये विशद केली आहेत. त्यात "नेबरहुड" मध्ये शाळा उपलब्ध करुन देण्याबरोबरच अनुदानित शासकीय तसेच जिल्हा परिषदा व महापालिकेच्या शाळांमध्ये प्रत्येक ठिकाणी 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण असे म्हटले आहे. पण 6 ते 14 वयोगटातील मुलांना शाळेत प्रवेश मिळवून देणे (एकही मूल शाळेबाहेर राहणार नाही याची खात्री करणे) यासाठी प्रत्येक नेबरहुडचा सर्व्हे होऊन योग्य उपाययोजना केल्या जाणे अपेक्षित होते, असे सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे काय, नसेल तर यादृष्टीने शासनाने कोणते उपाय योजलेले आहेत याची स्पष्टता होणे आवश्यक आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

प्रत्येक मुल प्राथमिक शिक्षण (इयत्ता 8 वी पर्यंतचे) पूर्ण करील याची खातरजमा करणे-मात्र या तरतुदीचा विद्यार्थ्यांना 8 वी पर्यंत नापास केले जाऊ नये एवढा मर्यादित अर्थ काढून तसा शासन निर्णय जारी केला गेला. मूल्यमापनाच्या आधारे एखाद्या विषयात मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांवर त्या विषयासाठी अधिक मेहनत घेतली जाणे व सर्व विद्यार्थी प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यास आवश्यक किमान शैक्षणिक क्षमता प्राप्त करतील, असा या तरतुदीचा अर्थ आहे. पण शाळा किंवा शिक्षक या तरतुदीचे पालन करतात की नाही याची तपासणी कशी केली जाणार याचा कोणताही उल्लेख शासन निर्णयात कोठेही केलेला नाही. फक्त पहिलीतून दुसरीमध्ये, दुसरीतून तिसरीत अशा प्रकारे आठवीपर्यंत आणि नवव्या इयत्तेत नापास, या माध्यमातून प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहचू शकेल याची तपासणी कशी केली जाणार आहे, शिक्षकांनी आपली जबाबदारी पार पाडली नसल्यास काय, याचा उल्लेख या शासन निर्णयात दिसत नाही.

वंचित व दुर्बल घटकांना मुलांप्रती प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असताना भेदभाव केला जाणार नाही याची खात्री करणे, सर्व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून आवश्यक तेथे शाळांच्या इमारती, शैक्षणिक साहित्य इ. पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, वयानुरुप शैक्षणिक क्षमता साध्य करण्यासाठी शाळांमध्ये उशिरा प्रवेश घेतलेल्या मुलांना विशेष प्रशिक्षण देणे, शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी कायद्याने विशद केलेल्या निकषांची पूर्तता करणे या सर्व गोष्टींसाठी शासनाने कोणते उपाय योजने आहेत त्याची अद्याप माहिती दिलेली नाही.

महोदय, कायद्यातील कलम 11 नुसार शासनाने 3 ते 6 वयोगटातील मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे आवश्यक आहे. पण या 3 ते 6 वयोगटातील मुलांच्या संदर्भात कोणतीच पावले उचललेली दिसत नाहीत.

महोदय, यानंतर कलम 12 नुसार विना अनुदानित खाजगी शाळांमध्ये इयत्ता पहिलीच्या विद्यार्थी क्षमतेपैकी 25 टक्के जागा वंचित व दुर्बल घटकातील मुलांसाठी राखीव ठेवणे अपेक्षित आहे. शासनाने नियम जारी करुन प्रति विद्यार्थी खर्च सांगावयाचा आहे. त्यानुसार खाजगी शाळांना राखीव जागांवरील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करावयाची आहे. शासनाने या संदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. पण खाजगी संस्था चालकांशी असलेले हितसंबंध या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तरतुदीची अंमलबजावणी करण्याच्या आड येतात काय यासंबंधी शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली दिसत नाही, ती का केली नाही याचे स्पष्टीकरण शासनाला करावे लागणार आहे.

शाळांमध्ये प्रवेश देताना जन्माचा दाखला नसल्यास कोणत्या कागदपत्रांच्या आधारे मुलाचे वय निश्चित करण्यात यावे याबाबत कलम 14 द्वारे तरतूद करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर त्या वर्षात किती कालावधीपर्यंत शाळेत प्रवेश दिला जावा यासाठी शासनाने कालावधी निश्चित करावयाचा आहे. शालेय शिक्षण विभाग अशी परिपत्रके काढण्यात अत्यंत माहीर आहे पण यासंबंधी कोणतेच परिपत्रक शासनाने का काढलेले नाही, त्यात कोणती अडचण आहे हेच मला समजत नाही. भारंभार शासन निर्णय जारी करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाला यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यामध्ये कोणती अडचण होती याचे स्पष्टीकरण होण्याची गरज आहे. पण शिक्षण विभागाच्या बाबतीत तर असे घडतांना दिसते की, शिक्षण मंत्री श्री. विखे-पाटील आल्यानंतर "बेस्ट ऑफ फाईव्ह" सारखे निर्णय घेतले जातात. दुसरीकडे मात्र शिक्षण सचिवांनी आता नवीनच सिस्टम सुरु केली आहे. शिक्षण विभागाचा कारभार म्हणजे "कोणीही यावे आणि टिकली मारुन जावे" असा म्हटला तरी वावगे होणार नाही. शिक्षण विभाग आहे म्हटले की, "दे दबाके" असे प्रकार चालू आहे.

महोदय, कायद्याच्या कलम 18 मध्ये सांगितले आहे की, प्रत्येक शाळेने या कायद्याच्या अंतर्गत संबंधित प्राधिकरणाकडून मान्यता प्रमाणपत्र मिळवावयाचे आहे. सध्या मान्यता मिळून सुरु असलेल्या मात्र कायद्याने घालून दिलेल्या निकषांची पूर्तता न करणाऱ्या शाळांबद्दल शासनाची काय भूमिका असणार आहे, शासनाच्या स्वत:च्या शाळा म्हणजे जिल्हा परिषद व महानगर पालिकेच्या शाळा या निकषांची पूर्तता करतात काय आणि याचे मोजमाप कधी होणार आहे या गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासनाच्या पूर्वीच्या नियमांप्रमाणे अनधिकृत ठरणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येईल, असा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. अनधिकृत शाळांवर फौजदारी कारवाई करण्याची पूर्वीपासूनची तरतूद असूनही अनधिकृत शाळा चालतात, हे या शासन निर्णयात मान्य केलेले आहे. मग या शासन निर्णयान्वये दि. 30 जून, 2011 पर्यंत किती शाळांवर शासनाने कारवाई केली हे सांगितले तर शासनाचा प्रामाणिकपणा सिध्द होऊ

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकेल. शासनाने या कायद्यातील निकषांच्या आधारे सर्व शाळांना मान्यता देणे अपेक्षित आहे. मान्यता मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारे अर्ज करावा हे नियमाद्वारे स्पष्ट केले जाणे अपेक्षित आहे. कायदा लागू होऊन दोन वर्षे झाली, संबंधित प्राधिकरणाने किती कालावधीत व कशा पध्दतीने मान्यता द्यावी, मान्यता कधी रद्द करता येईल, ती कशी करावी याबाबतही नियम आवश्यक आहे. मात्र शासनाने यासंदर्भात कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. अद्याप एकाही शाळेला कायद्याअंतर्गत मान्यता दिलेली नाही. मग आता प्रश्न असा निर्माण होतो की, शासन या कायद्याची अंमलबजावणी कधी करणार आहे या बाबी स्पष्ट होणे आवश्यक आहे.

महोदय, या कायद्याच्या कलम 22 नुसार प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने शाळा विकास आराखडा बनवावयाचा आहे. विभागाने प्रत्येक शाळेत व्यवस्थापन समिती स्थापन करण्याचा निर्णय जारी केला आहे. कागदोपत्री सर्व शाळांनी अशा समित्या स्थापन केल्या आहेत. यापैकी किती समित्यांनी विकास आराखडे तयार केले, विकास आराखडयांप्रमाणे शाळांचा विकास करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणामार्फत किती निधी उपलब्ध करुन दिला गेला ही माहिती मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितली पाहिजे. या सर्व विषयांच्या बाबतीत शिक्षकांच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी शासनाने नियमाद्वारे तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करणे अपेक्षित आहे.

कलम 30 अनुसार इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसे प्रमाणपत्र द्यावयाचे आहे. त्यासाठी नियमांमध्ये तरतूद करण्याची आवश्यकता आहे, पण या सर्व तरतुदी कधी अंमलात येणार आहेत याची स्पष्टता होण्याची गरज आहे. तसेच कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाला सल्ला देण्यासाठी सल्लागार समिती नेमली जाणे आवश्यक होते. अद्याप शासनाने अशी समिती का नेमलेली नाही हे सभागृहाला विदित करावे. केंद्र शासनाने अशा व्यवस्थापन समित्या नेमण्याच्या सूचना केल्या होत्या त्यासाठीच मी हे स्वतंत्र विधेयक सभागृहात आणले आहे. यामागे मुख्य उद्देश असा आहे की, शासनाचा शिक्षणाच्या संदर्भात स्वत:चा, आपल्या राज्याचा स्वतंत्र असा एक कायदा असावा. यात आपल्या सरकारने असे म्हटले आहे की, अलीकडे प्राथमिक शिक्षण घेण्याच्या दृष्टीने संकलित केलेल्या माहितीनुसार सन 2010-11 मध्ये राज्यातील 6 ते 14 वयोगटातील 1 कोटी 59 लाख 95 हजार 942 मुलांपैकी 1 कोटी 59 लाख 79 हजार 798 मुले शाळेत दाखल होतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे....

16,145 मुले शाळेत कधीही दाखल झालेली नाहीत. दोन वर्षापेक्षा अधिक काळ शाळेत न गेल्यामुळे 16,145 मुले शाळा बाहय होती. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11, 23, 72,972 असून त्यापैकी 20 टक्के लोकसंख्या ही 6 ते 14 वयोगटातील आहे. याचा अर्थ 11 कोटी लोकसंख्येपैकी 2,24,74,594 मुले 6 ते 14 वयोगटातील असणार आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या आकडेवारीनुसार 1,59,79,798 मुले शाळेत दाखल आहेत असे गृहीत धरल्यास शाळा बाहय मुलांची संख्या 16 हजार नसून 64,94,796 आहे. सेन्ससच्या आकडेवारीनुसार शाळेत दाखल न झालेल्या मुलांची संख्या 64,94,000 च्यावर जाते त्यामुळे याबाबतीत आपल्याला यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे.

सभापती महोदय, शाळा बाहय मुलांप्रमाणे विशेष गरजा असलेली, अपंग मुलांच्या संदर्भात महाराष्ट्र प्राथमिक परिषदेने दिलेला आकडा फसवा आहे. 6 ते 14 वयोगटातील विशेष गरजा असणारी 3,86,000,19 मुले यामध्ये आढळलेली आहेत. एकूण लोकसंख्येमध्ये अपंग मुलांची संख्या 5 टक्के आहे. 6 ते 14 वयोगटातील मुलांची एकूण संख्या 2,24,74,594 असून त्यातील 11,23,730 मुले अपंग आहेत. परंतु प्राथमिक शिक्षण परिषदेने अपंग मुलांची संख्या 3 लक्ष आहे असे सांगितलेले आहे. अपंग मुलांचे टार्गेट कमी दाखवलेले आहे. खरे म्हणजे अपंग मुलांची संख्या तिप्पट असतांना सुध्दा आपण ही आकडेवारी कमी दाखवलेली आहे. त्यामुळे 90 टक्के ॲचिव्हमेंट म्हणावयास आपण मोकळे होतो. महाराष्ट्र राज्यासाठी मी एक वेगळ बिल सुचवलेले आहे. केंद्राचा कायदा आपल्याकडे जसाचा तसा आला आहे परंतु आज शिक्षणाच्या संदर्भात आपली काय अवस्था आहे ? we are not prepaid for it असेच म्हणावे लागेल. या विषयाला सिरीअस घेतले गेलेच नाही. जो सिरीअसनेस केंद्र सरकारने दाखवला त्यातील ट्रान्सलेटचा सिरीअसनेस सोडून 10 टक्के सुध्दा सिरीअसनेसने काम झालेले नाही.

मूळ कायद्यात बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्याच्या कलम 1/1 मधील कायद्याच्या कक्षेत हंगामी स्थलांतरित मुलांसाठी विशेष तरतूद आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून स्थलांतरित झालेल्या मुलांची संख्या खूप मोठया प्रमाणात आहे. सीमावर्ती भागातील बरीच मुले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

गुजरातमध्ये वीटभट्टीवर काम करण्यास जात असतात. त्यामुळे कायद्याप्रमाणे आपल्याला स्थलांतरित मुलांचा समावेश करावा लागणार आहे. सांगलीच्या परिसरातील अनेक मुले बेळगावमध्ये ऊस तोडणीच्या कामासाठी स्थलांतरित होत असतात. त्यामुळे या स्थलांतरित झालेल्या मुलांच्या शिक्षणाचे काय ? त्यामुळे हंगामी स्थलांतरित मुलांच्या संदर्भात आपल्या राज्याने काळजी घेतली आहे असे आपल्याला म्हणता येईल. संपूर्ण महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेर हंगामी स्थलांतरित मुले असे आपल्याला ॲड करावे लागेल. तरच आपल्या राज्यात जन्माला आलेल्या सर्व मुलांची आपण चिंता केली असे आपल्याला म्हणता येईल. त्यामुळे आपल्या राज्याने संबंधित राज्यांशी समन्वय साधून राज्याबाहेरील हंगामी स्थलांतरित झालेल्या मुलांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी त्या सरकारशी कोऑर्डीनेट करण्याची आवश्यकता आहे अशा प्रकारची दुरुस्ती मी केलेली आहे.

सभापती महोदय, बालकांची व्याख्येत 6 ते 14 वयोगटाच्या ऐवजी 3 ते 18 वयोगटाचा समावेश करावा अशी तरतूद मी केलेली आहे. मूळ कायद्या प्रमाणे 6 ते 14 वयोगटापर्यंत ठरवलेली आहे परंतु ही मर्यादा 3 ते 18 करावी अशी मी या विधेयकान्वये मागणी केलेली आहे. 3 ते 6 वयोगटातील मुलांना दिल्या जाणा-या पूर्व प्राथमिक शिक्षणाचे महत्व संशोधनाअंती सिध्द झालेले आहे. 3 ते 6 वयोगटात मुलांची ग्रास्पींग पॉवर खूप असते. इंटर नॅशनल स्कूल, या वयोगटातील मुलांनी स्पेलींग पाठ केली पाहिजेत असे म्हणत नाही. तर ते पालकांना सांगतात की, घरामध्ये अशा प्रकारचे शब्द भिंतीला लावावेत. यामुळे मूले ते शब्द फोटोजेनिक मेमरीने ग्रास्प करीत असतात. उदाहरण द्यावयाचे झाले तर "unfortunate"चे स्पेलिंग या वयोगटातील मुलांना येणार नाही परंतु ते स्पेलिंग पाहून पाहून ते त्यांना ते माहीत होत असते. 3 ते 6 वयोगटातील मुलांचा विचार केंद्रातील कायद्यात करण्यात आलेला नसल्यामुळे तो महाराष्ट्राने करण्याची आवश्यकता आहे. या वयोगटाला आपण जे शिक्षण देऊ ते त्याला पुढील काळात उपयोगी पडणार आहे. त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे.

केंद्राने 6 ते 14 वयोगटाचा उल्लेख केलेला आहे परंतु मी या वयोगटाच्या ऐवजी 3 ते 18 वयोगट म्हणत आहे. नॉर्मली 14-15 वर्षात मुले दहावीमध्ये जात असतात. परंतु ज्या घरात शिक्षणाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आवड असते, महत्व असते त्या घरातील 14 ते 15 वर्षातील मुले दहावीमध्ये असतात. परंतु ज्यांना शिक्षणापेक्षा पोटाची काळजी जास्त आहे अशा घरातील मुलांना उशिरा शाळेत टाकले जात असते. मुले जर उशिरा शाळेत जाणार असतील, त्यांचे वय वाढणार असेल तर ते आपल्या कायद्या अंतर्गत येत नाहीत. अठरा पगड जातीच्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शिक्षणास उशिरा सुरुवात होत असते. त्यामुळे ही मुले सक्तीच्या कायद्यात येणार नाहीत. त्यामुळे या मुलांना 18 वयाच्या मर्यादेमध्ये आणले गेले पाहिजे. विशेषत: जी अपंग मुले असतात म्हणजे जी स्लो लर्नर मुले असतात, मेंटली चॅलेंजर असतात, ही मुले केंद्र शासनाच्या कायद्यामध्ये 6 ते 14 वयोगटात बसणार नाहीत. यातील काही मुले 18 वर्षापर्यंत सुध्दा जातील त्यामुळे अशा मुलांची वयोमर्यादा वाढविण्याची आवश्यकता आहे. 16 वयापर्यंत 10 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करावे असे आपल्याला अपेक्षित करताच येणार नाही. परंतु असे आपण केले तर पुरोगामी महाराष्ट्र राज्याने या मुलांचा विचार केला आहे हा आदर्श आपल्या देशातील सर्व राज्यामध्ये जाईल.

सभापती महोदय, वंचित घटकातील बालकाच्या संदर्भात मूळ कायद्यात काय म्हटले आहे ? अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, सामाजिक, शैक्षणिक दृष्टया मागास, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, भौगोलिक, भाषिक, लैंगिक व इतर कोणत्याही कारणामुळे वंचित राहणा-या घटकातील मुलांच्या बाबतीत राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे स्पष्टता आणणे अपेक्षित होते. मला असे वाटते की, याबाबत विचार करीत असतांना आपल्याला व्यापक गोष्टी कराव्या लागणार आहेत. भटक्या व विमुक्त जमाती, धार्मिक भाषिक अल्पसंख्यांक,शारीरिक व मानसिक अपंगत्वाचा उल्लेख केलेला आहे. परंतु शारीरिक व मानसिकतेच्या संदर्भात केंद्राच्या कायद्यामध्ये उल्लेख नाही. मला असे वाटते की, महाराष्ट्राचे नागरीकरण 55 टक्के आहे व बाकीच्या राज्यांची टक्केवारी 24 टक्के आहे. नागरीकरणाच्या समस्येमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर्स जसे आहे तसे हे विषय सुध्दा आता गतीने पुढे येत आहेत. अनाथाश्रम, बालसुधारगृहांमध्ये राहणा-या अशा मुलांचा समावेश केंद्राच्या कायद्यात नसल्यामुळे हे काम आपल्याला करावे लागणार आहे. स्थलांतरित व हंगामी स्थलांतरित करणारी मुले, अनाथ व रस्त्यावर राहणारी बेघर मुले, विस्थापीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

कुटुंबातील मुले, बालकामगार,पोलीस न्यायालयीन कोठडीतील मुलांच्या संदर्भात आपण अधिक स्पेसीफाईड केले तर चांगले होईल परंतु जे शहाणे अधिकारी असतात ते कायद्यांचा दुरुपयोग करीत असतात.

आज मी प्रेरणा संस्थेच्या संदर्भात विशेष उल्लेख उपस्थित केला होता त्यामध्ये इमारत दुरुस्तीला निघाल्यामुळे सेक्स वर्कर्सच्या मुलांना नाईट केअर सेंटरमध्ये ठेवण्याची व्यवस्था न केल्यामुळे गळतीच्या प्रमाणात वाढ होत आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

त्या शाळेचा ड्रॉपर वाढत आहे. तेथे आपण शहाणे बसविले आहेत. कायद्याला धरून त्यांचे बरोबर आहे. त्यात माणुसकी असली पाहिजे. असे मिस इन्टरप्रिट करता येता कामा नये म्हणून यात क्लॅरिटी आणली पाहिजे. दीर्घ आजाराने ग्रासलेली मुले वा दीर्घकाळ रूग्णालयात राहणे आवश्यक असलेली मुले देखील यात आणावी लागतील. एवढे मायन्यूटली आपल्याला करावे लागेल म्हणून त्या प्रमाणे तरतूद मी माझ्या अशासकीय विधेयकात केलेली आहे.

केंद्र शासनाच्या मूळ कायद्यातील कलम 2 (फ) मधील प्राथमिक शिक्षणा ऐवजी शालेय शिक्षण या व्याख्येत 14 वर्षापर्यंत वर्याची मर्यादा ठेवल्यामुळे इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे मी माझ्या अशासकीय विधेयकातील कलम 2 (ट) मध्ये प्राथमिक शिक्षण या ऐवजी शालेय शिक्षण असा उल्लेख केलेला नसून इयत्ता पहिली ते दहावी असा उल्लेख केलेला आहे. या शिवाय कलम 2 (न) मध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण म्हणजे 3 ते 6 वया दरम्यान दिले जाणारे व शालेय शिक्षणाची तयारी करवून घेणारे शिक्षण अशी अधिकची व्याख्या दिलेली आहे. शालेय शिक्षणाची तयारी करून घेणारे शिक्षण म्हणून 3 ते 6 ही वयोमर्यादा नमूद केलेली आहे. अशी तरतूद आपण केली तर त्याचा खऱ्या अर्थाने उपयोग होऊ शकतो.

केंद्र शासनाच्या कलम 2 (ग) मधील पालक व्याख्येमध्ये आई-वडील किंवा मुलाचा ताबा असलेली व्यक्ती असा उल्लेख करण्यात आलेला आहे. मूळ व्याख्येशिवाय स्थलांतरित मुलांच्या बाबतीत "बालक" व त्याच्या पालकांना नोकरीस ठेवणारा मालक किंवा प्रिन्सिपल एम्प्लॉयर व प्रिन्सिपल एम्प्लॉयर नसल्यास शेजार शाळेला संबंधित मुलाचे पालक समजले जाईल असे मी कलम 2 (फ) मध्ये सुचविले आहे. असे जर केले नाही तर काय होईल ? यात कोणाचीही जबाबदारी राहणार नाही. ही जबाबदारी आपल्याला कोणावर तरी निश्चित करावी लागणार आहे. जो नोकरीला ठेवतो तो आणि तो ही नसेल तर मग शेजारच्या शाळेची जबाबदारी असेल असे कायद्यात म्हटले तर यामधून कोणीही सुटू शकणार नाही.

केंद्र शासनाच्या कायद्यातील कलम 2 (ह) मध्ये स्थानिक प्राधिकरणाची व्याख्या नगर परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा वा शाळेवर प्रशासकीय नियंत्रण असणारे प्राधिकरण अशी केलेली आहे. त्यामुळे स्थानिक प्राधिकरण व्याख्येमध्ये अधिक स्पष्टता येणे गरजेचे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आहे. अधिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीने मूळ व्याख्येऐवजी कार्यक्षेत्र असलेला तालुका शिक्षण अधिकारी अशी व्याख्या कलम 2 (ग) मध्ये मी केलेली आहे. तसेच शाळांवर प्रशासकीय नियंत्रण असणाऱ्या प्राधिकरणांचा उल्लेख "स्थानिक स्वराज्य संस्था" म्हणून कलम 2 (ह) मध्ये केलेला आहे. म्हणजे त्यात आपोआप सगळे ॲड होऊ शकते.

नेबर हुड अथवा शेजार शाळा यासंबंधी मूळ कायद्यामध्ये व्याख्याच नाही. पूर्व प्राथमिक इयत्ता म्हणजे पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सध्याच्या रहात्या घरा पासून एक कि.मी.चा परिसर राहील आणि सहावी ते दहावी पर्यंतचा परिसर तीन कि.मी.पर्यंतचा राहील, अशी व्याख्या करण्यात आली आहे. सध्याचे रहाते घर असा उल्लेख केल्यामुळे स्थलांतरित मुलां संदर्भातील संदिग्धता कमी होते. आता आपण बृहत आराखडा तयार केला आहे. त्यात अंतर वाढविले आहे. त्यामुळे मुलींचे ड्रॉपबॅक वाढणार आहे. हा सगळा विषय भ्रूण हत्येशी जोडला जातो. याची सुरूवात या मुळाशी होते. बृहत आराखड्यामध्ये असे वाटते की, सगळेजण आपल्याला लुटायला बसले आहेत. त्यात काही तथ्य असेल. आपण पाच कि.मी.चे अंतर ठेवले आहे. माझ्या मुलीला पाच कि.मी.च्या अंतरावर कुठे पाठवू असा विचार करणारे देखील पालक आहेत. जेथे एस.टी.वाहतुकीची सोय नाही तेथे त्या मुलींचे शिक्षण संपते. शिक्षण थांबते. मग ती मुलगी एखाद्या गावात उभी राहते. इथ पर्यंत सामाजिक परिणाम असतात. त्यामुळे नेबरहुड स्कूल संबंधातील आपण बृहत आराखडा केला आहे, त्यावर सुद्धा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. तो विषय आता नसल्यामुळे त्यावर मी लगेच बोलत नाही.

मूळ कायद्यात शाळा बाह्य मूल अशी व्याख्याच नाही. मी शाळा बाह्य मुलाच्या व्याख्येचा समावेश कलम 2 (ल) मध्ये केला आहे. शाळेत कधीही दाखल न झालेले, कोणत्याही कारणामुळे शाळेत हजर न राहिल्याने शालेय शिक्षण घेणारे, तसेच एखाद्या वर्षात एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी शाळाबाह्य राहिलेले जे मूल आहे त्याला आपण शाळाबाह्य मूल म्हटले पाहिजे. तर त्याचा या सुक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यांतर्गत विचार होऊ शकतो.

पूर्व प्राथमिक शिक्षणा संबंधी मूळ कायद्यात 3 ते 6 वयोगटाचा विचार नाही. त्यामुळे अशी व्याख्या नाही. त्यामुळे कलम 2 (न) मध्ये मी 3 ते 6 वर्षा दरम्यान दिले जाणारे, शालेय शिक्षणासाठी मुलाची तयार करवून घेणारे शिक्षण अशी तरतूद सुचविली आहे. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

अपंग मुलांसाठी विशेष तरतुदी, अपंगत्वाची व्याख्या, रिझनेबल ॲकोमोडेशन, युनिव्हर्सल डिझाईन संबंधी मूळ कायद्यात अपंग मुलांच्या शिक्षणासाठी अपंग व्यक्ती (समान संधी, संरक्षण व संपूर्ण सहभाग) कायदा, 1996 चा आधार घेतलेला आहे. मात्र हा कायदा कालबाह्य झालेला असून केंद्राच्या स्तरावर त्यात सुधारणा प्रस्तावित आहे. या कायद्यात केलेल्या अपंगत्वाच्या व्याख्येला व इतर तरतुदींना काम करणाऱ्या संस्था व तज्ज्ञांचा तीव्र आक्षेप आहे. त्यामुळे मी सदर मसुद्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या अपंग व्यक्तीच्या अधिकारा संदर्भातील कराराचा United Nations Convention for Rights of Persons with Disability चा आधार घेतलेला आहे. अभ्यासक्रमासह संपूर्ण शालेय वातावरणाची, कार्यक्रमाची रचना ही अपंग मुलांना सामावून घेणारी असावी तसेच सर्व बाबतीत अपंग मुलांनाही इतर मुलांप्रमाणे शिक्षणाचा अधिकार उपभोगता यावा यासाठी आवश्यक ते बदल व सुधारणा यास्तव तरतूद करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या करारातील अपंगत्वाची व्याख्या व रिझनेबल अकोमोडेशन, युनिव्हर्सल डिझाईन या संज्ञांचा वापर केलेला आहे. सर्व शाळा या युनिव्हर्सली डिझाईन्ड असाव्यात अशी तरतूद कलम 2 (इ), (प), (झ) मध्ये केलेली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी युनिव्हर्सल डिझाईन संबंधी अधिक स्पष्टता करावी अशी मी आपल्या मार्फत त्यांना विनंती करीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, United Nations मध्ये Convention for Rights of Persons with Disability झाले होते. वेगवेगळ्या देशामध्ये डी.सी.रूल करताना रॅम्प असले पाहिजे इथ पासून त्यांचे ॲकेडेमिक कोर्सेस कसे असावेत एवढा विचार United Nations मध्ये झालेला आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी युनिव्हर्सल डिझाईन असा उल्लेख केला आहे. मला आपल्या मार्फत सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, त्यांनी शाळेची इमारत ही युनिव्हर्सल डिझाईन्ड असावी असा उल्लेख करावा.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या शाळा युनिव्हर्सल डिसाईन असाव्यात असे मी म्हणतो. मला फक्त स्ट्रक्चर पर्यंत म्हणावयाचे नाही. स्ट्रक्चर तर आहेच. पण जो स्लो लर्नर मुलगा असतो त्याला नॉर्मल शाळा घेत नाही. नॉर्मल शाळेने घेतले तर तो मुलगा पुढच्या 3-4 वर्षात नॉर्मल होऊ शकतो. पण त्या शाळेतील प्राचार्य आणि शिक्षक कसे असतात ? ते त्या मुलावर विशेष मेहनत घ्यायला तयार नसतात. त्या मुलासाठी थोडे स्लो जावे लागते. त्यामुळे तो मुलगा आमच्या शाळेत नको असा विचार करतात. त्यामुळे त्या मुलाला मतिमंद मुलांच्या शाळेत दाखल करायला सांगतात. जो मुलगा पूर्णपणे बरा होणार असतो त्याला पूर्णपणे मतिमंद करण्याचे काम आपल्या नॉर्मल शाळेमध्ये होते. त्याचा उल्लेख यामध्ये झाला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महाराष्ट्र असे आपल्याला अभिमानाने म्हणावयाचे असेल तर अत्यंत बारकाईने आपल्याला विचार करावा लागेल. त्यामुळे मला असे वाटते की, शारीरिकदृष्टया अपंग असलेल्या मुलांसाठी रॅम्प केले, टॉयलेटची उंची खाली आणली हा स्ट्रक्टचरल भाग होऊ शकतो. पण काही शाळांमध्ये तेही नसते हे दुर्दैव आहे. तसेच, सिलॅबसचा कसा विचार केला जातो हे देखील मी आपल्या निदर्शनास आणणार आहे.

अपंग मुलांच्या शिक्षणाप्रती विशेष काळजी घेण्याबाबत केंद्राच्या कायद्यामध्ये ढोबळ उल्लेख आहे. त्यामुळे मी कलम 8 (क), 9 (क), 12(1) (क) मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शाळेच्या जबाबदाऱ्यांचा उल्लेख करताना दुर्बल व वंचित घटकातील मुलांसोबत अपंग मुलांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे व कोणत्याही प्रकारे भेदभाव केला जाऊन या मुलांच्या शिक्षणात अडथळा आणला जाणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व शाळांनी घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.सरफरे...

अशुद्धीत मत / मुद्रणाधीन नाही

श्री. विनोद तावडे...

उपचाराचे प्रशिक्षण किंवा रेमेडियल टिचिंगची तरतूद मूळ कायद्यात कुठेही नाही. मूळ कायद्यामध्ये मुलाच्या वयानुसार संबंधित इयत्तेत दाखल करण्यासाठी आवश्यक विशेष प्रशिक्षणाची तरतूद आहे. मात्र नियमित मूल्यमापना दरम्यान विद्यार्थी एखाद्या विषयात अपेक्षित प्रगती साधू न शकल्यास त्याला उपचारात्मक प्रशिक्षण देण्याची तरतूद मूळ कायद्यात नाही. अशी तरतूद या मसुद्यात केलेली आहे कोणत्याही कारणामुळे जर विद्यार्थ्यास नियमित शिकविण्याच्या पध्दतीचा उपयोग होत नसल्याचे व त्याने अपेक्षित प्रगती साधण्यासाठी विशेष प्रयत्न व वेगळी पध्दत अवलंबिणे आवश्यक असल्याचे मूल्यमापनाव्दारे स्पष्ट झाल्यास त्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. हंगामी स्थलांतर करणाऱ्या मुलांसाठी दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळण्याचा अधिकार असलेली तरतूद महत्वाची आहे. सभापती महोदय, यामध्ये शैक्षणिक वर्षादरम्यान कोणत्याही वेळी at any point of time during the academic year असे अधिकचे शब्द टाकले पाहिजेत. नाही तर त्या शाळा टोलवितात. आमच्याकडे जागा नाही असे सांगून त्यांना प्रवेश देत नाहीत. तेव्हा हंगामी स्थलांतर करणाऱ्या मुलांसाठी ही महत्वाची तरतूद आहे. त्या करिता आपल्याला ही तरतूद टाकावी लागेल नाही तर या मुलांना टाकून देण्याचे काम या शाळा करीत असल्याचा आपल्याला अनुभव येईल. आमदारांकडून दबाव आणून देखील त्या शाळा मुलांना प्रवेश देत नाहीत. शिक्षण विभागाचा बडगा दाखवून अमुक संख्येच्या पलीकडे आम्ही मुले घेत नाही असे सांगतात. या करिता या तरतुदीची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, "कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान" यामध्ये केंद्राच्या कायद्यात केंद्राने राज्यांना अनुदान देण्याविषयी कलम 7 मध्ये तरतूद केली आहे. केंद्राच्या कायद्यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना किती अनुदान द्यावे यासंबंधी अभ्यास करण्यासाठी राज्यपाल राज्य वित्त आयोगास विनंती करु शकतील अशी तरतूद करण्यात आली आहे. या सर्व गोष्टी हवेत होणार नाहीत तर त्यासाठी आपल्याला कायदा अंमलात आणावा लागेल. आपल्याला शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा कायदा राबवावयाचा असेल तर खालच्या पातळीवर पैसे दिल्याशिवाय तो होणार नाही. ते पैसे द्यावयाचे असतील तर सन्माननीय राज्यपालांनी राज्य वित्त आयोगाला त्या बाबतची व्यवस्था वित्त आयोगाने करण्याची गरज आहे अशा सूचना दिल्या पाहिजेत. त्यानंतर "खाजगी शाळांची वंचित घटकाप्रती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

सामाजिक जबाबदारी" या बाबतीत केंद्राच्या कायद्यामधील कलम 12(2) मध्ये 25 टक्के जागा दुर्बल व वंचित घटकातील मुलांसाठी राखीव ठेवण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्या बाबतीत या विधेयकामध्ये "शासनाने दिलेल्या खर्चाच्या परतफेडीपेक्षा या मुलांच्या शिक्षणावर होणारा अधिकचा खर्च शाळांनी आपली "सामाजिक जबाबदारी" म्हणून उचलावा, मात्र राखीव जागांवर दाखल झालेल्या मुलांमध्ये व इतर मुलांमध्ये कधीही व कोणत्याही प्रकारे भेदभाव होता कामा नये" अशी तरतूद करण्यात आली आहे. तसे केले नाही तर पेडवाले आणि नॉन पेडवाले यांची शाळेमध्ये वेगवेगळी डिव्हिजन केली जाते. त्यांचा गणवेश वेगळा ठेवला जातो. अशा प्रकारच्या गोष्टी होत असल्यामुळे यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव होता कामा नये याची जबाबदारी त्या शाळांनी उचलली पाहिजे याचा विचार मी या विधेयकामध्ये केलेला आहे.

तसेच, राखीव जागांसाठी मुले कशी निवडावीत याची कुठेही स्पष्टता नसल्यामुळे ती निवडण्याची प्रक्रिया राज्य शासनाला स्पष्ट करावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत मुले निवडण्याचे स्वातंत्र्य शाळांना न देता स्थानिक स्वराज्य संस्थांना किंवा स्थानिक प्राधिकारी संस्थेला देण्यात यावे. या बाबतीत आपण शाळांना स्वातंत्र्य दिले तर शाळेचे व्यवस्थापन 25 टक्के मुले दाबून टाकतील त्यामुळे मूळ कायद्याचा उद्देश बाजूला राहील. शाळेच्या मॅनेजमेंटला येनकेन प्रकारे अनेक गोष्टी करावयाच्या असतात व मॅनेजमेंट त्या गोष्टी करीत असते. यासाठी कलम 11(3) मध्ये मी उल्लेख केला आहे. केंद्राच्या कायद्यातील कलम 14 मध्ये असे म्हटले आहे की, "वयाचा दाखला नसला तरी प्रवेश नाकारता येणार नाही" केंद्र शासनाने दिलेल्या आदर्श नियमावली नुसार "कोणत्याही प्रकारचे दाखले नसल्यास पालकांनी प्रतिज्ञा पत्र सादर करावे" असे म्हटले आहे . मी विधेयकाच्या कलम 13(2) मध्ये असे म्हटले आहे की, "कोणत्याही प्रकारचा दाखला नसल्यास पालकांनी केलेले साधे प्रतिज्ञा पत्र सुध्दा ग्राह्य धरले जाईल."

सभापती महोदय, प्रतिज्ञा पत्र करण्यासाठी ग्रामीण भागात नोटरी सापडत नाही, आपण मला एक तरी नोटरी दाखवा. गावामध्ये जरी नोटरी असला तरी तो 500 रुपयांपेक्षा कमी फी घेत नाही? निवडणुकीचा अर्ज सादर करीत असतांना करावयाच्या प्रतिज्ञा पत्रासाठी आपल्याला सुध्दा नोटरीला पैसे द्यावे लागतात. परंतु आपल्या मुलाच्या शाळा प्रवेशाच्या वेळी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र तयार करण्यासाठी नोटरीला कुठे शोधत राहावयाचे, तो सापडणार कुठे, कोर्टामध्ये जावून प्रतिज्ञापत्र करावयाचे काय ? हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

काम करण्यासाठी जर त्याला हजार रुपये खर्च येणार असेल तर तो जन्म दाखला कोठून तरी शोधून आणील. या ठिकाणी रोगापेक्षा इलाज भयंकर दाखविण्यात आला असल्यामुळे नोटरीकडे जावून प्रतिज्ञा पत्र आणणे त्याला शक्य होणार नाही. या करिता पालकांनी दिलेले डिक्लेरेशन ग्राह्य धरले तर ते मुलाच्या शाळा प्रवेशासाठी अतिशय उपयोगी ठरेल. ग्रामीण खेडवळ भागातील परिस्थितीचा विचार करुन या तरतुदीबाबत विचार करण्याची गरज आहे. वयाचा पुरावा नसल्याचे कारण सांगून प्रवेश नाकारु नये अशी कायद्यात तरतूद असली तरी ती न पाळणाऱ्या शाळेवर कोणत्याही कारवाईची तरतूद नाही. केंद्राच्या कायद्यामध्ये दात नसल्यामुळे फक्त चघळत राहण्याचे काम केले आहे. सभापती महोदय, घणसोली आणि नागपूरच्या शाळेमध्ये नुकत्याच घडलेल्या घटनेचे उदाहरण मी आपल्याला देतो. काही मुलांच्या पालकांनी आर.टी.आय. व्दारे माहिती मागविली म्हणून शाळेच्या व्यवस्थापनाने त्या मुलांना शाळेतून काढून महिनाभर बाहेर बसविले. ही बाब सन्माननीय शिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून दिली असता, असे जर कुठे घडले असेल तर मी ताबडतोब कारवाई करतो असे सांगून त्यांनी ताबडतोब कारवाई केली. परंतु त्यांच्या कारवाईला हायकोर्टाने स्टे दिला. शिक्षण खात्याच्या कारवाईला फाटयावर मारुन त्या शाळेने मुलांना काढून टाकले.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : ही चर्चा 5.55 वाजता संपवावयाची आहे, अजून दोन सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे आपणास आणखी किती वेळ लागणार आहे?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी जनरल भाषण न करता क्लॉज टू क्लॉज माझे म्हणणे मांडीत आहे. माझे म्हणणे सन्माननीय शिक्षण मंत्री आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य देखील मान्य करतील. या बाबतीत आपण घाई करु नये असे मला वाटते. अशासकीय कामकाजासाठी अडीच तासाची वेळ असते हे मला मान्य आहे. हे अडीच तास संपणार असतील तर मी या विधेयकावर ऑन लेग राहतो, ज्यावेळी पुन्हा अशासकीय विधेयकाचे लॉट पडतील...

तालिका सभापती : आपल्याला ही चर्चा आजच संपवावयाची आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुढील लॉटमध्ये हे बिल आले तर यावरील चर्चा पुढे कंटिन्यू होऊ शकते, ते बिल लॅप्स होणार नाही असे आपल्याला करता येऊ शकेल. माझी आपणास विनंती आहे की, या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आपण या विधेयकाच्या बाबतीत घाई न करता ही चर्चा ऑन लेग ठेवावी. ज्यावेळी अशासकीय विधेयकांचा लॉट पडेल त्यावेळी हे बिल पुन्हा येऊ शकते आणि त्यावरील चर्चा आपल्याला पुढे चालू ठेवता येऊ शकते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आजच्या चर्चेला वेळेचे बंधन आहे हे मला मान्य आहे. ही चर्चा अपूरी राहिली तर सन्माननीय सभापती आणि सभागृहाच्या परवानगी पुढील आठवडयात आपल्याला ती घेता येईल. सभापती महोदयांनी निर्णय दिला असल्यामुळे आता आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे आणि सन्माननीय सदस्यांना ऑन लेग ठेवावे. सन्माननीय सदस्यांनी एक चांगल्या विषयावर चर्चा उपस्थित केली असल्यामुळे त्यावर साधक बाधक चर्चा झाली पाहिजे. आपण या विधिमंडळामध्ये बाकीच्या गोष्टींसाठी वेळ देतो परंतु ज्या कामकाजासाठी हे विधिमंडळ आहे त्या विधीसाठी आपण वेळ देवू शकत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला एक गोष्ट मान्य आहे की, मी ऑन लेग राहिल्यानंतर ज्यावेळी अशासकीय बिलाचे पुन्हा लॉटस पडतील त्यावेळी हे बिल पुन्हा सिलेक्ट झाले तर ते अशासकीय विधेयके व ठराव समितीकडे जाईल. समितीने या विधेयकाला मान्यता दिल्यास समितीच्या सदस्यांना भेटून या विधेयकासाठी पुढील अशासकीय कामकाजामध्ये एक ते दोन तास अधिक आम्ही मागू शकतो. परंतु या विधेयकावर सांगोपांग चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 5.55 वाजेपर्यंत आहे. त्या मध्ये मंत्रीमहोदयांचे उत्तर देखील समाविष्ट आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, तो पर्यंत माझे भाषण संपणार नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्हाला देखील या विधेयकावर बोलावयाचे आहे.

तालिका सभापती : आपल्यावर वेळेचे बंधन आहे.काल या संबंधीचा ठराव सभागृहामध्ये मताला टाकण्यात आला त्या वेळी आपण आपले मत मांडले नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पुढील वेळी अशासकीय विधेयकांचे लॉट्स पडतील त्यावेळी हे बिल पुन्हा लॉटमध्ये आले तर ते घेण्यात यावे . आता मी ऑन लेग राहिल्यानंतर आपण ते बिल ताबडतोब घ्यावे असा माझा आग्रह नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आजच्या दिवसाच्या ठरविण्यात आलेल्या कामकाजामध्ये हे विधेयक मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावयाचे आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.तावडे साहेबांच्या भाषणानंतर आम्हाला देखील या विधेयकावर बोलावयाचे आहे. या करिता आपण हे विधेयक ऑन लेग ठेवावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हे विधेयक ऑन लेग ठेवावे अशी दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे.

श्री.कपिल पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, मग आज सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे भाषण अर्धवट राहू द्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कलम 13 व 14 मध्ये मी असे म्हटलेले आहे की, "वयाचा पुरावा नसल्याच्या कारणावरुन कोणत्याही मुलास प्रवेश नाकारणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकांना तरतुदीचा भंग केल्याच्या प्रत्येक प्रकरणी व्यक्तीश: जबाबदार धरावे आणि त्यासाठी टोकन म्हणून 5 हजाराच्या दंडाची तरतूद सुचविलेली आहे. तसेच कलम 15 मध्ये वर्षभरात केव्हाही प्रवेश मिळण्याची जी तरतूद आहे, त्याच्या सोबत मी अधिकच्या ज्या तरतूदी सुचविल्या आहेत त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"सदर विद्यार्थ्याचा अभ्यास कशा पध्दतीने पूर्ण करुन घेतला जावा याचा निर्णय राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (एससीईआरटी) दिलेल्या सुचनांच्या आधारे "शाळा व्यवस्थापन समिती" घेईल." कारण जर एखादा विद्यार्थ्याने मध्येच सी.बी.एस.ई.पॅटर्न बदलून एस.एस.ई.बोर्डाच्या पॅटर्नमध्ये प्रवेश घेतला तर मग त्याचा अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार? तर त्यासाठी काही नॉर्म्स् असावयास पाहिजे.अशा वेळी एस.ई.आर.डी.आहे, त्याच्या आधारे शाळा व्यवस्थापन समिती आहे, त्यानुसार करता येईल कारण अशा केसेस खूप नसणार.काही केसेस असतील. परंतु तसे असले तरी सदरहू मुलाच्या दृष्टीने ही बाब महत्वाची असणार आहे. त्यामुळे त्याने सहा महिने मागे जावे किंवा सहा महिने पुढे जावे असे न करता शाळा व्यवस्थापन समिती याबाबत विचार करुन निर्णय घेऊ शकते अशा प्रकारची यामध्ये व्यवस्था केलेली आहे. समजा जर मध्येच प्रवेश नाकारला तर शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रत्येक प्रकरणी 5 हजार रुपयांचा दंड ठेवला तर सदरहू मुख्याध्यापक हे या सर्व गोष्टीला अकाऊंटेबल रहातील हा यातील विचार आहे.

सभापती महोदय, "शाळेतून काढून न टाकता येण्याची तरतूद" यामध्ये असे म्हटलेले आहे की,"शाळेत दाखल झालेल्या कोणत्याही मुलास त्याच इयत्तेत पुन्हा बसविता येणार नाही वा त्याला शाळेतून काढून टाकता येणार नाही." असे केंद्र शासनाने म्हटलेले आहे.या तरतुदींसोबतच मी अधिकच्या तरतुदींमध्ये असे सुचविले आहे की,"नियमित होणाऱ्या सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापना व्दारे जेव्हा असे आढळून येईल की एखादा विद्यार्थी विशिष्ट विषयांमध्ये अपेक्षित प्रगती साधू शकलेला नाही तेव्हा त्याने अपेक्षित प्रगती साधेपर्यंत त्याला संबंधित शिक्षक उपचारात्मक प्रशिक्षण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देईल.असे प्रशिक्षण पुरविण्यास शाळा व्यवस्थापन सहकार्य करील." म्हणजे तो मुलगा आठवी पर्यंत शिकत राहील, पास होणार नाही. अशा प्रकारे स्पेशल इफेक्ट द्यावे लागतील. तसेच पुढे असे सुचविले आहे की, "विद्यार्थ्यास त्याच इयत्तेत बसविणाऱ्या वा शाळेतून काढून टाकणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकास प्रत्येक प्रकरणी रु. 5 हजारांचा दंड होईल."

तसेच "शारीरिक शिक्षा वा मानसिक छळास मज्जाव" या तरतुदीचा भंग करणाऱ्या व्यक्तीवर त्या व्यक्तीस लागू होणाऱ्या नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई होईल." ही कारवाई कोणती असेल तर कलम 16 (2) मध्ये मी "त्या व्यक्तीला 25 हजार रुपयांच्या दंडाची तरतूद सुचविलेली आहे." कारण शाळेत मुलांना मारणे, बडवणे किंवा विशिष्ट धर्माच्या शाळेमध्ये हातावर मेंदी काढली म्हणून मारणे किंवा आणखी काही केले म्हणून उभे करणे म्हणजे "छडी लागे छमछम, विद्या येई घमघम" याचे दिवस आता गेले. आता शिक्षणाची वेगळी पध्दत आहे आणि ते त्याचप्रमाणे केले पाहिजे. परंतु शिक्षक जुने कुठला तरी मॅटीनी सिनेमा पाहतात आणि मग "छडी लागे छमछम, विद्या येई घमघम" प्रमाणे सुरु होतात. अनेक वेळा श्यामच्या आईचे उदाहरण दिले जाते की,"पायाला माती लागण्याची चिंता करतोस पण मनाला लागणार नाही याची चिंता कर" असे ती म्हणते. पण आता आईने सदरहू वाक्य जशाच्या तसे न घेता, त्या आईनेच स्वत: इंटरनेट शिकले पाहिजे व आपला मुलगा इंटरनेटवर पोर्नोग्राफीक साईटस् ओपन करुन त्याच्या मेंदूला माती तर लागत नाही ना याची काळजी घेतली पाहिजे हे श्यामच्या आईचे इंटरपिटीशन आजच्या पालकांपर्यंत जाण्याची गरज आहे आणि तसे ते जात नाही हे दुर्दैव आहे. त्यामुळे जुन्या काळातील ज्या गोष्टी आहेत, त्या सध्याच्या काळामध्ये इंटरप्रीट कशा करावयाच्या.

सभापती महोदय,मुलांना मारण्यात आल्याच्या बातम्या आम्ही एक-दोन महिन्यांनी टी.व्ही. पहात असतो. पण मारुन कोणी शिकत नाही. मला आपल्या सर्वांच्या माहितीसाठी सांगावयाचे आहे की, माझा अतिशय चांगला जवळचा मित्र पाचवी-सहावीमध्ये असताना पाच-सहा जण लपून सिगरेट प्यावयास गेले आणि त्यांच्या पैकी कोणाच्या तरी शेजारी रहाणाऱ्या एका काकांनी ते पाहिले आणि त्यांनी त्या सगळयांच्या म्हणजे पाच जणांच्या घरी सांगितले. या पाच जणांपैकी चार जणांच्या घरी त्यांना बडव-बडव बडविले, फटकावले. मात्र माझा पाचवा मुलगा हा माझा मित्र होता. त्याचे नाव विनय असे होते. त्याला टेंशन होते. त्याचे वडील घरी आले तेव्हा त्यांना जाणवले की,घरामध्ये टेंशन आहे.त्यांनी विचारले की, काय झाले ? त्यावर आई,बहिण आणि भाऊ हे तिघेही गप्प बसले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेवटी त्याच्या बहिणीने सांगितले की, आज विनयने सिगरेट ओढली. त्याचे वडील म्हणाले की, तू सिगरेट ओढलीस? त्यावर विनय म्हणाला की, सगळे गेले म्हणून . . .मग त्याच्या वडिलांनी त्याला विचारले की, यात तू चूक केली आहे काय ? तर विनय म्हणाला की, मी चूक केली. त्यावर वडिलांनी परत त्याला विचारले की,तू पुन्हा अशी चूक करणार नाहीस? त्यावर विनय म्हणाला की, बाबा, मी पुन्हा सिगरेट ओढणार नाही. त्याच्या बाबांनी विचारले नक्की ? विनय म्हणाला नक्की. त्यानंतर त्याचे वडील विनयच्या आईला म्हणाले की,आज विनयने चांगला निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे तू आज जेवणामध्ये शिरा कर. दुसरीकडे विनयच्या ज्या चार मित्रांना बडविण्यात आले होते ते आज चेन स्मोकर आहेत आणि विनयने आयुष्यामध्ये सिगरेटला कधीही हात लावला नाही.अशा प्रकारे मुलांपर्यंत जो भाव पोहोचला पाहिजे,तो सध्याच्या काळामध्ये दुर्दैवाने मुलांपर्यंत पोहोचतोच असे नाही.कारण सकाळी घरातून वैतागून तो शिक्षक शाळेमध्ये आलेला असतो आणि त्यामुळे घरचा राग शाळेतील मुलांवर काढला जातो. यादृष्टीने येथे तरतूद केली आहे. या विषयावर मोठे व्याख्यान होऊ शकते. पण आता वेळ कमी आहे म्हणून पुढच्या मुद्याबाबत सांगू इच्छितो.

सभापती महोदय,"कायद्यांतर्गत मान्यतेचे प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय शाळा स्थापन करण्यास मनाई" असे म्हटलेले आहे. केंद्र शासनाच्या मूळ कायद्यात म्हटलेले आहे की,"शासनाच्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळां व्यतिरिक्त सर्व शाळांसाठी असे प्रमाणपत्र मिळविणे बंधनकारक आहे. कायद्याने ठरवून दिलेले निकष व मानकांचे (norms and standards) पालन करणाऱ्या शाळेसच असे प्रमाणपत्र मिळेल. या तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस दंडाची तरतूद आहे."परंतु मूळ कायद्यामध्ये ही तरतूद केवळ खाजगी शाळांना लागू आहे म्हणजे नॉर्म्स् आणि स्टॅण्डर्डस् हे केवळ खाजगी शाळांनीच पाळावयाचे काय? जिल्हा परिषदेच्या, महानगर पालिकांच्या शाळांनी पाळावयाचे नाहीत काय? या नॉर्म्स्चे उल्लंघन करणाऱ्यांसाठी दंडाची कोणती तरतूद केलेली आहे? त्यामुळे "शासनाने किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या शाळांना आवश्यक ती सर्व संसाधने पुरवणे ही राज्य शासनाची आत्यंतिक जबाबदारी म्हणजे (utmost duty) राहील असे मी कलम 17-6 च्या बाबतीत म्हटलेले आहे.संबंधितांनी केले नाही असे म्हणून हात झटकता येणार नाहीत. वेतनेतर अनुदान देणार नाही. जे रिटायर झाले आहेत, त्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी परवानगी देणार नाही आणि तरी देखील या शाळा नॉर्म्स्नुसार चालविण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याव्यात असे शासन सांगणार. तसेच शिक्षण सेवकांचे 35 हजार अर्जाबाबत अर्थ विभाग काहीही करणार नाही. मग शासन असे म्हणणार की, अरे वा, असे कसे चालेल? याबाबतीत शासनाची ॲटमोस्ट ड्युटी असावयास पाहिजे.

सभापती महोदय, पुढे कलम (2) मध्ये असे म्हटलेले आहे की,"शासन व स्थानिक स्वराज्य संस्था ते चालवित असलेल्या शाळांसाठी महाराष्ट्र राज्य बालकांचे हक्क संरक्षण आयोगाकडून मंजुरीचे प्रमाणपत्र (Letter of Approval) मिळवतील. शाळेने ठरवून दिलेल्या निकषांचे व मानकांचे पालन केल्याशिवाय सदर प्रमाणपत्र दिले जाणार नाही" असे मी कलम 17 (7)मध्ये म्हटलेले आहे. (3) यामध्ये असे म्हटलेले आहे की,"राज्य शासन नियमांव्दारे मंजुरीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जांची प्रक्रिया विशद करेल. (4) यामध्ये असे म्हटलेले आहे की,"मंजुरीचे प्रमाणपत्र मिळविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बालकांचे हक्क संरक्षण आयोगाला दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या संबधित अधिकाऱ्याला व्यक्तीश: जबाबदार धरले जाईल." कारण कागदोपत्री दाखवितात,जाहीर करतात आणि मग लक्षात येते की, सदरहू कागदपत्रे चुकीची आहेत."

सभापती महोदय, मी उदाहरण देऊ इच्छितो की, पनवेल येथील आश्रमशाळेमध्ये मतीमंद मुलींवर लैंगिक अत्याचार झाले.परंतु त्या आश्रमशाळेला परवानगी देण्यासाठी जी कागदपत्रे सादर करण्यात आली, तीच चुकीची होती आणि शासनाने सध्याच्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे.पण मुळामध्ये या आश्रमशाळेला परवानगी देणारा त्यावेळी अधिकारी कोण होता?त्याने याला परवानगी कशी दिली ? परंतु तो अधिकारी सुटला आणि सध्याचा जो अधिकारी आहे तो सापडला आहे. यामध्ये सध्याचा अधिकारी देखील दोषी आहेच पण मुळामध्ये पूर्वीचा अधिकारी दोषी आहे आणि तो सुटता कामा नये.त्यामुळे पूर्वी ज्या अधिकाऱ्याने परवानगी दिली होती, त्याचेवर शिस्तभंगाची कारवाई तसेच प्रत्येक प्रकरणात रु.50 हजार दंडाची शिक्षा होईल." असे कलम 17 (9) मध्ये सुचविले आहे.

सभापती महोदय, शाळा स्थापनेसाठी निकष व मानके (norms and standreds) काय असावीत.यामध्ये केंद्र शासनाने असे म्हटलेले आहे की,"निकषांची पूर्तता केल्याशिवाय शाळेला मान्यता मिळणार नाही.त्याच बरोबर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी पासून सुरु असलेल्या शाळांना कायदा लागू झाल्यापासून 3 वर्षाच्या आत निकषांची पूर्तता करण्याची तरतूद केलेली आहे." अशा

श्री.विनोद तावडे . . . .

वेळी मूळ तरतुदींच्या सोबत पुढील तरतुदींचा समावेश करण्यासाठी जे सुचविले आहे ते अधिक चांगल्या प्रकारे अंमलात आणता येईल."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

1)जो अधिकारी निकषांची पूर्तता न करणाऱ्या शाळेस मान्यतेचे प्रमाणपत्र देईल त्याच्यावर शीस्तभंगाची कारवाई तसेच प्रत्येक प्रकरणात रु.50 हजार दंडाची शिक्षा होईल. 2) कायदा लागू होण्या पूर्वीपासून सुरु असलेल्या शासनाने किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या शाळेस कायदा लागू झाल्यापासून 3 वर्षाच्या आत निकषांची पूर्तता करावी लागेल हे मी (कलम 18 (1)सह ॲड केलेले आहे. 3) वर नमूद केल्याप्रमाणे 3 वर्षाच्या आत निकषांची पूर्तता न करणाऱ्या शासनाने किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या शाळेचे मंजुरीचे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य बालकांचे हक्क संरक्षण आयोग काढून घेईल.(कलम 18(7))त्यामध्ये टाकलेले आहे. 4) अशा प्रकारे मंजुरी काढून घेतलेली शाळा चालविता येणार नाही व ज्या गट शिक्षण अधिकाऱ्याच्या अधिकार क्षेत्रात ही शाळा असेल तो व्यक्तीश: यास जबाबदार राहील व अशा प्रत्येक घटनेत त्याला रु. 1 लाखापर्यंतचा दंड व मंजुरीशिवाय शाळा सुरु ठेवल्याच्या प्रत्येक दिवशी रु. 10 हजाराचा दंड होईल. असे मी म्हटलेले आहे. अशी काही तरी मोठी शिक्षा दिली तर हे सर्व शिक्षणाधिकारी काळजीपूर्वक काम करतील. अन्यथा त्यांना जे पैसे मिळतात त्यात त्यांना दंड भरणे आणि बदली करुन घेणे सोपे जाते. म्हणून या संदर्भात अशी काही तरी तरतूद केली तर ती उपयुक्त होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, माझा पुढील मुद्दा असा आहे की, शाळांवरील कार्यवाहीसाठी पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. कलम 13 नुसार डोनेशन घेणाऱ्या, कलम 18 नुसार मान्यतेचे प्रमाणपत्र न मिळविता चालणाऱ्या व कलम 19 नुसार मान्यता काढून घेतल्यानंतरही चालणाऱ्या शाळांवरील कारवाईसाठी शासनाने नेमून दिलेल्या अधिकाऱ्याची पूर्व परवानगी आवश्यक ठरविण्यात आली आहे असे कलम 36 मध्ये म्हटले आहे. यातून भ्रष्टाचार होऊ शकतो मग कोणावरही कारवाई करण्याच्या आधी परवानगी घ्या. समजा माझ्या असे लक्षात आले की, अमुक शाळेमध्ये चुकीचे चालले आहे म्हणून मी परवानगी दिली तर माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेतल्यानंतर पेन्डिग आहे, पेन्डिग आहे अशा प्रकारची माहिती मिळते. कारवाई होत नाही. त्याप्रमाणे मुलगा इयत्ता पहिलीमध्ये असताना जर त्याच्या आईने अर्ज केला तर तो मुलगा इयत्ता दहावी होईपर्यंत तो अधिकारी ऐकतच नाही.म्हणून अशा प्रकारची एखादी सोय करताना ती पुरक आहे की मारक आहे, याचा शासनाने विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे यामध्ये करण्यात आलेली ही सोय काढून टाकण्याची गरज आहे. ..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सभापती महोदय, शाळा व्यवस्थापन समितीच्या रचनेत व जबाबदारीमध्ये स्पष्टता या बाबतीत मी बोलू इच्छितो. काही दिवसांपूर्वीच मी शिक्षण शुल्क नियमन समितीच्या संयुक्त समितीमध्ये हा मुद्दा उपस्थित केला होता. नवीन कायद्याचा विचार केला तर आज आपले जे म्हणणे आहे ते नवीन कायदा आल्यानंतर सर्व बाद ठरणार आहे. पण ते होईपर्यंत आपण हे थांबविले तर हेही होणार नाही म्हणून शिक्षण मंत्री महोदयांनी आपण आता हे करु आणि जेव्हा नवीन कायदा होईल तेव्हा त्याचा विचार नंतर करु, असा विचार मांडला होता. त्यामुळे मूळ कायद्यामध्ये विनाअनुदानित शाळा वगळता सर्व शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात यावी, या समितीचे किमान तीन चतुर्थांश सदस्य पालक असावेत, दुर्बल व वंचित घटकांतील पालकांना योग्य प्रतिनिधित्व असावे, 50 टक्के सदस्य महिला असाव्यात अशी जी सर्व तरतूद करण्यात आलेली आहे त्या बाबतीत मी असे म्हटले आहे की, "समितीची कमीत कमी किंवा जास्तीतजास्त सदस्य संख्या किती असावी व दुर्बल व वंचित घटकातील पालकांना किती प्रतिनिधित्व असावे याचा उल्लेख मूळ कायद्यात नाही. समिती किती मोठी असावी? हे स्पेसिफाय केलेले नाही. शासनाने नियम केलेले नाहीत आणि शासनाने ते स्पेसिफाय केलेले नाहीत. ही जी शाळा व्यवस्थापन समिती आहे ती किती सदस्यांची असली पाहिजे आणि ती केवळ विनाअनुदानित शाळांमध्ये असली पाहिजे असे नाही तर ती अनुदानित शाळांमध्येसुध्दा असली पाहिजे. केवळ विनाअनुदानित शाळांमध्ये व्यवस्थापन समिती असून चालणार नाही तर ती सर्व शाळांमध्ये असली पाहिजे, असे मी कलम 20 (1) मध्ये म्हटलेले आहे.

समितीत प्रत्येक वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा किमान एक पालक असेल तसेच शिक्षक वा शाळा व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींची संख्या व इतर सदस्यांची संख्या ही पालकांच्या संख्येच्या निम्म्यापेक्षा अधिक नसेल. तसेच समितीतील 50 टक्के सदस्य महिला असतील व पालक प्रतिनिधींपैकी 25 टक्के सदस्य दुर्बल व वंचित घटकांचे प्रतिनिधित्व करणारे असतील, असे मी कलम 20 (2) मध्ये म्हटलेले आहे. शाळा विकास आराखडा तयार करणे, त्याच्या अंमलबजावणीवर देखरेक ठेवणे, शाळेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे व शाळेला प्रभावी शैक्षणिक संस्था बनविण्यासाठी आवश्यक ती इतर कार्ये पार पाडणे ही या समितीची कार्य असतील, असे मी कलम 20 (3) मध्ये म्हटलेले आहे. त्यानंतर जो लॉजिस्टिकल सपोर्ट लागतो तो सपोर्ट या समितीला

..3..

श्री. विनोद तावडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्याची जाबाबदारी त्या व्यवस्थापनावर दिली पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने ही समिती चांगले काम करु शकेल, असे मी कलम 20(4) मध्ये म्हटलेले आहे.

त्यानंतर विनाअनुदानित शाळांनाही विकास आराखडा बंधनकारक राहील,शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या व अनुदानित शाळांच्या बाबतीत शासनाने या शाळांना द्यावयाचा निधी शाळा विकास आराखडयानुसार असेल. ही तरतूद बरोबर आहे. पण विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत शाळा विकास आराखडा शाळा मान्यतेच्या निकषांची पुर्तता करण्याच्या दृष्टीने व शाळांच्या कामकाजाच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापनास मार्गदर्शक ठरेल. विनाअनुदानित शाळांचा विकास आराखडा नसेल तर पुन्हा इकडची मुले तिकडे पळवा आणि तिकडची मुले इकडे पळवा असा प्रकार होईल. पारवाच्या दिवशी शिक्षण मंत्री महोदयांनी जे सांगितलेले आहे ते ॲम्बिसेस आहे. एकाच दिवशी हजेरी दिन. या हजेरी दिनाचे मोजमाप होणार कसे? ते करणार कसे, मग ती शाळेतील मुले आहेत की, कॉलेजातील मुलांना आणून बसविण्यात आलेले आहे, हे कळणार कसे] राज्यभर एकाच दिवशी हजेरी दिन हे शक्य आहे काय? मंत्री महोदय, श्री. राजेंद्र दर्डा हे हॅरी पॉटर सारखेच बोलत आहेत. हॅरी पॉटरलाही जे जमणार नाही ते मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा यांना जमणार आहे का? शासनाचे अधिकारी असे सपकन एकाच दिवशी सगळीकडे उडून जाऊन हजेरी घेऊन येतील, अशा प्रकारची कल्पना चांगली आहे. पण ती कल्पना वास्तव नाही. चांगल्या कल्पना खूप असतात पण त्या वास्तव असल्या पाहिजेत. हे सर्व प्रामाणिक आणि व्यवहार्य केले नाही तर ते उपयोगाचे होत नाही. प्रामणिकपणाची क्षेत्रे खूप आहेत तिकडे जावयास हरकत नाही. सरकारमध्ये कशासाठी यावयाचे? सभापती महोदय, विनाअनुदानित शाळांचा विकास आराखडयात जो मुद्दा आहे....

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : आता 5 वाजून 46 मिनिटे झालेली आहेत या विधेयकावर आणखी काही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आपल्याला आणखी किती वेळ लागणार आहे?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला आणखी अर्धा-तास वेळ लागेल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांचे भाषण ऑन लेग ठेवावे.

..4...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी थोडया वेळा पूर्वी मांडले होते ते पुन्हा मांडतो. ही चर्चा ऑन लेग ठेवावी. अशासकीय विधेयकांचे बॅलट होते, त्या बॅलटमध्ये हे विधेयके पुन्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आल्यानंतर अशासकीय कामकाज समिती या विधेयकाला वेळ ॲलॉट करील. अशासकीय समितीकडून या विधेयकाला जेव्हा वेळ ॲलॉट केला जाईल तेव्हा ही अपूर्ण राहिलेली चर्चा पुढे सुरु करण्यात यावी. मला असे वाटते की, घाईघाईत चर्चा करणे, घाईघाईत मंत्री महोदयांनी उत्तर देणे असे होऊ नये, म्हणून माझी विनंती आहे की, आपण विधिमंडळाच्या नियमानुसारच हे ठरवावे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी जी विंनती केली आहे त्या साठी सभागृहाची मान्यता घ्यावी लागेल.

श्री. कपिल पाटील : थोडयावेळा पूर्वीच सत्ताधारी पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी याला संमती दिलेली आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांच्या विचारार्थ असलेल्या अशासकीय विधेयकास नियम 202 (ब) मधील तरतुदीनुसार नियम 12 चा आधार घेऊन अशासकीय कामाकाजासाठी बैठकीच्या शेवटी राखून ठेवलेल्या 2.30 तसापैकी 70 मिनिटांचा वेळ नेमून दिलेला आहे. वरील अशासकीय विधेयके व ठराव समितीचा प्रस्ताव सभागृहाने मतास टाकून संमत केलेला आहे म्हणून या वेळेतच विचारार्थ असलेल्या विधेयकावरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह आपल्याला पूर्ण करावयाची आहे. माननीय सदस्यांनी सदर विधेयक विचारात घ्यावे असा प्रस्ताव मांडला असून त्या वर ते आपले विचार मांडत आहेत. त्यांनी सभागृहात विनंती केल्या प्रमाणे चर्चा अपूर्ण ठेवावयाची असेल तर त्यास या सभागृहाने संमती देणे आवश्यक आहे. संसदीय प्रथा व कार्यपध्दती या बाबत मे. कौल आणि शकधर यांच्या खालील उताऱ्याकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यात येत आहे. "Resumption of Adjourned Debate- On a motion being carried, the debate on a private member's Bill is adjourned to the next day allotted for private member's Bills in the same or next session, but it is not set down for further discussion unless it has gained priority at the ballot."

म्हणजेच पुढील अशासकीय विधेयकासंबंधी बॅलेट घेतले जाईल त्या वेळी त्या मध्ये या विधेयकाचा समावेश असणे क्रमप्राप्त आहे. त्या साठी सभागृहाची अनुमती घ्यावी लागेल.

म्हणून मी हा प्रस्ताव सभागृहाच्या मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता सन 2011 चे वि.प.स. क्रमांक 4 बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक विचारात घेण्यात यावे या वरील चर्चा थांबविण्यात येत आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 8 ऑगस्ट, 2011 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 वाजता विशेष बैठक होईल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 49 मिनिटांनी सोमवार, दिनांक 8 ऑगस्ट, 2011 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही